# ।।सूर एका वादळाचा।।

## शाहीर अमर शेख

# सूर एका वादळाचा

शाहीर अमर शेख

संकलन

मलिका अमर शेख

आंबेडकर प्रबोधिनी

© १९९२, मलिका अमर शेख

पहिली आवृत्ती
२१ मे १९९२

किंमत चाळीस रुपये

मुखपृष्ठ
आशुतोष नामदेव ढसाळ

मलपृष्ठावरील रेखाचित्र
व्ही० एन० ओके

प्रकाशक
नामदेव ढसाळ
आंबेडकर प्रबोधिनी
शाहीर अमर शेख मार्ग
संत गाडगे महाराज चौक
मुंबई ४०० ०११

मुद्रक
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

प्रिय आईस,

चळवळीत, आयुष्यात भाईंना साथ दिलीस तू...
भाईंच्या तळपत्या सूराला न् आयुष्याला सोबत दिलीस स्वतःच अस्तित्व मिटवून, त्या तुझ्या प्रेमाला, त्यागाला... तुझ्या समर्पित आयुष्याला या आठवणी अर्पण...ज्यावर तुझाच जास्त अधिकार आहे...ज्या तू जपून ठेवलेल्या होत्यास जिवापाड...हे सारं तुझचं – तुलाच अर्पण...

– राजा

# दोन शब्द!

दोन शब्द! नको, दोन शब्दही नकोत आणि असीम, अनंत शब्दब्रह्मही नको. कारण शंब्दांत सांगण्यासारखं नाहीच काही. माझे वडील – भाई शाहीर अमर. शेख...

खूपशा आठवणी, फोटो...आणि काय आहे? त्यांनी लिहिलेल्या डायऱ्या, पत्रं...आईने सारं खूप जपून ठेवलेलं. मी फक्त त्यांचं संकलन केलं; कारण त्या फक्त डायऱ्या नाहीयत, नुसती रोजनिशी नाहीय...तो एक ऐतिहासिक दुर्मिळ दस्ताऐवज आहे. एका उंच, कलावंत मनाचा एक संघर्षमयी प्रवास आहे...आत्मपरीक्षण न् मनाचे कंगोरे आणि क्रांतिकारी लढ्याच्या मधून झळझळून उठणाऱ्या विचारांचं यांत जसं चित्रण होतं तसंच तत्कालीन सामाजिक चळवळी, त्यांतले अंतर्विरोध, त्यांतले ताणतणाव यांचा सगळा आलेख यांत आला आहे.

कलावंत म्हणून ते जितके उंच होते तितकेच माणूस म्हणूनही. त्यांचं उत्तरदायित्व म्हणून काही भरीव निर्मिती करणं मला जमलं नाही याची खंत सततच.

या स्मृती आणि त्यांचं व्यक्तिमत्त्व, विचार पुस्तकरूपानं तुमच्यासमोर ठेवून मी काय करतेय तर हा तुमचा माणूस तुम्हांलाच परत देतेय! त्यांचं माणसांवर प्रेम होतं. जनताजनार्दन मायबाप मानून अविरत त्यांनी इथल्या समाजावर न् जीवनावर असीम प्रेम केलं. आणि तुम्ही साऱ्यांनीही त्यांना खूप प्रेम दिलं...

या साऱ्यात मी काय बोलणार?

हे पुस्तक छापण्यासाठी असंख्य अनामिक मित्रांनी, आत्मीय, चाहते यांनी कष्ट घेतले. शिवाय 'मौज प्रिंटिंग प्रेस'चे माधवराव भागवत, गुरुनाथ सामंत, नामदेव ढसाळ, रजनी परुळेकर, राजदत्त, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, सौ. केशर जैनू शेख, शाहीर भास्कर मुणगेकर आदी अनेकांनी खूप कष्ट घेतले, मदत केली.

– या सर्वांची मी ऋणी आहे. आणि या ऋणातच राहायला मला आवडेल.

**– मलिका अमर शेख**



"अमर शेख म्हणजे धग, रग आणि आग यांची जिवंत बेरीज!" असे आचार्य अत्रे अमर शेखांबद्दल म्हणत. दोघे जिवलग, परममित्र. अशा या दोन असामान्य, उत्तुंग पर्वतांची ही गळाभेट!



दोन कलावंत मित्रांची जोडी:
अमर शेख व अण्णाभाऊ साठे



हातात तिरंगा धरून मुलाच्या लढ्यात साथ देणाऱ्या माँ: मुनेरबी (अमर शेखांची आई)



हुसेन पटेल (अमर शेखांचे वडील), प्रेरणा, श्री० शामराव जयकर
(ज्योती अमर शेख यांचे वडील)



'बेकायदेशीर' या वगनाट्यातील दृश्य : अमर शेख, गव्हाणकर, गणपत सातपुते, सौ० उषा ऊर्ध्वरेषे, धोंडीबा सुवासे, अण्णाभाऊ साठे, दादू जाधव




ते चौघे मित्र



दिल्ली सत्याग्रह – रस्त्यारस्त्यावर पहाडी तान – अशी गाजवली दिल्ली







अमर शेख : भावमुद्रा







[illegible] [illegible], श्रीमती [illegible], शाहीर [illegible],
डॉ. राम [illegible] व [illegible] शाहीर अमर शेख



डॉ. [illegible] पाटील,
[illegible] पाटील
व शाहीर अमर शेख



[illegible] :
अमर शेख,
[illegible],
डॉ. [illegible],
सोबत श्रीमती [illegible]



[illegible] शाहीर अमर शेख [illegible]





अमर शेख, [illegible]



[illegible]



[illegible]



छोटी मोनिका आणि अमर शेख

ते मंतरलेले दिवस



आमची जोडी : मोनिका, ज्योती अमर शेख, अमर शेख, प्रेमा



मोनिका, ज्योती अमर शेख, अमर शेख



छोटी प्रेरणा,
अमर शेख,
ज्योती अमर शेख



प्रेरणा आणि मलिका



'झाड जिवं भाव' या [illegible]
[illegible] अमर शेख,
डॉ. कुलकर्णी, [illegible]
[illegible]



जाहीर एक [illegible] कार्यक्रम -
[illegible]
[illegible]
[illegible]



[illegible]
[illegible]



[illegible]



[illegible]



[illegible]



'प्रपंच' या चित्रपटात सुलोचनाबाई, अमर शेख, श्रीकान्त मोघे



'महात्मा फुले' चित्रपटाच्या मुहूर्तप्रसंगी : अमर शेख, सेनापती बापट, कर्मवीर भाऊराव पाटील, बाबासाहेब आंबडेकर, सौ० सविता आंबेडकर, बाबूराव पेंढारकर आणि आचार्य अत्रे एक दुर्मिळ, अविस्मरणीय क्षण!




हे असे मनमोकळे हसणारा माणूस
संघर्षाच्या वेळी प्रलयंकारी तुफान होणारा
घनगर्द बरसणाऱ्या प्रेमळ पावसामध्ये
लख्खकन् कडकडावी वीज
तसे हे लोभस व्यक्तित्व



# महायात्रा



एक मृत्यू अक्राळविक्राळ
क्रूर कठोर
न् अचानक जाणवतं :
कुणाचंही अपार प्रेम
इतकं सामर्थ्य ठेवतं
की मृत्यूही होऊन जातो
खुजा, केविलवाणा
त्या उंच प्रेमापुढे...



एक धगधगणारे रणकुंड
शांत झाले तो दिवस
एक लोकमान्य लोकशाहीर
एक मानवीय कलावंत
आपल्याला निरोप देणाऱ्या
जनसागरामध्ये चिरशांती घेताना
तो पहाडी आलाप
ते उत्तुंग व्यक्तिमत्त्व
ते दिलदार राजस हसू...
एका ऐतिहासिक पर्वाचा
शोकान्त

# अनुक्रम


डायरी १
गर्जा जयजयकार ३०
मुनेरबी ३७
बा महाराष्ट्रा, मी फितूर कसा? ५२
मी अमर बोलतोय ६०

कम्युनिस्ट पक्षाने दिलेले अनमोल रत्न ७०
**ज्योती अमर शेख**

शंभू भट्टाचारीच्या ग्रूपबरोबर प्रोग्रॅम दिला. फार सुंदर झाला. ममआचा राजा व काही उच्च सरकारी अधिकारी हजर होते. परिणाम छानच झाला. अनेक प्रकारच्या पण उत्तेजनपर प्रतिक्रिया मिळाल्या. "अमर शेखचे गाणे तलवारीच्या घावासरशी शीर धडावेगळे करणारे आहे. कलेतून प्रचार होऊ नये म्हणणाऱ्यांना ही सणसणीत थप्पड असून उच्च प्रतीची कला ही जीवनाला एका सुंदर कोंदणात बसवू शकते."

"पॉल रॉबिनसनूच्या कलेच्या तितकाच उच्च प्रतीचा दुसरा आविष्कार मला पाह्यला मिळाला." – डॉ. सेन.

अनेक कार्यक्रम – भागलपूर, दुगरिया, नयागांव प्रोग्रॅम. चांगले कार्यक्रम. अनेक नव्या ओळखी, भेटीगाठी. लॉन मैदान, बोगुसराय, बनारस-बेनियाबाग बिहार दौरा कमालीचा यशस्वी.

८ ऑक्टोबर — आग्रा. रात्री सेंट जॉन कॉलेजमध्ये कार्यक्रम. १००० लोक हजर होते. काही आर.एस्.एस्.च्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाला मोडता घालण्याचा प्रयत्न केला. तो सफल झाला नाही. माईक बंद पडला तेव्हा विरोधकांना थोडे अवसान मिळाले. त्यांनी थोडी गडबड केली.

९ ऑक्टोबर — काल कॉलेजहॉल(सेंट जॉन)मध्ये गोंधळ करणाऱ्या विरोधकांनी राजेंद्रकडे माफी मागितली.

२७ ऑगस्ट — ७-०० वाजताच पाटण्यास पोचलो.

३१ ऑगस्ट — सकाळी १० वा.च्या गाडीने सियालदाहून नैहत्तीस कॉ. पूर्णेदूबरोबर पोहचलो. नैहत्तीस बंगाल प्रांतिक लोकनाट्याचे अधिवेशन सुरू होते. तिथे महाराष्ट्रातर्फे अभिवादन सादर करून एक गीत म्हटले: 'जननी जन्मभूमी'. लोक माझे गीत ऐकून द्मूढ झाले. कारण गाताना माझ्या डोळ्यांतून वहाणारे अश्रू.

तीनच्या गाडीने निघालो कलकत्त्यास, मैदानात (मोनुमेंट) कमिटीतर्फे मीटिंग होती. मीटिंगमध्ये दहा-पंधरा हजार लोक होते. जोराचा पाऊस आला. अध्यक्षांनी मला गायला बोलावले. अत्यंत जोराच्या पावसात व खालून

| | |
|---|---|
| १७ एप्रिल | जुन्या गिरणीसमोर सभा. ६००-८०० लोक. सभेत पिंपरकर, माझे भाषण परिणामकारक झाले. |
| ३ जून | भाऊसाहेब खांडेकरांना पत्र पाठवले. |
| ६ जून | गांधींचे तत्त्वज्ञान खुळं पडू लागलं. हिंदु-मुसलमानांच्या दंग्यातून हृदयपालट तत्त्वज्ञान आणायचे ठरवले. शांतिदलाची स्थापना केली. अहमदाबाद दंग्यातून काम करायची परवानगी मिळाली. या दलात स्वयंसेविका पण होत्या. आणि गुंडांनी तर त्यांच्यावरच भयानक बलात्कार केले. |
| १४ जून | काल एक पारशी आपल्या मुलीला घेऊन युनियन ऑफिसमध्ये आली. 'मिशनरीबाईने मुलीच्या डोक्याला तेल लावून बट उपटून नेली' म्हणून सांगितलं व आता मुलगी मरेल म्हणून रडू लागली. मग पिंपरकरांनी त्या मुलीवर मंत्र टाकला! हिंदुस्थानातील समाजवादी कार्यकर्त्यांना हे काम करावे लागत आहे! |
| २३ ऑगस्ट | कोल्हापुरास जाण्यासाठी निघालो. |
| २४ ऑगस्ट | कोल्हापुरास पोचलो. आज मा. विनायक यांची त्यांच्या राहत्या घरी भेट. |
| २६ ऑगस्ट | गुरुवर्य भाऊसाहेब खांडेकरांची भेट. |
| २७ ऑगस्ट | नवयुगकडे ट्रायल होऊन २० रुपये पगारावर राहण्याचे ठरले. |
| १५ सप्टेंबर | मा. विनायकांसमोर गाणे. |
| १७ सप्टेंबर | कोल्हापुरचे मित्रमंडळ सोडल्यापासून आनंद होतो, तितकेच दुःख पण वाटते. आनंद अशासाठी की माझ्यासारख्याला भराभर मित्र मिळतात ते हुशार, बुद्धिमान. वाईट वाटते ते की त्यांच्या साहित्य, वाङ्मय, काव्याचा अभ्यास, ईश्वरीय ज्ञान, त्यावरील चर्चा — यात भाग घेता येत नाही. मला जर त्या क्षेत्रात थोडा वाव मिळता तर त्याच क्षेत्रात कितीतरी नावीन्य निर्माण केले असते मी. |
| ३० सप्टेंबर | × × × यांनी अंगठी घेतली. |
| २ ऑक्टोबर | उद्या कुणी विचारील, 'आता काय होतंय तुमच्या स्टुडि- |

ओत?' मी चटकन् म्हणेन, 'दारू! समाजाला पाजण्या-साठी'. याला जर कला म्हणायचे असेल तर ती एका विशिष्ट वर्गापुरतीच. बहुजन समाजाची खास नाही.

८ ऑक्टोबर ज्याचं रोजचं जीवन हीच लढाई आहे तो कशाला भिणार? तो भिऊही शकतो फक्त अविचाराला.

## ॥१९४२॥

१९४२ पुण्याला.

१८ फेब्रुवारी मी माझ्या समाजापासून दूर फेकला जातोय. मुस्लीम समाजापासून नव्हे. त्यापासून तर मी कधीच दूर फेकला गेलोय. मी दूर फेकला जातोय खालच्या समाजापासून, पिळल्या जाणाऱ्या वर्गापासून न् लुडबुडत आहे ढोंगी मध्यमवर्गात आणि म्हणून त्या वर्गातले सारे दुर्गुण माझ्यात जोराने प्रवेशू इच्छितात.

१४ मार्च चालू समाजपद्धतीत माणुसकीला किंमत तर नाहीच, पण असत्याला इतका भाव आहे की असत्त्याचं पितळ सोन्याच्या भावानं विकू शकतं, पण सत्याचं सोनं पित-ळेच्या भावातसुद्धा कोणी विचारत नाही.

२० मार्च चिडखोरपणा आत्यंतिक प्रमाणात शिरू लागला आहे. त्याचा वेळीच नाश करणे अत्यंत जरुर आहे.

१६ एप्रिल सिनेसृष्टी: समाजाला नवीन वाटणारं हे जग. किती विचित्र आहे समाज. या नवीन वाढणाऱ्या जगाविषयी किती भ्रामक कल्पना त्याने उराशी बाळगल्या आहेत आपल्या. मी या जगात येऊन पहिला राहिलो नाही. याचा अर्थ असा नव्हे की मी घाणीत लोळू लागलो आहे. पण येवढे मात्र खरे, माझी मानसिक उन्नती स्थगित झाली. मानसिक अवनतीला कारणीभूत दुसरे एक कारण असू शकेल ते म्हणजे परिस्थितीचे आघात होय. पुढे चल – चल –

| | |
|---|---|
| १९ एप्रिल | निष्क्रिय. निष्क्रिय. निष्क्रिय. |
| २३ एप्रिल | भाऊसाहेब खांडेकरांची भेट. बराच वेळ चांदण्यात बसलो. |
| २७ जुलै | मध्यमवर्गीयांचा धर्म – नेहमी बुचकळ्यात पडणे. निष्क्रियता. तयारी – फक्त एक पाऊल पुढे जाण्याची. |
| २८ जुलै | स्वतःवर रागावून किंवा शिव्या देऊन जर क्रांतिकार्य होत असते तर मग ही जिवाची आटापीट, त्रास, दुःख, तुरुंग, रक्तपात आज जगात दिसतेच ना? |
| १० ऑगस्ट | चीड आणण्यासारखे वर्तन सरकारकडून होऊ लागले असून काय होणार हे समजू शकत नाही. मात्र खूप चीड येते हे सारे प्रकार पाहून. एस्. पी. कॉलेज, ससून हॉस्पिटलवर गोळीबार. शीख तरुणाची झेंड्याबद्दल बाचाबाची झाली. त्याच्या छातीत गोळी गेल्यावरच तो झेंडा त्याच्या हातून सुटला. |
| २८ ऑगस्ट | चालू लढ्याला कुणालाही विरोध करता येणार नाही. लढ्याला विरोध करणे म्हणजे जनतेपासून दूर जाणे. दडपशाहीमुळे लोकांना जास्त चेव येतो आहे. |
| ११ नोव्हेंबर | बुद्धिवाद व भावना यांचा झगडा खेळ चालला आहे. पण त्यामुळे माझी किती कुचंबणा होत आहे. |
| १२ नोव्हेंबर | १९४० सालअखेर जी बुद्धी कमावली तेच भांडवल अजून कायम आहे. जास्त कमावता आले नाही. कारण समाजापासून दूर. |
| १८ नोव्हेंबर | जागरण व श्रम चालू आहेत. आणि औषध खोसतो आहे. म्हणून का प्रकृती सुधारणार आहे? एक काळ होता, जागरण काय किंवा श्रम काय? पण आज प्रकृती किती विचित्र झाली आहे. थोडं काही झालं की संपलं. प्रकृतीवर ताबडतोब परिणाम होतो. तसेच मानसिक परिस्थितीचे झाले आहे. |
| १९ नोव्हेंबर | खूप दारू पिऊन झिंगून पडावे, शांतपणे पडावेसे वाटते. त्याशिवाय शांतता लाभणार नाही असे वाटते. आज माझ्यासमोर हे विचार येतात. कुणा कम्युनिस्टाच्या डोक्यात येत असतील का असे विचार? मी कम्युनिस्ट |

व्हायला लायक आहे का?
"कज़ा आयी हैं तेरे जानेके दिन हैं
मुसीबत के आँसू बहाने के दिन हैं॥"
हे रडगाणे कोण कम्युनिस्ट आज म्हणत आहे? आज जगातला कम्युनिस्ट कुठे आहे? नु हा भाकरीच्या तुकड्यासाठी लाचार आयुष्य कंठणारा भित्रा कम्युनिस्ट मी कुठे आहे? नालायक.

२१ नोव्हेंबर — × × × पत्र आलं. कुठेतरी मन रमवण्याचा प्रयत्न करत असतो. पण पूर्ण समाधानाचा एक तरी क्षण मला अनुभवाला मिळाला आहे काय?
तुझ्यामधील या गोष्टी नाहीशा झाल्या तर ठीक. नाही-पेक्षा तू मरशील. यापुढे पत्रसुद्धा लिहू नकोस. फार त्रास होईल तुला. तू आणि ती दोन वेगवेगळ्या वाटेचे वाटसरू आहात. तिच्या गावी तरी आहे का ही गोष्ट?

२३ डिसेंबर — × × × एक गोड मुलगी.

२४ डिसेंबर — बार्शीत सुंदर काम होऊ शकेल पण काम करण्याची पद्धती बदलली पाहिजे. त्यात बोल्शेव्हिक क्रांतिकारक-पणा आला पाहिजे. ज्यांच्या अंगी सिन्सिअरिटी आहे त्यांना योग्य ट्रेनिंग मिळालं पाहिजे.

वर्षअखेरची नोंद — सारे वर्ष सिनेमासृष्टीत गेले. समाजकार्य घडू शकले नाही.

## ॥१९४३॥

४ जानेवारी — ३८-३९ साल. ते स्वैर झालं. त्यासारखं आयुष्य पुनः कधी लाभेल? रात्रीच्या त्या गोड अंधारातून नदीनाल्यां-तून, डोंगरकपारींतून भटकत राहून विश्वासपूर्ण स्वैरपणे, मुक्तकंठाने ठोकलेल्या त्या आरोळ्या, ती बेछूट, बेफाटपणे भटकत म्हटलेली गाणी, साऱ्या जगाचं ऐश्वर्य साठवलं होतं त्या आयुष्यामध्ये.

७ मार्च — सुरेश साळवीसारखी जर कम्युनिस्टांची प्रकृती होत राहिली, तर थोड्याच दिवसांत कम्युनिस्ट पक्ष नेस्तनाबूत होईल. शक्यतो जास्तीत जास्त लवकर तरुण कॉम्रेड्सना खरा कम्युनिझम समजावून देणे अत्यंत जरुरीचे असते. मध्यमवर्गीय तरुणाची समाजवादी विचारसरणीची प्रथमावस्था रोमँटिसिझमने भारून गेलेली असते. प्रथम ती दूर झाली पाहिजे. नाहीतर तो तरुण पार्टीच्या हातून निसटून जाईल.

जगायचे कशासाठी? कुणावर मला प्रेमाने रागावता येत नाही. कुणी माझे कौतुक करणारे नाही. मी कुठवर भावनांना मारू?

गैरसमज. यापुढे जास्तीत जास्त तोल सांभाळणे जरूर आहे. 'काहीतरी प्रचंड केल्याशिवाय जगात व्यक्तीचे स्थान राहत नाही. ते करत असताना जगातून नाहीसे होण्याची शक्यता असते. काय पर्वा त्याची? मग करावयाला लाग काहीतरी'.

१६ जून — माझ्यासारख्यांना जे अशक्य तेच मला शक्य करून दाखवायचंय जगास. ज्या दिवशी हे होणार नाही असे वाटेल त्या दिवशी मी या जगात नसेन.

२६ जून — कम्युनिस्ट क्रांतिकारक – चांगला माणूस व यंत्र यांच्या मधली अवस्था.

५ फेब्रुवारी — तिच्यावर माझं खूप प्रेम आहे. तिला याची कल्पनाही नसेल. तिचे कुणातरी माझ्यापेक्षा अधिक कर्तृत्ववान तिसऱ्याच तरुणावर खूप प्रेम असेल? तिने माझ्यावरच का प्रेम करायला पाहिजे? तिने आपल्या भावना का दडपून टाकाव्या? तिचे दुसऱ्या एखाद्यावर प्रेम असेल. तुझे तरी तिच्यावर आहे ना? बस्स...तू त्यातच सुख मानले पाहिजेस.

१० फेब्रुवारी — आठवण का इतकी जाचायते? आठवणीशिवाय दिवस जात नाही.

२० फेब्रुवारी — ...का खत! देवी आ रही है. खुशखबर?

१५ एप्रिल — ही धुंदी हवीय मला. हे फार छान केलंस तू. मी पूर्वीसुद्धा

असाच गुंगीत असे. पण त्यात किती काळजी नू विचार. या गुंगीत फक्त तुझी आठवण आहे. त्यात सुख आहे, की नाही माहीत नाही. एका क्रांतिकारक कम्युनिस्टाची डायरी ही! खरं आहे?

१७ एप्रिल नाही सहन होत हे. कसलं घाणेरडं हे निष्क्रिय आयुष्य? सारं नाशिवंत आहे ना?

१९ एप्रिल तुझ्याइतका त्रास माझ्या आयुष्यात कधी कुणा व्यक्तीने दिला नाही. खूप पराक्रम गाजवलास तू माझ्या आयुष्य-क्षेत्रात.

२२ एप्रिल मी का जगतो ते हेच मला कळत नाही. हे लिहीत असतानाच इतके विचार गोंधळ घालत आहेत की हे सारे पानच्या पान नुसते काळेकुट्ट करून टाकावेसे वाटते. आज खूप त्रास झाला मला. नको कळायला ते चांगले-वाईट, नको कळायला ते सत्य-असत्य. बुद्धिवाद, ध्येय-वाद, मनात येतं ते लिहिता येत नाही. गोंधळ होतोय् सारा.

२ मे पुन्हा तीच गंमत! एक वर्ष कशाला? काल आणि आजच पहा ना. 'तू म्हणजे एक मृगजळ' – पण कोणत्या अर्थाने?

५ मे फक्त तीच माझ्यावर मोहिनी घालू शकली, दुसऱ्या कुणाला ते शक्य झाले नाही. प्रेमी जिवांना मी शिव्या देत असे पूर्वी. पण प्रेम म्हणजे काय हे मला आज कळू लागले. किती त्रास असतो विरहात ते.

४ मे कॉ. के. व्ही. एक इच्छा होती त्याची. पार्टी-मेंबर व्हायची. त्याचं प्रेत सडून गेलं होतं. सिन्सिअर पार्टी-हितचिंतकाची ही अवस्था? नको होती व्हायला. मी हा शब्द त्याच्या कोषात नव्हता. स्वार्थ त्याला ठाऊक नव्हता, जिवंत असेतो त्याच्याकडे कुणी पाहिले नाही. एकटा होता जगात नू मेल्यावरसुद्धा त्याची ही अवस्था. मीसुद्धा त्याच्या मृत्यूची बातमी ऐकली. काही वाटले नाही मला. तिच्याच विचारात होतो मी. पण आता ती गेली. केव्हा सारखा डोळ्यासमोर येतो.

६ मे पार्टीतील काही असंतुष्ट आत्मे.
यापुढे तिला पत्र पाठवणार नाही न् संबंध पण येऊ देणार नाही. तिच्याविषयी जे वाटतं ते वाटत राहीलच.

८ मे मी स्वतःहून माझ्यात बदल घडवून आणत आहे. कसले समाधान मिळणार आहे न् मिळत आहे? त्या काळी सांपत्तिक स्थितीनं गांजला गेलो होतो. तरी एवढं खास वाटत होतं, की आपण काहीतरी सामाजिक कार्य करत आहोत. आज समाजसेवेचे समाधान नाही. स्वतःच्या भावनेला, मनाला सुखवण्याचे समाधान नाही. माझे जग आहे सारे, पण मी आहे कुणाचा? हे सारे कुणासाठी?

१० मे १५ एप्रिल रोजी × × × ची आठवण एक गुंगी होती. आज ती एक तापदायक गोष्ट वाटते. विरह सहन करण्यात मी सारं आयुष्य घालवण्याची भाषा करत होतो. हा विरह कुठवर सहन करणार तू? शक्य नाही वाटत; तोल सुटेल.

१५ मे गैरसमज...यापुढे जास्तीत जास्त तोल संभाळणे जरूर आहे. नवीन मैत्रीला यापुढे वाव नाही माझ्या आयुष्यात. सिगरेट – कुणाची पर्वा न् कुणाची काळजी...सिगरेट-मध्ये थोडंसं समाधान आहे; पण पुढे पाऊल टाकू नकोस अन् तोल सुटू देऊ नकोस.

२ जून किती कामात गुंतून घेतो मी स्वतःला, पण मन गुंतलेलं असतं का त्यात? तिने माझ्या भावनांना उत्तेजन दिलं हे निश्चित. अन् म्हणूनच मी तिच्याकडे ओढला गेलो. पण तिला आपण आज उत्तेजन दिलं नाही असेच म्हणायचे. तिच्या समजुतीखातर मी होय म्हणेन. पण म्हणून ती स्वतः निर्दोष असणार नाही. माझ्या दृष्टीने मी समजदार आहे. समजून-उमजून उत्तेजन देते आहे असे मला खात्रीपूर्वक वाटले. पण इतर व्यक्तींत अन् तिच्यात काही फरक नाही तर? जाऊ दे.

७ जुलै आई खरोखरच एक क्रांतिकारक स्त्री झाली असती. पण मला तिचे नीट मार्गदर्शन करता आले नाही.

२८ नोव्हेंबर फ्रॅक्शन मीटिंग.

## ॥१९४४॥

| | |
|---|---|
| १० एप्रिल | कार्पेथियन पर्वतावर वीरांनी झेंडा लावला. |
| ११ एप्रिल | 'ओडेसा' बालवीरांच्या हाती. 'आसाम फ्रंट' गंभीर परिस्थिती. नानापेठ दल, भवानी पेठ रात्रीचे दल. |
| ८ मे | स्टुडिओतील नोकरीचा राजिनामा दिला. |
| १५ मे | पत्र! आता कसली पत्राची अपेक्षा? तू काय पदवीधर आहेस? अमृ! आता तुझे हे चहाच्या कपातील सगळे मित्र झाडून झटकून दूर होतील तुझ्यापासून. |
| ३ नोव्हेंबर | टाऊन हॉलमागे – अमळनेर कार्यक्रम २ तास – पाच-सात हजार लोकांचा समुदाय हजर होता. यशस्वी. |
| ४ नोव्हेंबर | अमळनेरहून जळगांवी परत – सभा. |
| ५ नोव्हेंबर | मला माझ्या शक्तीची पूर्ण जाणीव आहे. म्हणूनच ती जास्तीत जास्त योग्य कारणी खर्च झाली पाहिजे. |
| १ डिसेंबर | निश्चय – सन १९४८ किंवा १९४९ पर्यंत आपण खूप खपायचे. किसान संघटना करायची अन् ती एवढी प्रचंड करायची की ४९ साली तरी ऑ. इं. किसान सभा महाराष्ट्रात भरवली जाईल. त्या सभेत एक लाख किसान आपण जमवूया हा आजचा निर्णय. |

कॉ. गोदूताई परुळेकर व अमरशेख

## ॥१९४५॥

| | |
|---|---|
| ४ जानेवारी | वापसई सभा यशस्वी केली. पण माराच्या भीतीने पळ काढला. रात्री रायत्याला मुक्काम. |
| ७ जानेवारी | टिटवाळा येथे म. प्र. किसान सभेचे अधिवेशन भरले. |
| ८ जानेवारी | कॉ. बी. टी. आर.नी माझे पार्टी कॉंग्रेसच्या मीटिंगमध्ये केलेले अभिनंदन. पोलिटब्यूरोच्या सभासदाने इतक्या उत्साहाने केलेल्या स्वागतामुळे मला खूप आनंद झाल्यास |

नवल काय?

२६ जानेवारी आसार मैदान. कॉ. बंकिम मुकर्जी यांच्या सभेत थोडासा कार्यक्रम. बंकीम मुकर्जी किती छान बोलले. मला पण तसे बोलायला आले पाहिजे. नंतर रात्री २ पर्यंत बंगाल दुष्काळ यावर रिपोर्टिंग.

१८ मार्च कवी प्रथम चांगला माणूस असतो. नंतर जीवनविषयक तत्ववेत्ता व नंतर कवी असतो.

१९ एप्रिल ऑर्डिनरी माणूस पार्टीकडे कधीच येऊ शकत नाही.

२३ एप्रिल 'रामेश्वर मंदिर' कार्यक्रम. अपेक्षेपेक्षा चांगला कार्यक्रम झाला. पण पुरा होण्याअगोदरच पोलिसांकडून बंद करण्यात आला. लोकमत प्रक्षुब्ध.

२५ एप्रिल मळगावहून कणकवलीस परत. किती निसर्गाची रेलचेल आहे या सबंध कोकणात! या दृष्टीने लोकांचं जीवन म्हणजे काय असायला हवे होते. आहे काय? "निसर्ग-सान्निध्यात मानवी जीवनाची वाढ...कलेची वाढ..." सगळा शाब्दिक डोलारा आहे झालं.

२६ एप्रिल कणकवलीच्या शेजारच्या खेड्यातून प्रचारार्थ भटकलो.

४ मे आम्ही बर्लिन जिंकले! झिंदाबाद कॉ. स्टॅलिन! झिंदाबाद लाल फौज!

"योग्य तेच तिने केले. अन् झाले तेच योग्य".

अंबरनाथ, भुसावळ, कोकण, निपाणी, कोल्हापूर इ. जवळजवळ सर्व महाराष्ट्रात कार्यक्रम.

११ जून "शेख, बायकांनी चोळ्या घालू नयेत यावर पोवाडा करा ना एक!"

वडारगल्लीची मागणी!

१४ जून व्हाईसराय वेव्हेल घोषणा.

१५ जून हिंदी पुढाऱ्यांची सुटका.

१९ जून पं. नेहरूंचे हुतात्मास्मरण. अरुणा असफअल्लीचा गौरव!

४ जुलै स्टडीसर्कल (कल्चरल स्क्वाड) सुरुवात. ८-९ लोक हजर. – भाषण.

१२ जुलै स्वीकारलेलं कुठलेही लहानसे कार्यदेखील मनापासून

करणे हा मुळी माझा मनोधर्मच आहे.

| | |
|---|---|
| १८ जुलै | सिमला पोवाडा तयार. तुमच्या पार्टी-कॉम्रेडस्मध्ये आर्टची चांगली जोपासना केली जाते. |
| १९ जुलै | अमळनेरच्या कॉम्रेडस्नी केवढी काळजी घेतली माझी! इतक्या जिव्हाळ्याची नं कर्तव्यतत्पर माणसं जी पार्टी तयार करते ती सोडून मरावे अशी कुणाला इच्छा तरी होईल काय? |
| ९ ऑगस्ट | रशियाने जपानविरुद्ध युद्धात प्रवेश केला. मला माझा आवाज, माझी कला व माझा बुद्धिवाद यांना जपले पाहिजे. त्यांची वाढ केली पाहिजे. |
| १३ ऑक्टोबर | माझ्या कलेची कसोटी समोर बसलेली जनता हीच आहे. मी दुसरी कुठलीही कसोटी जाणत नाही. तिचा निर्णय हा अखेरचा निर्णय. बस्स. |
| १४ ऑक्टोबर | माणूस कधी मोडू नये. कधी झाला की त्याचे विचारचक्र हे अत्यंत मोठ्या नं व्यापक प्रमाणात सुरू होते. नं बऱ्याच वेळा सध्याच्या समाज-परिस्थितीत तरी निराश मनःस्थितीत रहावे लागते माणसाला. कवीला या मनःस्थितीवर विजय मिळवणे फार कठीण जाते. |
| १५ ऑक्टोबर | संयुक्त प्रांत – मुस्लीम लीगचा ठराव – सर्व जमीन शेतकऱ्यांच्या मालकीची झाली पाहिजे.<br>कम्युनिस्ट पार्टी मुख्य घोषणा.<br>- शेतकऱ्यांना पुरेशी जमीन.<br>- बेकारीवर तातडतीच उपाययोजना.<br>- अस्पृश्यांना राज्यकारभारात समान दर्जा द्या.<br>- नफेबाजांची संपत्ती जप्त करा.<br>- सार्वत्रिक मताधिकार.<br>- स्वयंनिर्णय, एकजूट. |
| २२ ऑक्टोबर | मुंबई मुक्काम. प्रॅक्टिसला सुरुवात. यथातथाच. लोक जमले नाहीत. हजर – साठे, गव्हाणकर, मधु, बापू. |
| १४ नोव्हेंबर | कॉ. सनाअल्ला व कॉ. वत्सला यांचेवर निपाणीत गुंडांनी भ्याड हल्ला केला. |
| २७ डिसेंबर | कोपरगाव येथे सभा उधळण्याचा प्रयत्न (कॉंग्रेस गुंडांचा) |

हाणून पाडला.

| | |
|---|---|
| २८ डिसेंबर | वांबोरी इथे कार्यक्रम, ग्रँड सक्सेस प्रोग्रॅम, पाच-सहा हजार लोक. |
| २९ डिसेंबर | वांबोरी ते चांदा बैलगाडी-प्रवास. |

## ॥१९४९॥

| | |
|---|---|
| २ जानेवारी | "असं वाटतं, येवढ्या मानसांत उठावं अन् याचा मुक्त प्यावा, गुन्हाचा बाळ, आता मेलो तरी सुटणार नाही हो भाल बावटा." |
| | एका केळीविक्याने माझ्यावरून असं म्हणून चोटं मोडली. आजकी कुठले सुख नशीबात आहे? |
| १० जानेवारी | उभादांडा — कार्यक्रम सुंदर. हजार लोक १५००. |
| ११ जानेवारी | शिरोडा-पंचक्रोशी शेतकरी परिषद यशस्वी कार्यक्रम. |
| १३ जानेवारी | कांचरे, ता. वेंगुर्ला, येथे कार्यक्रम. ७०-७५ गुंडांवर विजय मिळवला. |
| १७ जानेवारी | कणकवलीचा यशस्वी कार्यक्रम; ३००० लोक. ग्वालियर हत्याकांड. शिर्सांची बेकायदेशी. |
| | धावेर, नगर, पुणे, कोल्हापूर, सोलापूर सफर इथे यशस्वी सुंदर कार्यक्रम केल्याची नोंद. |
| २५ जानेवारी | काल काँग्रेस गुंडांनी पार्टी हेडक्वार्टरवर हल्ला केला. ४० कम्युनिस्ट जखमी. २५ सामानांचे नुकसान. मुंबईत गोळीबार, वारदबाळ कार्यक्रम छान. २५०० लोक. कार्यक्रमावर दगडफेक. |
| २८ जानेवारी | बुधवारपेठ कार्यक्रम बरा. कार्यक्रम उधळण्याचा अयशस्वी असा गुंडांचा प्रयत्न. |
| २२ फेब्रुवारी | खलाशांचे बंड. सर्वत्र मुंबईत उठाव. |
| २३ फेब्रुवारी | उठावाचे उग्र स्वरूप. कॉ. कमल दोंदे गोळीबारास बळी. कॉ. कुसुम अत्यवस्थ. |
| २१ मार्च | सामवाग प्रोग्रॅम. प्रोग्रॅमवर दगड, सोडावॉटरच्या बाटल्या |

फेकल्या, पण प्रोग्रॅम व्यवस्थितपणे पार पडला.

२३ मार्च — डिलाइल रोड प्रोग्रॅम, दगड-काचा, पण प्रोग्रॅम यशस्वी.

## ॥१९४७॥

१ जानेवारी — धुळ्यात, माझा एकट्याचा कार्यक्रम. १२००० ते १५००० लोक हजर, कार्यक्रम सुंदर!

३ जानेवारी — धुळे. प्रेक्षक २५-३० हजार. प्रोग्रॅम सुंदर!

५ जानेवारी — कापडणे. प्रेक्षक ३-४ हजार, प्रोग्रॅम बरा कसचा, फाईटच झाला.

१५ जानेवारी — "बाबा गाताना असा दिसतो जसा आता यो गाता-गाताच कुण्या दुस्मनाचं नरडं फोडनार".

— एक म्हातारी कामगार बाई, धुळे.

आणखीन् कसले सर्टिफिकेट हवे मला?

१८ जानेवारी — "अमर शेखनं गाताना वाही मारली की वस्स, आपुनबी उठावं असं वाटत."

२३ फेब्रुवारी — सकाळी ईप्टा व पुरोगामी लेखकसंघ यांचेपुढे कार्यक्रम. "आमची भाषा मराठी नसली तरी तुम्ही गाताना तुमचे सगळे गाणे कळले आम्हांला."

— काही लेखक व कलावंत

१२ मार्च — स्टुडंट काँग्रेसचे चित्रे म्हणाले, "माणसाच्या भावना किती बरोबर तुम्ही हलवू शकता!"

१० एप्रिल — गणेशपेठ, हुल्या मारुती चौक. कार्यक्रम सुंदर. आमच्या कार्यक्रमापासून २-३ मिनिटांचे अंतरावर राष्ट्रीय तमाशाचा कार्यक्रम होता. त्यांच्या कार्यक्रमाला प्रथम पाचशे लोक होते. नंतर राहता राहता २०० च लोक राहिले, की ज्यांत ५०-६० व्हालिंटियर होते त्यांचे! पण आमच्या कार्यक्रमाला मात्र १५००० लोक हजर होते.

३० मे — फर्ग्युसन रोड कार्यक्रम. छान झाला. लोक ८०००!

कार्यक्रम चालू असताना दगड फेकले. पण कामगार चिडून जागचे हालले नाहीत.

२५ मे — कामगारमैदान. आज युनियनची वार्षिक निवडणूक झाली. कॉ. डांगेंच्या निवडणुकीची आठवण झाली. रात्रीच्या आमच्या कार्यक्रमाला तर २५००० लोक हजर होते. कार्यक्रम सुंदर झाला.

२६ मे — रजिष्ट्रार कचेरीत लग्नाला गेलो असता कॉ. कुसुमच्या बाबांनी हरकत दाखल केली व लग्न रहित झाले.

३ जून — फाळणी! फाळणी!! देशाची साम्राज्यवाद्यांनी चिरफाड केली.

१२ जून — "वह उंचासा, शेरके जैसा गाता, वही ना?" कॉ. करीम धुळेच्या आईनं मला ओळखताना केलेला शब्दप्रयोग. असेल कुणाच्या दृष्टीनं शब्दप्रयोग; माझ्या दृष्टीनं हे अमोल सर्टिफिकेट आहे. हाच माझा ठेवा.

१० जुलै — कॉ. कुसुमने (ज्योतीने) माझ्या जीवनात कायदेशीर प्रवेश मिळविला.

१५ ऑगस्ट — चौपाटी – राष्ट्रगीत म्हटले. शिवाजी पार्क, कामगार-मैदान. लोक ३० हजार. स्वातंत्र्यदिन साजरा करणारी जनता मी पाहिली.

७ सप्टेंबर — अमरावती. हाऊसफुल्ल थिएटरमध्ये कार्यक्रम. वीर वामनराव जोशी अध्यक्ष – बोलले, "तुम्हांला अपयश नाही, हेच हवे जनतेला. अमरशेख अभिनयात माझे गुरू शोभतील! इतकी उत्कृष्ट कला यांच्याकडे आहे. अशी हजारों पथके काढा. पुढाऱ्यांना क्रांती करायला जर एक वर्ष लागणार असेल तर हे लोक एक महिन्यात क्रांती करून दाखवतील. माझा तुम्हांस हार्दिक आशीर्वाद आहे!"

२५ ऑक्टोबर — "ॲक्शन गैरवाजवी होते पण मला वाटतं, त्याशिवाय लोक हसणार नाहीत, बरं म्हणणार नाहीत म्हणून तुम्ही इतकी ओव्हर ॲक्शन करीत असाल."

– रघुवीर सामंत

"तुमचा कलेकडे पाहण्याचा दृष्टिकोन अत्यंत संकुचित आहे. म्हणूनच तुमच्या कलेला समाजात किंमत उरली नाही. सर्वसाधारण माणसाच्या हालचालीपासून, भाव-तरंगापासून तुम्ही लाखो कोस दूर आहात हाच तुमच्या भाषणाचा निष्कर्ष."

— अमर

## ॥१९४८॥

| | |
|---|---|
| ४ जानेवारी | कला सर्वसाधारण माणसाच्या लुप्त झालेल्या भावनांना जागृती आणते, पुलकित करते, हेलावून सोडते, आणि मग त्याच्या स्वतःतच ठाण मांडून त्याला माणसाच्या चाकोरीत आणून सोडते. |
| ३० जानेवारी | म. गांधींचा खून झाला. |
| ३१ जानेवारी | सबंध देशभर सुंद वातावरण. |
| १ फेब्रुवारी | देशभर प्रतिगाम्यांवर प्रक्षुब्ध जनतेने प्रचंड हल्ले चढविले. |
| २४ फेब्रुवारी | आला दिवस दोन गोष्टी घेऊन येतोचः एक जय, दुसरा पराजय. तो दिवस विचारतो की बोल तुला काय हवंय् — जय का पराजय. आणि कुठल्याही परिस्थितीत एक स्थिती पत्करावीच लागते. मग तुम्ही कुणीही असा. |
| १ एप्रिल | पार्टीवरील सरकारच्या हल्ल्याला मुंबईत सुरवात. |
| ३ एप्रिल | आज ठाण्याच्या कार्यक्रमाच्या वेळी पोलिसांनी नोटीस बजावली. गायलो नाही. |
| १६ एप्रिल | दुपारी ३-५१ला प्रेरणेचा जन्म झाला. |
| १८ ऑक्टोबर | आज तर आमच्या कार्यक्रमानेच संयुक्त महाराष्ट्र परिषद गाजली. — अण्णाभाऊच्या पोवाडा, तमाशाने सबंध जनसागर हेलावला. हजर लोक ८००००. |
| २० ऑक्टोबर | माझ्यासकट कॉ. गव्हाणकरवर भरलेल्या मे-दिन कार्यक्रम खटल्याचा निकाल लागून निर्दोष सुटलो. |

## ॥१९४९॥

५ मे स्त्रियांचा सेक्रेटरिएटवर मोर्चा – राजबंद्यांच्या मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी. पोलिसांचा या मोर्चावर हल्ला. कॉ. ज्योती अमर शेख जखमी.

८ मे लालबाग मैदानावर राजबंद्यांना पाठिंबा देण्यासाठी मोठी सभा झाली. तिथून लोकांनी मिरवणुकीने डिलाईल रोडवर जायचे ठरवले. मिरवणूक चालली असता तीवर गोळीबार करण्यात आला.

१२ मे कॉ. भिकू यास परवाच्या मिरवणुकीवर झालेल्या गोळीबारात गोळी लागली. तो आज वारला.

१३ मे कॉ. भिकूच्या प्रेतयात्रेबरोबर जात असताना अटक.

- फारशा नोंदी नाहीत. ठिकठिकाणी कार्यक्रम, नवे साथीदार, नव्या ओळखी – कृष्णचंद्र, बलराज सहानी, प्रेमधवन, यांच्याबद्दल तुरळक नोंदी, भेटीगाठीसंबंधी.

## ॥१९५२॥

इप्टाच्या ग्रुपमध्ये.

१ जानेवारी इलेक्शन-प्रचाराला ७ नोव्हेंबरपासून सुरुवात आणि त्यात कलाक्षेत्रातली माझी जबाबदारी मी शंभर टक्के पार पाडली. दोन नवीन गीते केली. ती परिणामी ठरली. पार्टीने प्रचारासाठी लॉरी दिली. मुंबईत नाक्यानाक्यावर ती गाजत लोकांत खूपच प्रचार केला.

८ मार्च कॉ. शिखानोव, कॉ. रशीद प्रभृती रशियाकडून आलेल्या कल्चरल डेलिगेशनसह एलिफंटाच्या सफरीवर गेलो. सोबत शैला होती.

१० मार्च नवयुग कलापथकाच्या तालमीला सुरुवात.

१९ मार्च मी जन्माने मुसलमान म्हणून घरातले (केशवच्या) वाता-

वरण खूपच तापले होते. आईंना मी घरात नको होतो, म्हणून बिछाना ऑफिसात टाकला.

२० मार्च वाराशिवा निर्वासित कँपमध्ये निर्वासितांतर्फे स्वागत. ७०० लोक हजर होते. बरा झाला कार्यक्रम. काय आश्चर्य! जादूच्या कांडीप्रमाणे केशवच्या घरच्या माणसांत बदल झाला! अगदी कुठे ठेवू नृ कुठे नको असं आईंना झालं. आश्चर्य नाहीतर काय?

२५ मार्च परवाचे दिवशी जो कार्यक्रम झाला त्याचं चित्र माझ्या डोळ्यापुढे उभं आहे. श्री. रविशंकर रावळ हे गुर्जरभूमीचे कलामहर्षी. कार्यक्रम सुरू होणार होता. त्यांना स्टेजवर बसायला लोकांनी आग्रह केला. पण ते म्हणाले, "मला अमर शेखांना पुढून पहायचंय." ते पुढे बसले. कार्यक्रम अत्यंतच यशस्वी झाला. गुजराथी, मराठी, पंजाबी, हर भाषा बोलणारा समाज, पण टाचणीचा आवाज यावा. अगदी विचित्र मनःस्थितीत लोक कार्यक्रम संपवून उठले. श्री. रविशंकर हे वयस्क असे ज्येष्ठ कलावंत उठले, त्यांनी कडकडून मिठी मारली नृ अगदी गदगदून म्हणाले, "अमर, तुम्ही मरू नका, कधीसुद्धा!"

३० मार्च पाच वाजता संध्याकाळी कलकत्यास जाण्यासाठी गाडीने निघालो. बरोबर अण्णा साठे, गव्हाणकर, मनू, राणे, शैला, गणपत.

१ एप्रिल कलकत्त्यास पोचलो. कलकत्त्यास सांस्कृतिक परिषद. शांततेसाठी. इप्टातर्फे होणाऱ्या कार्यक्रमात भाग घेतला. आमचा रोज कार्यक्रम ठेवण्यात येत असे. तो लोकांना खूप आवडे. रोज ८००० लोक हजर असत.

२ एप्रिल परिषदेच्या मंडपाला आग लावण्यात आली. ती विझवण्यात आली. शेवटी परिस्थिती स्थिर करण्याच्या दृष्टीने मला स्टेजवर उभे करण्यात आले. त्यात 'नया तराना' गाण्याने एक नवीन विक्रम केला.

१ मे मुंबईला मे दिनाचा कार्यक्रम कामगार मैदानावर झाला. हजर लोक २००००. कार्यक्रम छान. कार्यक्रम औरंगाबाद, शिंदी, परळीवैजनाथ, मोमीनाबाद.

मुकुंदराय – मराठीचे आद्य कवी यांच्या समाधीचे दर्शनार्थ.

२७ मे
हादगाव मुक्कामी जाण्यासाठी १ वा. निघालो. नांदेड-पासून १० मैलांवर अर्धापूर येथे कार बंद पडली. मालट्रकने हादगावी गेलो. उन्हाचा, पाण्याचा फार त्रास झाला. रात्री जेवणाचा त्रास झाला. अगदी थकून चूर होऊन अंथरुणावर पडलो. नीट झोप पण लागू शकली नाही.

८ सप्टेंबर
"हाय जननी' हे गीत म्हणत असताना काय तुम्ही डोळ्यात ग्लिसरिन घातले होते?"

"तुम्ही डोळ्यांतून वहाणारे अश्रू कधी बघितले? स्टेजवर येताना पाहिले?"

"नाही. पहिल्या गीताच्या वेळी तर तुम्ही हसत होता. दुसऱ्या गीताच्या वेळी मध्याला अश्रू आले."

"मग ग्लिसरिन कसे घातले असेल? अर्थावरहुकूम अश्रू आले होते."

"अगदी अर्थावरहुकूम आले. योग्य वेळी. पण हे कसे शक्य आहे?"

"माझा जन्म खातेऱ्यात झाला. मी माझे जीवन गातो. फक्त एवढंच."

१५ सप्टेंबर
१०-३० 'ब्लार्क'-इंग्रजी व 'प्रकाश'-हिंदी या साप्ताहिकांचे प्रतिनिधी मुलाखतीस येणार, ते आले. मुलाखत दिली २ तास.

१७ सप्टेंबर
आयुष्यातला अत्यंत महत्वाचा दिवस. बिहार शरिफ-पासून नालंदा प्राचीन युनिव्हर्सिटी सात मैल. नालंदाचे ते प्राचीन वैभव, त्याचे स्मृतिअवशेष पाहून मन भरून आले. बरोबर ५ स्थानिक कॉम्रेडबरोबर गेलो. सारं पाहत असताना, मुसता मंतरलेल्या माणसाप्रमाणेच वागलो. म्युझियमसुद्धा असेच पाहिले, त्याच मूडमध्ये. नंतर नालंदा हायस्कूलमध्ये २०० मुलांसमोर सुंदर कार्यक्रम झाला. मुलांनी फार छान स्वागत केले.

२० सप्टेंबर
पटना हॉल प्रोग्रॅम (लेडी स्टिफन्सन). हॉल भरला होता.

शंभू भट्टाचारीच्या सूपबरोबर प्रोग्रॅम दिला. फार सुंदर झाला. मगआंचा राजा व काही उच्च सरकारी अधिकारी हजर होते. परिणाम छानच झाला. अनेक प्रकारच्या पण उत्तेजनपर प्रतिक्रिया मिळाल्या. "अमर शेखचे गाणे तलवारीच्या घावासरशी शीर धडावेगळे करणारे आहे. कलेतून प्रचार होऊ नये म्हणणाऱ्यांना ही सणसणीत थप्पड असून उच्च प्रतीची कला ही जीवनाला एका सुंदर कोंदणात बसवू शकते."

"पॉल रॉबिनसन्च्या कलेच्या तितकाच उच्च प्रतीचा दुसरा आविष्कार मला पाहायला मिळाला." – डॉ. सेन. अनेक कार्यक्रम – भागलपूर, दुगारिया, नयागांव प्रोग्रॅम. चांगले कार्यक्रम. अनेक नव्या ओळखी, भेटीगाठी, लॉन मैदान, बोगुसराय, बनारस-बेनियाबाग बिहार दौरा कमालीचा यशस्वी.

८ ऑक्टोबर आग्रा. रात्री सेंट जॉन कॉलेजमध्ये कार्यक्रम. १००० लोक हजर होते. काही आर.एस.एस.च्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाला मोडता घालण्याचा प्रयत्न केला. तो सफल झाला नाही. माईक बंद पडला तेव्हा विरोधकांना थोडे अवसान मिळाले. त्यांनी थोडी गडबड केली.

९ ऑक्टोबर काल कॉलेजहॉल(सेंट जॉन)मध्ये गोंधळ करणाऱ्या विरोधकांनी राजेंद्रकडे माफी मागितली.

२७ ऑगस्ट ७-०० वाजताच पाटण्यास पोचलो.

३१ ऑगस्ट सकाळी १० वा.च्या गाडीने सियालदाहून नैहतीस कॉ. पूर्णेदूबरोबर पोहचलो. नैहतीस बंगाल प्रांतिक लोकनाट्याचे अधिवेशन सुरू होते. तिथे महाराष्ट्रातर्फे अभिवादन सादर करून एक गीत म्हटले: 'जननी जन्मभूमी'. लोक माझे गीत ऐकून दिमूढ झाले. कारण गाताना माझ्या डोळ्यांतून वहाणारे अश्रू.

तीनच्या गाडीने निघालो कलकत्त्यास. मैदानात (मोनुमेंट) कमिटीतर्फे मीटिंग होती. मीटिंगमध्ये दहा-पंधरा हजार लोक होते. जोराचा पाऊस आला. अध्यक्षांनी मला गायला बोलावले. अत्यंत जोराच्या पावसात व खालून

वहाणाऱ्या पाण्यात तरुण, तरुणी, म्हातारेकोतारे माझे गाणे संपेपर्यंत बसून होते. मला धन्य वाटल्यास नवल काय?

रात्री नैहत्तीस येऊन दोन गाणी दिली. लोक आश्चर्यचकित झाले. बोलले, "अमर, तुम्ही गाणे मनापासून रडता तसे गाणे मनापासून लढताही पण."

कलकत्ता – देवनाथदास आय.एन.एच. मिनिस्टर म्हणाले, "तुम्ही माणसांना पागल केले."

२ सप्टेंबर ढोल अथवा तबला यांपैकी रिद्मसाठी काही नव्हते. गाणी वाईट झाली. पण लोकांवर त्याचा चांगलाच परिणाम झाला. बंगालचा एक उत्तम गायक कॉ. सनतकुमार परवाच्या रात्री कार्यक्रमाच्या शेवटी पडदा पडता पडता स्टेजवर आला न् गळ्यात पडून अगदी ओक्साबोक्सी रडू लागला. गाणे अत्यंत आवडल्यामुळे त्याच्याकडून असे झाले.

६ सप्टेंबर रात्री ७-३० ला गुलमोडी. त्यात कामगाराची मीटिंग. ३००० कामगार हजर होते. कॉ. हजारासिंग महम्मद शफी, जतीन चक्रवर्ती, आदी स्थानिक हुतात्म्यांसाठी 'शहिदो ले लो मेरा सलाम' गीत म्हटले. 'लानत है सरमाया दारी', 'अपना झंडा न नीचे झुकाना', 'नया तराना' गाणी म्हटली. फार छान झाली.

"ये आदमी आओ आओ कहता है. उस वक्त स्टेजपर जाने के लिए दिल कहता है," एक शीख प्रेक्षक म्हटला. दुसरा म्हणाला, "तो जादूगार आहे!"

७ सप्टेंबर टेल्कोच्या कामगारांनी अजून राहण्यासाठी अडविले. मी त्यांची समजूत घातली. पण ते ऐकायला तयार नव्हते. ते नाखूष झाले. "अमर शेखचा कार्यक्रम संपल्यावर तो सांगेल ते – अगदी जगाला आग लावायचे काम जरी त्यांनी सांगितले तरी करावेसे वाटेल."

१९ ऑक्टोबर ज्योच्या घरून (बाबाकडून) आज पहिल्यांदा जेवायचे आमंत्रण आले. अर्थात ते स्वीकारून मी गेलो. आनंद झाला.

## ॥१९५३ ॥

१६ मार्च — प्रेरणेच्या पाठीवर बेबीचा जन्म झाला. सकाळी ८-५०ला बी.डी.डी. चाळ, वरळी येथे.

२२ मार्च — प्रेरणेच्या पाठीवर जन्मल्या बेबीने या जगाचा त्याग केला.

२९ जून — संगीत कलावंत जे भारतातून चीनमध्ये जाणार होते, त्यांचेसह चीनमध्ये जाण्यासाठी पासपोर्ट मिळावा म्हणून मुंबई सरकारकडे अर्ज केला.

९ जुलै — चीनमध्ये जाण्यासाठी लागणाऱ्या पासपोर्टला सरकार-कडून नकार.

## ॥१९५४ ॥

१ जानेवारी — चिनी सांस्कृतिक शिष्टमंडळ मुंबईस आले. श्री. के. ए. अब्बासनी डिनर पार्टी दिली. त्यांच्या घरी. त्या पार्टीत भाग घेतला नु 'काम करून गिरणीत थकली' गाणे म्हटले. सुंदर झाले.

३ जानेवारी — बलराज सहानींकडे जेवायला गेलो होतो. श्री. यशपाल आले होते. हिंदी-उर्दू भाषेवर चर्चा झाली. सुंदर. रात्री परतलो दिवसभर घरी राहून.

३१ जानेवारी — 'महात्मा फुले' चित्रपटाचा मुहूर्त झाला.

१४ मे — × × ×चं लग्न झालं नु माझ्या जीवनातलं एक प्रकरण संपलं! हे लग्न व्हावं म्हणून धडपड केली मी. मी – तिच्या एकेकाळच्या प्रियकरानं. माझ्या दृष्टीने ही अभि-मानाची गोष्ट. माझे जीवनातले मोठे प्रकरण इथेच संपावे, ही माझी इच्छा आहे. पाहूया.

१० सप्टेंबर — श्रीरामपूर सुंदर कार्यक्रम. तुकडोजी महाराज दोन फर्लांगावर त्या वेळी. अटीतटीचा सामना. त्यांना कार्य-क्रम १२चे आत आटपावा लागला! आम्ही ३ वाजता

| | |
|---|---|
| | आटपला. खिलार फंडाला २००/- रु. मदत. हजार लोक होते २० ते २५ हजार. |
| २७ सप्टेंबर | वडिलांची भेट. अनेक वर्षांनंतर. वडिलांना खूप दुःख झाले. आनंदले पण. सौ. ज्यो त्यांना आवडली. आज आम्ही पुणे सोडले. |
| १२ ऑक्टोबर | आसामकडे जाण्यासाठी निघालो. |
| १४ ऑक्टोबर | कलकत्ता इप्टातर्फे सत्कार. |
| १६ ऑक्टोबर | विमानमार्गे जोरहाटकडे. |
| २४ डिसेंबर | पहिला चित्रपट — मी काम केलेला 'महात्मा फुले' रिलिज झाला. |

॥१९५५ ॥

| | |
|---|---|
| ७ जानेवारी | आंध्र प्रांत निवडणूक-दौऱ्यासाठी लक्ष्मण साठेसह मुंबई सोडली. संपूर्ण आंध्र पालथला. ठिकठिकाणी कार्यक्रम. नंतर हैद्राबाद. |
| १४ फेब्रुवारी | वडील पुण्यास जाणाऱ्या गाडीत बसले व मी गोहत्तीकडे जाण्यास बसलो. |
| | — आसाम प्रांतिक परिषद आटपून शिलाँगकडे. हॅपी-व्हिल, बिशप कॅम्प, चेरापुंजी. खूप मित्रमंडळी. आसाम सोडताना दुःख जाणवले. |
| १२ एप्रिल | गयाकडे निघालो. |
| १७ एप्रिल | गांधीमैदानात पुनः कार्यक्रम. लोक हजर होते सोळा हजार. कार्यक्रम सुंदर झाला. बुद्धगयेस जाऊन आलो. मुझफ्फरपूर, छपरा, बेतिया, हाजीपूर — यशस्वी प्रोग्रॅम. उज्जैन, इंदूर, मुंबईत गोवा विमोचन फंडासाठी प्रभात-फेरी, सायंफेरी. |
| ३१ ऑक्टोबर | सकाळी ८-४५च्या सुमारास मुक्ताचा जन्म. |
| १० नोव्हेंबर | लोकहितवादी मंडळातर्फे कार्यक्रम. सुंदर झाला. स्टेज-वरून उतरलो तोच माझा आनंद मला सोडून गेल्याची, |

माझ्या नव्या बाळाने इहलोकाची यात्रा संपवल्याची तार मिळाली. आणि मग त्याच अंधारात मी नाशिकहून परतलो.

२१ नोव्हेंबर — प्रचंड संप. आमच्या भागातली सगळी जबाबदारी माझ्यावर होती. गोळीबार होऊन एक तरुण बळी पडला व एक बसची चौकी जाळण्यात आली. संध्याकाळी चौपाटी सभा. हजर लोक तीन लाखांच्या वर. गाणी म्हटली. 'गर्जा संयुक्त महाराष्ट्र भारती' हे गीत म्हणत होतो व सगळी सभा कोरस म्हणून साथ देत होती. हे अपूर्व होते.

२१ डिसेंबर — सकाळी पठाणकोट एक्सप्रेसने दिल्लीस निघालो. 'महात्मा फुले' या चित्रपटाचे रौप्यपदक श्री. अत्रे यांना राष्ट्रपती देणार होते त्याच्या समारंभासाठी.

फिजिकल लॅबोरेटरी हॉल. दिल्लीमध्ये चित्रपट-विजेत्यांचा राष्ट्रपतींकडून सत्कार. पंडित जवाहरलाल नेहरू व राजेंद्रबाबूही होते.

## ॥१९५६ ॥

१६ जानेवारी — पहाटेच पुढाऱ्यांची धरपकड झाली. म्हणून अर्धी मुंबई बंद. कामगारमैदानावर निषेध-सभा. मी गाणी म्हटली. हजर लोक २५०००. नंतर युवक सभेतर्फेच्या शिवाजी-पार्कच्या सभेला मी गेलो. श्री. न. वि. गाडगीळ यांचे भाषण श्रोत्यांनी बंद पाडले. मी 'गर्जा संयुक्त महाराष्ट्र भारती' हे गीत म्हणण्यासाठी पुढे गेलो. समोरचा तीन लाखांचा जमाव हा माझा कोरस झाला. गाणे संपताच मी विनंती केली:

"संयुक्त महाराष्ट्रवादी कुणीही असो, त्यांची जो सभा मोडेल तो मराठी रक्ताचा नाही." लोकांनी मान दिला. माझ्या आयुष्यातला महान दिवस.

आंब्याची आस। त्याची मुसम्बाची पेरणी
काय सांगू बाई तुला। त्याची जगीर बोलणी

असं मला माझ्या सख्या-मैत्रिणींना सांगावं लागलं. कधी नव्हतं ते मुंबई, पुणं, लखनौ, आग्रा असं यांचं पर्यटन घडू लागलं. हे तिकीट-कलेक्टर होते, तरी यांना काय सगळं जग फिरण्याचा अधिकार असणार? मी साशंक झाले... म्हणाले...

गांवाला जाई राया। यांवगंदी छोडं नको
तुझ्या या लाडकीला। वाट पाहू लावू नको

पण फुकट! हे रोज चालले: वाट पहाणे, डोळे सारखे लावून बसणे, शेवटी मनोमनी झुरणे – सगळं सगळं झालं. बोलणं शोभत नाही भारतीय नारीला, हिय्या केला अन् शेवटी विचारलं...

आपके आगाके क्या मायने हो चले भारी?
मुझे बताकजी तुम क्यं जाते रात स्वारी?॥

याला उत्तर कसले येणार? दोन थपडा, चार लाथा. माझ्या आनंदाचा चक्काचूर झाला. अन् विचार – विचार – विचार. सखी मला विचारते, झालं ग काय तुला? मी म्हणाले...,

लक्ष्मी आली ग आली। उठून बसत
माझा नाही ग। याला नवल्याचा पुसत॥

(लक्ष्मी) मला विचारीत होती तेवढाच आनंद...आता...आता...शून्य – एक दिवस माझी प्रेमळ आई आली. किती प्रेमानं वागली! बाळाला पाहत बेहोष झाली. अन् सुरू झाली माझ्या आईला शिवीगाळ. आमच्या सासूबाईंना पण ते खपलं नाही. त्यांच म्हणाल्या त्याला, मूक मुनेरची असेल तर तू मुनेरला काय बोलायचं ते बोल. पण...

मातेवरी शिव्या।
नको देऊ स्वामींना।
आधी केले तुझी माया।
मग अस्तुरीच्या घोता।

झालं, आगडोंब उसळला नि स्वतःच्याच आईचा उद्धार सुरू झाला. हे मी कसं सहन करू? मीही मग चिडले...

अरे नको म्हणू पुता। मातेला अवदसा।
तुला जन्म दिला। नव्हता तिचा भरवसा॥

तो तारुण्योन्मादात वाटेल ते बरळत होता. थेरडे काय, म्हातारी घोडी काय... अन्...माझी तळपायाची आग मस्तकाला भिडत होती...

नको! नको म्हणूं पुता।
मातेला केगामती।
अरे तुला जन्म दिला।
मग अस्तुरी कुठें होती?॥

तो पुनः माझ्याकडे वळला नि 'प्यारन्'च्या रूपलावण्याची, तिच्या नाचगाण्याची तारीफ करू लागला. म्हणाला, "ती बाजारबसवी असेलही, पण रस्त्यानं चालताना तिची 'नजर आणि पदर'...नाव ठेवायला जागा?" मग मी उसळून म्हणाले,

अरे किती करशील। रांडेची बढाई
वाटेवरली बोर। आल्यागेल्याने झाडावी॥

प्रश्न संपला नाही. धुमसतच होता. आडावर गेले तर आयाबाया माझ्या रडवेल्या चेहऱ्याकडे बघायच्या. ओलावा द्यायच्या, पाठीवरून हात फिरवून विचारायच्या आणि न राहवून मी म्हणतसे

आईबापानं लेक दिली।
आपुली सोय केली
काय सांगु तुला।
गाय कसाबाला दिली॥
चिक्कन सुपारी।
अडकित्या बारा फोडी
पुरुषाला माया थोडी।
अस्तुरीची जात येडी॥

आणि खरंच, स्त्रीची जात वेडीच नाही का? घरी आले पाण्याची घागर घेऊन, तो स्वारी चिंताक्रांत बसलेली. पुनः मी उसळी घेऊन एकान्त साधला...हृदय उकलले...

अरे चिक्कन सुपारी।
अडकित्या चक्काचूर

## ॥१९५८ ॥

- या वर्षाच्या सुरुवातीला कार्यक्रमाचे पैसे काही ठिकाणी लोकांनी बुडवले.

२० फेब्रुवारी वडघेर भैरव येथेच बुद्ध जमातीने भव्य मिरवणूक काढून सत्कार केला. एका अक्खड म्हातारीने ओवाळताना केलेली संयुक्त महाराष्ट्राची घोषणा अविस्मरणीयच आहे.

## ॥१९५९ ॥

- नेहमीप्रमाणे ठिकठिकाणी कार्यक्रम. चेकोस्लोवाकियाला जाण्याचे ठरले.

७ मे चेकोस्लोवाकियाकडे जाण्यासाठी विमानाने रात्री ११ वा. मुंबई सोडली.

८ मे सकाळी सूर्योदयाला दमास्कसला पोचलो. तासभर थांबून त्याच विमानाने प्रागकडे निघालो. दुपारी २च्या सुमारास प्रागमध्ये. घ्यायला लोक आले होतेच.

९ मे आज सकाळी उठताच न्याहारी करून चेकोस्लोवाक प्रजासत्ताक-दिनाची परेड. लाखो लोक अतिशय शांत — चेक जनतेची शांत जीवन जगण्याची उत्कटता पाहिली; त्यासाठी पुनःबलिदानाची तयारी पाहिली. संध्याकाळी बोटिंगसाठी सगळे प्रतिनिधी बाहेर पडले. गाणी म्हटली. सर्वांना आवडली. मला आग्रहाने खूप गाजले.

१० मे पहिल्या चार्ल्सचा कैरस्टाईन किल्ला पाहिला. तिथून मोवा रोविमिया बीच पाहायला गेलो. तिथेच हिरवळीवर लोकांपुढे नदीकाठी गाणी म्हणायला सुरुवात केली. सर्वांना आवडली. स्लॉप धरण पाहिले.

११ मे राजवाडा व जुन्या चर्चेसमधून असलेली सौंदर्यस्थळे

पाहिली. म्युझियम पाहिले व अँबेसीला भेट दिली.

१२ मे फिल्मस्टूडिओ पाहिला. टागोर-दिनानिमित्त अडीचशे-तीनशे लोक हजर होते. मी गाणी म्हटली.

१३ मे आजपासून टी. यू.ची बैठक सुरू झाली. केवढी शिस्त ही.

१५ मे प्राग रेडिओसाठी गाणी दिली.

१७ मे रात्री क्लबमध्ये पार्टी झाली. मी सुंदर गाणी म्हटली...त्या सुंदर मुलीनं माझं चुंबन घेतलं.

१८ मे आज गोटवाल्डावला गेलो. कामगारसंघटनेकडून स्वागत.

२६ मे आज संध्याकाळी प्राग सोडले. इटली(रोम)मार्गे मुंबईकडे निघालो.

• मंगळवेढे, बेळगाव, विजयनगर, खानापूर, बारामती, कोल्हापूर, निपाणी, नगर, मराठवाडा इ. कार्यक्रम.

## ॥१९६० ॥

• इंदूर, वालचंदनगर, जुन्नर, धुळे, खानदेश, सोलापूर, वर्धा, नाशिक इ. ठिकाणी कार्यक्रम.

७ फेब्रुवारी शैला-जयसिंगचे लग्न आपल्या हॉलमध्ये घडवून आणून कोल्हाटी जमातीच्या रूढींना धक्का दिला.

## ॥१९६१ ॥

१७ जुलै मोठ्या कष्टाने हेलसिंकीचा पासपोर्ट मिळाला. तो घेऊन पंजाब मेलने दिल्लीस निघालो.

२२ जुलै पहाटे ६ वाजता अफगाण एअरलाईनने काबूलकडे रवाना. सोबत रोझा देशपांडे, हरी जाधव, विठ्ठल जाधव, शिवाजी दळवी. सायंकाळी ताश्कंदला पोहचलो. मॉस्को

विरुद्ध ताश्कंद फुटबॉल मॅच पाहिली. पावणेनऊ वाजता ताश्कंदला सूर्य मावळला!

२३ जुलै पायोनियर कँप – भेटीदाखल गेलो. मला गावे लागले. दुपारी ताश्कंद नागरिकांतर्फे स्वागत. तिथेही मला गावे लागले. हेलसिंकी-अझरबैजान.

२५ जुलै आज मी बेभानपणे नाचलो. गायलो. प्रचंड स्वागत. वाळवंट संपेना. रात्री ओल्गा ओलांडली तो थंडावा सुरू झाला.

२८ जुलै पहाटे तीन वाजता विस्वर्क स्टेशनवर धुंद खेळ खेळलो. नाचनाचलो. 'मुका घ्या, पळा' या खेळात भाग घेणे अपरिहार्य ठरले. सारी रात्र जागलो. चार मुलींचे मुके घेणे भाग पडले. आजची रात्र धुंदीची रात्र गेली – अगदी न पिता.

३० जुलै आमच्या येथील वास्तव्याला अर्थ नाही. काहीसुद्धा. कँपफायरमध्ये भाग घेतला.

१ ऑगस्ट 'तांपेरे', 'अन्‌नोन सोल्जर' ही नाटके पाहिली. टेक्निकली हायक्लास.

२ ऑगस्ट रुमानियन डेलिगेटस्‌ना भेटलो.

३ ऑगस्ट हंगेरियन डेलिगेटस्‌ना भेटलो.

४ ऑगस्ट रशियन डेलिगेटस्‌ना भेटलो.

५ ऑगस्ट रात्री टेक्निकल स्कूलच्या थिएटरमध्ये नॅशनल प्रोग्रॅम झाला. अतिशय सुंदर. सुरूवात माझ्या गाण्यांनी झाली व अखेर पण माझ्या गाण्याने झाली.

९ ऑगस्ट मॉस्को नगरीत प्रवेश. मास्कुवा हॉटेलात उतरलो. लेनिनच्या समाधीला भेट. क्रेमलिन राजवाडा पाहिला.

११ ऑगस्ट चार गाण्यांचे मॉस्को रेडिओसाठी रेकॉर्डिंग झाले.

१२ ऑगस्ट बातमीदार खुष्कीनने माझी मुलाखत घेतली.

* यानंतरची पानं कोरीच आहेत. मुद्दाम मौनव्रत घेतल्याप्रमाणं. एखाद्या दुखावलेल्या पाखरानं पंख मिटून पानांआड लपून जावं तसं. यानंतर त्यांनी डायरी लिहिलीच नाही. भरपूर दौरे – पत्र – कोट्यवधी लोकसंग्रह – ललित लेख वगैरे...

२१-४-६२ ला 'प्रपंच' या चित्रपटाला स्टेट ॲवॉर्ड मिळालं आणि त्यातल्या 'गोरा कुंभारा'च्या अविस्मरणीय भूमिकेबद्दल भाईना सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचं स्टेट ॲवॉर्ड मिळालं !!

# गर्जा जयजयकार!

ही गोष्ट खरी की कालिदास, भवभूती हे इतिहासकार नव्हते. त्यांनी काव्य लिहिले, ते इतिहासाने घेतले आणि इतिहाससुद्धा काही कलेच्या क्षेत्रातली वाटेल ती फडतूस चीज उचलून घेत नाही. इतिहास जितका कठोर, निर्घृण, सत्यवक्ता असतो तितकाच तो अत्यंत साक्षेपी, विचक्षक आणि रसिक असतो.

आणि याचा विचार करता करता माझ्या आयुष्यातले ''गर्जा जयजयकार''चे एक पान माझ्या डोळ्यापुढे फडफडू लागले...

ते एकोणिसशे एकोणचाळीस साल असावे. काही महिन्यांचा काळ लोटला असेल. माझे मित्र श्री. कऱ्हाडकर (कॉम्रेड) पकडले गेले. त्या दिवशी ब्रिटिश सरकारच्या निषेधाची सभा होती. त्या वेळच्या अकारण धरपकडीचा मजवर खूप परिणाम झाला. त्या दिवशीच्या सभेस चारपाच हजारांचा जनसमूह हजर होता. स्त्री, पुरुष, कामगार, मध्यमवर्ग, व्यापारी.

प्रस्तावनेनंतर मी 'गर्जा जयजयकार' ही पहिली ओळ प्रेक्षकांत सोडली. प्रेक्षक शून्यमनस्क झाले होते आणि मी मग पुढे गाऊ लागलो :

'खळूखळू द्या या अदय साखळ्या हातापायांत / पोलादाची काय तमा मरणाच्या दारात'

या ओळींना वेगळीच निर्धाराची धार आली. त्या दिवशी ओळीगणिक कारुण्य; देशप्रीती व दृढ विश्वास त्या काव्याद्वारे लोकांपुढे मूर्तिमंत उभा राहिला.

'एकच तारा समोर, आणिक पायतळी अंगार.'

वातावरणात नितांत अशी करुण गंभीरता निर्माण झाली. अस्फुट स्वर शब्द-पंक्ती घेऊन निघाला होता...

'श्वासांनो जा वायुसंगे ओलांडून भिंत
अन् आईला कळवा आमुच्या हृदयातील खंत
सांगा वेळी तुझी मुले ही या अंधारात
बद्ध करांनी अखेरचा तुज करिती प्रणिपात.
तुझ्या मुक्तीचे एकच होते वेड तया अनिवार, आईऽऽ''

या ओळी काही माझा आवेग थांबवू शकल्या नाहीत. अश्रूंचे बांध फुटले, वाटले, गीत पुरे होत नाही; पण समोरच्या माझ्या माताभगिनींचे आणि भाऊबांधवांचेही मजसारखेच झाले होते. तेही सगळे डमडमच्या तुरुंगातील श्वास वेचायला गेले होते. मला धीर आला. प्रेक्षक-श्रोत्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले आणि मग सांत्वन...

''कशास आई भिजविशी डोळे उजळ तुझे भाल
रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उषःकाल
सरणावरती आज आमुची पेटताच प्रेते
उठतील त्या ज्वालांतून भावी क्रांतीचे नेते...

यातून कवीचा पोलादी निर्धार त्याच्या शब्दाच्या कणाकणातून स्रवत आहे असे मला वाटले. नि शेवटी 'आता कर ओंकारा तांडव' -- जीवन सार्थकी लागल्याचा वेहोष आनंद धो-धो वहात होता. शब्दपंक्तीतून, याच धुंदीत गीत संपले. लोक होते, लोकांच्या भावना होत्या; पण त्या भावना टाळ्या, जयजयकार वा धिक्कारांनी व्यक्त होऊ शकत नव्हत्या. वातावरणाचा परिणाम पाहून वाटले की, देशात एक प्रचंड चिता पेटली आहे. तिची हाय लागून समोरचे हजारो चेहरे भाजून निघाले आहेत; पण त्या चेहऱ्यांवरचे दोन निखारे मात्र फुलून अंगारागत रसरसू लागले आहेत.

त्या दिवशी त्या कवितेला लागलेली चाल हेतुपुरस्सर मुळीच लावली नव्हती. त्या चालीने डमडमच्या तुरुंगातील राजबंद्यांच्या भावना कवीच्या काव्यातून करता येतील तेवढ्या साकार केल्या. बाया, पोरे, मजूर, मारे -- मध्यमवर्गासहित सगळे -- एका पातळीत जाऊन शोकसागरात डुंबत होते, काव्यानंदही लुटीत होते.

दडपशाहीचा वरवंटा जोराने फिरू लागला. माझ्यासकट एकोणतीस कामगार पकडले व आम्हांला तुरुंगात घातले. बार्शीला तुरुंग नाही. तेव्हा आम्हांला एके रात्री सव्वा दोन वाजता उठवून सांगितले, ''चला!'' बेड्या आणि दोरखंडांनी आम्हांला बांधले. मी जुना कार्यकर्ता म्हणून मला दोनदोनच्या रांगेत आघाडीलाच ठेवण्यात आले होते व माझ्या बेडीत दोरखंडाने बांधला गेलेला हात जो होता तो कडली बसप्पा या चरोडेखोराचा! आम्ही निघालो, स्टेशनवर जायला. मुद्दाम आम्हांला रात्रीच्या वेळी बाहेर काढण्यात आले होते, लोकांना कळू नये म्हणून. मग मुल झाला

आमचा जोडी-मार्च. अधिकाऱ्यांना वाटले की ही रात्रीची वेळ ठीक काढली यांना इथून हलवायसाठी; पण त्यांना ते समाधान मिळाले नाही. कचेरीच्या बाहेर पडलो तोच आम्ही साने गुरुजींच्या 'आता उठवू सारे रान' या गीताने रान उठवायला सुरुवात केली. झाले, सारा गाव भराभर रात्रीच्या काळोखातून उठून आमच्या भोवती जमू लागला आणि मग आम्ही त्या कैदी अवस्थेत गायला सुरुवात केली, 'गर्जा जयजयकार!' व मग लोक त्या प्रशांत रात्रीला धक्का देत आम्हांला साथ करू लागले, 'गर्जा जयजयकार!' गावातून स्टेशनला रस्ता गेल्याकारणाने सगळे गाव लोटले साथ द्यायला. तो रात्रीचा काळोख, हातांत बेड्या, कामगारांची जिव्हाळ्याची ज्यारीची आणि राजबंदी-सुटकेची मागणी, दंड करकचून बांधलेले, सोबत खाकी गणवेशातील बंदूकधारी पोलीस, सारे स्टेशन म्हणत होते, 'गर्जा जयजयकार!' जनमनाला, त्या वेळी काय वाटले असेल याची वाचकांनी कल्पना केलेली बरी! कुर्डुवाडीत जी.आय.पी.च्या मोठ्या डब्यात आम्ही बसलो. मागील बाजूस साईट-मधून आलेल्या लोकांनी 'गर्जा जयजयकार' म्हणायला भाग पाडले. तो काय, मग प्रत्येक स्टेशनावर ही झुंबड 'गर्जा जयजयकार' ही कविता ऐकायला.

तुरुंगात मी मुक्तकंठ गात असे. सैगलची गाणी कधी गात असे, तर कधी के.सी.डे.; तर कधी देशभक्तिपर गीते. त्यांत 'गर्जा जयजयकार' हे आमच्या जेलच्या हवालदारांना खूप आवडे. समोर पिठूर चांदणे. चिमटे काढणारी गुलाबी हवा. गजांजवळ बसून मनसोक्त गाणे म्हणणे सर्वांच्याचसाठी चिरंगुळा असे.

ऑस्ट्रेलियन जेमरची बदली झाली व त्या ठिकाणी कुणीतरी गुजराथी वा मध्यभारतीय जेलर आला. त्याची शिस्त कडक. आरडाओरडा म्हणजे बेशिस्त होती त्याच्या दृष्टीने व बेशिस्तीला शिक्षा असे त्याच्याजवळ, आणि सुरेलपणे गाणे हेही त्याच्या दृष्टीने बेशिस्त होते. मला त्याचा हा नियम गाण्याच्या दृष्टीने जाचक वाटत होता. मी गात असे, त्याचा रिपोर्ट त्याच्याकडे जात असे. पण...तो काही मला शिक्षा करू शकत नव्हता. मी सजा झालेला कैदी असलो तरी राजकीय कैदीच होतो. माझ्यासाठी जेलमधले इतर राजबंदीच नव्हे, तर गुन्हेगार कैदीही प्रतिकारार्थ उभे राहिले असते. माझे गाणे चालूच असे.

तो काळ मोठ्या धकाधकीचा. आमच्या तिसऱ्या वर्गाच्या कैद्यांना बाहेरचे काही म्हणजे काही कळत नसे. कळे ते राजकीय कार्यकर्त्यांना दरदरशत बसणारेच फटके: अमुक अमुक प्रांतातल्या कैद्यांना अज्ञात स्थळी नेले. काही कॉम्रेड्सना हालहाल करून अज्ञात स्थळी नेऊन मारल्याचेही आम्ही ऐकले होते.

त्या दिवशी नेहमीप्रमाणे आम्हास सात वाजता कोठडीत बंद केले. मी तीन दिवसांनंतर सुटल्यावर काय काय करायचे याविषयी बेत आखीत बसलो होतो.

जेलच्या आयुष्यात सुटका जसजशी जवळजवळ येते तसतसा मनात एक विचित्र गोंधळ उडायला लागतो. जेलजीवनात नवीन नाती जोडली गेलेली असतात आणि ही नातीसुद्धा बाहेरच्या जगापेक्षा भावपूर्ण अशा रेशमी धाग्याने बांधली गेलेली असतात. कुणी अकारण डांबलेले लांब मुदतीचे सद्गुणी कैदी दोस्त होतात. त्यांच्याविषयीची सहानुभूती त्यांना सोडून बाहेर जाऊ द्यायला तयार नसते, तर एखाद्या परिस्थितीने बदमाष बनलेल्या दरोडेखोराच्या दिलदारपणाचा निर्झर जिवाला ओढ लावीत असतो; तर एखाद्या भयानक दरोडेखोराच्या रोमहर्षक कथा ऐकण्यासाठी आपणास त्याच्याबरोबर रहाता आले तर किती बरे होईल असे मनाला कुणीतरी सारखे डिवचून सतावत असते. एकूण, जेलजीवनातही जेलविषयी एकप्रकारची नवी ओढ तयार झालेली असते.

बाहेरच्या स्वच्छंदी जीवनाची ओढ व आतल्या जिवांची ओढ व संघर्षाने मन बावरते. बाहेरची ओढही प्रभावी ठरते. असाच मी बाहेरची स्वप्ने चितारीत होतो, रात्रीच्या आठ वाजता गजांशी बसून.

आमच्या जेलमध्ये सगळ्यांत जास्त, एकशे दहा वर्षांची शिक्षा असलेला 'अफगाण डाकू' हा माझ्याच कोठडीत होता. तो बोलला,

"क्यों भाई अमर, बाहरके सपने देख रहे हो? मै क्या देखूं! जरा गावो तो सही. सुनाव आझादी का गाना. बस, उसमें ही मगनमस्त रहेंगे. गावो प्यारे."

"नही अफगाण, गीत तो बस मै आज तुम्हाराही सुनूंगा." त्याचा आवाज डोंगरासारखा उंच उंच होता. बलुची भाषेत तो काय गातो हे आम्हांस कळत नसे, पण त्याच्या सुरेल सलकाऱ्या मनाला भाव मोहरून सोडीत. "भाई अफगान, बस तुम्हारी ही दर्दीली ललकार मैं अपने मनमें समा लेना चाहता हूं आज."

इतक्यात खाड खाड करीत माझ्या कोठडीजवळ तीन हवालदार आले व एकाने आमच्या कोठडीचे दार उघडण्यासाठी कुलुप्यांना हात घालीत करड्या आवाजात म्हटले, "अमर शेख!"

झाले, कोठडीतले आम्ही आठही जण सर्द झालो. मी समजून चुकलो. कारण स्पष्टच होते. एकदा सहा वाजता कोठडी बंद झाली की दुसऱ्या दिवशी पहाटेच उघडली जाणार. काही झाले तरी मध्यंतरी जेल-कोठडीचे कुलूप उघडले जाणार नाही. अगदीच सीरियस केस असेल तरच ते उघडे. मग आज ही उघडली जात आहे कोठडी! अमर शेख नावाचा पुकार! काहीतरी भानगड! म्हणूनच कुठेतरी 'अज्ञात' स्थळी रवानगी अमरशेखची! बस, झाले. सर्वांचे चेहरे मलूल झाले. डोळे पाणावले. मी गुपचूप उठून सर्वांना नमस्कार केला. सद्गदित कंठाने सर्वांचा निरोप घेतला. खाड् खाड् असा होणारा बुटांचा आवाज, बेड्यांचा आवाज, हवालदारां-

जवळच्या किल्ल्यांचा व त्यावर असणाऱ्या कमरेवरच्या दंडुक्याचा आवाज भयानक भेसूर अशा शांततेला कापरे भरवीत होता. मी हवालदाराच्या बरोबर शांत चित्ताने निघालो होतो, ते 'अज्ञात' स्थळीचे भयंकर चित्र रेखाटीत!

शेवटी जेलरच्या ऑफिसमध्ये मला नेण्यात आले. तिथे डेप्युटी जेलर सामोरे येऊन मोठ्या नम्रतेने "या, या" म्हणाले. मी मनातल्या मनात म्हणालो, 'चला, भरले दिवस.' कारण त्यांच्या नम्रतेतसुद्धा अधिकाराचा करडेपणा होताच. तो कसा लपणार? मला वाटलं, हा कसाब कापण्याआधी तोंडात पाणी घालतोय. घालू द्या. चला, म्हणून त्याच्याबरोबर आत जेलरच्या खास हॉलमध्ये गेलो, तो काय तिथे स्वच्छ बिछायत टाकलेली. लोडतक्के पडलेले. जेलचे डॉक्टर, कारकूनवर्ग, डेप्युटी जेलर तिथे लोडतक्क्याशी बसले असून, मी जाताच आदबीने सरकासरक झाली. जेलर पुढे आले, त्यांनी मध्ये अंथरलेल्या मृगाजिनावर नेऊन मला बसवले.

मी दिङ्मूढ झालो. क्षणभर इंद्रियांना बधिरताच आली.

"देखो भाईसाब," जेलर म्हणाला, "तुम्ही तीन दिवसांनी सुटून जाणार. माझा आनंद आज गगनात मावत नाही. पण त्याला तुमच्या प्रसन्नतेची जरुरी आहे." जेलरला अनेक भाषा येतात हे मला ठाऊक होते; पण त्याच्या या मराठी वाक्याचा मला काही अर्थ कळेना. मी तसाच होतो – होतो तसाच कोराच्या कोरा! माझ्या अंगात चौकडीचे कैदी कपडे, अवतीभवती जेलचे अधिकारी. त्या वेळची ती राजकीय परिस्थिती, त्यात या अधिकाऱ्याची ती भाषा. अगदी घुम्यासारखा बसून होतो काही क्षण!

"भाई अमर शेख, मला आजवर झाली अपत्यं – पण त्या सगळ्या मुलीच. तुमच्या सदिच्छेने या वयात, जवळजवळ पन्नाशीत पुत्ररत्नाचा लाभ झाला. तुम्ही परवा जाणार. फक्त चार गाणी म्हणा. आमच्या आनंदात सामील व्हा."

कोडे सुटले. मीही जरा खुला झालो. इकडचीतिकडची चार गीते मी म्हटली. पुन्हा आग्रह होऊ लागला. हवालदार मंडळीतून आवाज आला, 'गर्जा जयजयकार.' जमादार होते दोघे, त्यांनी पुकार केला, 'गर्जा जयजयकार.'

मला विषाद वाटला. खरं म्हणजे याच गीतामुळे मी या जेलरच्या रोषास पात्र झालो होतो. "हवालदार, या प्रसंगी ते गाणं कसं चालेल? साहेबांना ते आवडणार नाही. माझी म्हणायला हरकत नाही." असं मी म्हणताच जेलर म्हणाले, "नाही अमरभाई, आज आता तुम्ही स्वतंत्र आहात. मी जेलर नाही, तुम्ही कैदी नाही. फक्त आनंद – मुक्त आनंद. बोला, बोला, काय वाटेल ते बोला. म्हणा तरी पाहू! कसं आहे ते ऐकू द्या तुमचं 'गर्जा जयजयकार'."

अंगावर कैदी-कपडे, अर्ध्याएका तासापूर्वीची माझी मनःस्थिती आणि तत्कालिन

राजकीय परिस्थिती आणि डमडमच्या तुरुंगातलं ते गीत 'गर्जा जयजयकार' एवढे शब्द निघाले तोंडातून नि मी...सगळे बंध तुटले.

देह अधिकाऱ्यांसमोर होता; पण आत्मा त्या काळ्याकभिन्न रात्रीच्या गजांआड थाड् थाड् डोके आपटून गर्जत होताः 'गर्जा जयजयकार!', 'गर्जा जयजयकार!' गीत संपले आणि आत्मा चरकातून काढल्या चिपाडागत देहात येऊन मलूलपणे पडला.

मी सभोवार पाहिले. कुणीच टाळ्या मारल्या नाहीत. बरेच लोक त्यांतले रडत होते. आणि खुद्द जेलर...तेही रडत होते. शेवटी "हम पेटके कुत्ते है दोस्त, इन्सानियत हमें छोडकर चली गई" असे म्हणत पुनः त्यांच्या गालांवर अश्रू ओघळले. "क्षमा करो भाई...हम लोगों के लिए..." असे म्हणत त्याने माझे हात गद्गदा हलवले. मूठ भरून पेढे त्यांत टाकले. हळूच म्हटले, "गर्जा जयजयकार." मीही म्हटले, "गर्जा जयजयकार."

सर्वांचा निरोप घेऊन मी पुनः आपल्या कोठडीकडे आलो, तो सगळे आश्चर्यचकित झाले. मी कोठडीसमोर उभा राहिलो. हवालदार दार उघडू लागले, कैदी मित्रांची उत्कंठा अनावर झाली. सगळे एकदम विचारू लागले, "भाई, क्या हुवा? भाई, क्या हुवा?" दार उघडण्याआधीच गजांजवळ असलेल्या माझ्या त्या कैदी मित्रांच्या तोंडात एक एक पेढा कोंबून मी ओरडून म्हटले – "गर्जा जयजयकार!" ते पेढा खात खात ओरडले – "गर्जा जयजयकार."

'गर्जा जयजयकार' या गीताच्या अशाच अनेक स्मृती माझ्या उराशी आहेत. पण ही वरची आठवण पुरी होते. जेलमधून बाहेर पडताना डेप्युटी जेलर निरोप देतो. तेव्हाच तो निरोप देताना मला म्हणाला –

"भाई, तुम्ही फार चांगली माणसं आहात. जेल म्हणजे शुद्ध नरक! तुम्ही इथे पुनः येऊ नये. बरं तर, 'गर्जा जयजयकार'" म्हणून त्याने नमस्कार केला. किती विरोधाभास होता त्याच्या वाक्यांतः जेलमध्ये येऊ नका, पण 'गर्जा जयजयकार!'

असे हे पाषाणअंतःकरणाच्या पोलादी अधिकाऱ्यांनाही कलेच्या तेजाने संभ्रमात टाकून त्यांचं पाणी पाणी करणारे 'गर्जा जयजयकार' काळाच्या उदरात गडप होईल? मला नाही वाटत! कल्पना भाबडी आहे ती!

अगदी आजही, आजही मोरारजींच्या अत्याचारी बंदुकांपुढे रस्त्यारस्त्यावर मराठी आईसाठी देह ठेवणारे हुतात्मे, जगाचा निरोप घेत असताना आपल्या ओठांवर हे गीत आळवीत आहेत.

अन्याय, अत्याचारांचा प्रतिकार करणारे नाशिक, आर्थररोड, येरवड्यात खितपत पडलेले संयुक्त महाराष्ट्रवादी राजबंदी हे गीत गजांआडून आजही

ललकारीत आहेत – आजही. आणि उद्याही – जोपर्यंत अन्याय, जुलूम, पिळवणूक, उपासमार असेल तोपर्यंत – हे गीत दऱ्याकपारींतून घुमत रहाणार आहे.

इतकेच नव्हे, तर जगात बलशाली समानता स्थापन झाल्यानंतरही हे गीत गतेतिहासातील दुबळ्या मानवाच्या आशाआकांक्षा अत्यंत कलापूर्ण रीतीनं रेखाटणारं असं मराठी आईच्या देहाला उजाळा देणारं एक अमोल रत्न म्हणूनच तिच्या साहित्यभांडारात सदैव झळकत राहील याबद्दल शंका नाही.

# मुनेरबी

मुनेरबी हे नाव महाराष्ट्रात कुणाच्याही परिचयाचे नाही. तसें परिचयाचे असायचे काही कारणही नाही. सर्वसाधारणपणे गरिबाघरी एखादी स्त्री जन्माला येते, राबराबते आणि एक दिवस आठदहा पोरांचं लेंढार मागे ठेवून निघूनही जाते. पण खऱ्या अर्थाने पुसटशी खूणही तिची शिल्लक रहात नाही. अशाच अगणित स्त्रियांपैकी ती एक स्त्री. ओबडधोबड ओव्यांतून तिनं मला काही सांगितलं. तिची भाषा तुम्हांला थोडी अपरिचित असणार. कारण तिची भाषा मराठी साहित्यातली विद्वन्मान्य अशी नाही...

तिला जन्मात मी कागदपेन्सिल घेतलेली बघितली नाहीं. ती जन्मानं महाराष्ट्रीय मुसलमान होती. तिच्या समाजात दखनी उर्दू भाषा बोलली जाते, पण व्यवहारात तर सगळीकडे मराठीच बोलली जाते. अर्थात् तिच्या ओव्यांची भाषा पण तशीच, अर्धी उर्दू, अर्धी मराठी. सुमारे पंचेचाळीस वर्षांपूर्वी ती मला शेतावर दिसली. भल्या पहाटे. मराठमोळं, नऊवारी, कासोट्याचं लुगडं नेसलेली. हातांत विळा व आपलं पाच वर्षांचं उघडंबोडकं मूल. पाठीला तान्ही मुलगी. बार्शीगाडेगाव रस्त्यानं, चालता चालता ती थकली असावी, झाडाखाली बसली. उठली न् शेतात कामाला लागली. बांधावर झुडुपांजवळ दोन्ही बाळं तिनं सोडली. मोठं मूल तिच्या मागे सर्वभर हिंडत होतं. दुपार झाली. भाकरतुकडा घेऊन मायलेकरं कोंडाळं करून बसली. भाकरीचा घास गिळता गिळता ती बाळाकडे बघायची नि पुनः आभाळाकडे टक लावायची. तिचं बाळ पहात होतं. बाळाकडे तिनं पाहिलं. बाळापुढचं प्रश्नचिन्ह तिला दिसलं असावं, ती बाळाला म्हणाली,

मेरे नशीबकी।
मैं क्या बोलू कानी (कहाणी)
तू सुनले धीरज जानी।
तेरे नयन ढले पानी।।
जन्ने मेरे माँबाप।
दोनो मेरे सरदार।
ये दोनों के कदमोंसे।
देखी दुनियाका दीदार।।

माझी आईबापांविरुद्ध तक्रार नाही. तेच जीवनाचे पायाभूत जीव, केवळ त्यांच्यामुळे मी या सृष्टीचं अनमोल सौंदर्य पाहू शकले आणि...

जन्नी माँ क्या कवश्या (वहाणा)।
उठा लेती शीरपर।
बत्तीस दूध क्या धारा।
नई फितटा उपकार।।

जन्मदात्या आईच्या वहाणा मी शिरी धारण केल्या तरी तिच्या दुधाच्या बत्तीस धारांचे उपकार फेडायचे म्हटले तरी फिटणार नाहीत. आणि या जन्मी चुकून माझ्या हातून त्या जन्मदात्यासाठी काही आगळीक झाली असेल तर...

जन्नी माँबापको।
मैं कुछ नही बोली बुरा
हात जोड खडे रहूंगी
यारब गुन्हा बक्ष मेरा।।

मी हात जोडून हे परमेश्वरा, तुझ्याकडे क्षमायाचना करते. मी विसरू शकत नाही.

माऊलीची माया।
कसं कथिलाचं पाणी
बाळासाठी माय घिटर्या
घाली घारीवाणी।।

तिच्या उबदार पंखांतच बाल्य उमलत होतं माझं. तिथंच माझी नीज मला

गोंजारीत असे आणि एका भल्या पहाटे...

टाळ मृदुंगांचा आवाज।
येतो माझ्या कानी
या ग या सयांनो।
दिंडी आली आंगणी॥

ती दिंडी, तो टाळ-मृदुंगांचा आवाज. मी भान हरखून बसतसे. मी जन्मानं मुसलमान, पण दिंडीतच कुठे तरी मला माझ्या बंधूचा भास व्हायचा, नव्हे, बंधु दिसायचास. शेजारच्या सख्यांना मी तो दाखवीतसे...

तोंड मानलेला बंधू।
त्याचा वाडा कुणीकडे?
जन दिवाळीची-पूजी (बांबडी)।
हक्क असा त्याच्याकडे॥

आणि दिवाळीच्या दिवशी त्या माझ्या मानलेल्या हिंदू बंधूला मी मनोभावे ओवाळीतसे...

दिवाळीचा दिवा। बंधु ओवाळिले तुला
काय़ची? वाढी गाय। आंदण बहिणीला

कसाईवाड्यात (मोहल्ल्यात) राहिले तरी...जन्मानं मुसलमान असले तरी भारतीय संस्कृतीची माझ्यावर छाया, मी भावाला गाईचं आंदण मागतसे. आणि एक दिवस...

पाहुणा आला बाई। जेवा म्हणते तो जेवेना
मी हाल कसा धरू? बंधू नव्हे तो मेव्हणा

माझी ही शैशवावस्थाच होती, तरी माझी संस्कृती मला हेच शिकवीत होती. मी माझ्या वयाच्या मैत्रिणींबरोबर खेळत असे. त्या माझ्या बरोबरीच्या पण उफाड्यानं वाढत होत्या. माझी दरिद्री अवस्था, मला वाईट वाटायचं, माझा खुरटा बांधा पाहून...

सावणीचा आंबा।
पाणी घालीते पसा पसा
आंबा लवराला (मोहराला)।
येईना बाई कसा?॥

असं वाटायचं...मी खेळांत रमून जायचे...

सायणीचा अंबा।
पाणी घालिते ओंजळी
अंब्याच्या शेजारी माझ्या।
चिंचा व जांभळी॥

शेवटी अंबा डंवरला, चिंचा-जांभळींना बहर आला, आल्यागेल्याच्या तोंडाला पाणी सुटलं. हा निसर्गक्रमच! तरी पण मी म्हणतसे...

रस्तेके मुसाफिर। आम्हे देखके जारे
अस्मान मरें तारे। तेरे हातकू आईने क्यारे?

आणि त्यातूनच एखाद्याकडे मी ओढले गेले हासुद्धा निसर्गक्रमच नाही का?... मलाही त्याची ओढ लागली...

सोमवार दिस। पुंकिल्या भारी पेटा
नजर पडना ग। बाई 'माझा मुखवटा'

आणि मग...ती ओढ भेटीची...ती तगमग...तळमळी...

जिवाला वाटतं। कशी भरारी मारावी
चौखूर हरिणी। कवटाळूनिया धरावी॥

सुदैव माझं...तो सखाही भेटला...भेटीत कळवळून म्हणाले मी...

तुझ्या जीवासाठी। जीव माझा घार घार
कसं सांगू किती। जीव माझा तुझ्यावर

शेवटी मनोमीलनाचा सोहळा आणि त्यातून क्रमानेच एक भारतीय स्त्री म्हणून व्रत, असिधाराव्रत, अपरिहार्य होतं. दिमाखानं, अभिमानानं मी म्हणत होते...

तुळशीला घास पाणी।
तुळशीला न झाल्या मेळी
पतिव्रता माझ्या सये।
कोप न आला माळी

एवढेच नव्हे, तर अहंभावाने इतर बायांकडे तुच्छतेने पाहून मी हिणवू लागले...

कमीन कैवडा कैसा।
महेकता (दरवळतो) गल्ली गल्ली
मेरी असील चमेली।
देखो चढती पीर वल्ली॥

चवचाल केवडा गल्लोगल्ली दरवळत असला तरी माझ्या अस्सल चमेलीसाठी देवघरच लाभणार आणि मग तो जीवनातला एक महान आनंद पण माझ्या — आम्हां उभयतांच्या जीवनात साकारू लागला :

जीवाला जड भारी।
त्यांना कळलं माळावरी
हातीं जोडा धपापत।
राया माझा धूम मारी॥

तसाच त्यानंतरचा तोही क्षण मी अनुभवला भाग्याचा.

उगवला नारायण।
माझ्या अंगणीं परकासला
पोटच्या बाळासाठी।
वटा (ओटी) पसरिला त्याला॥
नारायणा बापा।
सरवांचे बरे कर
पोटाच्या बाळासाठीं।
सरशेवटीं हातीं धर

त्या बाळावर माझं किती प्रेम! कुणी त्याला धक्का लावला, मला सहन होणे शक्य नाही. त्याच्यासाठी मी वाटेल ते करीतसे. अगदी...

शाळेतल्या पंतोजीला।
देऊं केली पैसा वाटी।
अंजान (अज्ञान) माझ्या बाळाला।
नका मारूं लिहिण्यासाठीं॥

किती आनंदात होते मी! आनंद्सागरात डुंबत होते मी! सगळं जग वेगळं होतं माझं. पण काय झालं कुणाला ठाऊक! मिठाचा खडा पडला. काही कारण नसताना आदळआपट सुरू झाली. खरं म्हणजे क्षण आनंदाचा, पण...

पराया म्हरीसाठी।
　　　　का तूं बनला हिरमीर?॥

तरी तो प्रसन्न होईना. मी सर्व दारे खुली केली मनाची, झरत्या अश्रुधारांनी ओवी लिहिली त्याच्या पायाजवळ...

अरे नदीच्या कडेला रे
　　　　बगळा लागला तळाला।
किती सांगूं तीच्या तुला।
　　　　घालूं आमळ (बांध) मनाला॥

तो कुर्यातच बोलला, "उथळ आहे हे तुझं माथावीपण..." तरी पण मी विनवीतच होते:

अरे राजावीलयनं।
　　　　शिवी येते संतापची
ओवी म्हते रे राजा
　　　　सदा तुझ्या आवकाची (आयुष्याची)॥

त्याच्याकडेच माझे डोळे लागले होते. त्याचे चाळे सुरू होते. आयाबाया मला हिणवित होत्या. मी त्यांना म्हणत होते:

अरे पिशानीवर टिळा। (कपाळावचं कुंकू)।
　　　　गोरि काहेती तूं काळा।
तुझे रूप मासूम।
　　　　चाँद कृष्णात साऊला।

माझ्या सया मग माझ्या भोळेपणावर हसून म्हणायच्या:

माईचा यावेरच्या
　　　　म्हशीमरवं ग कसा भेसा?

मी निगरगट्टपणी कृष्णलीला वर्णीतसे:

या यशेच्या कृष्णानं। काय चेंडूचा मांडिला

कसातरी आम्ही दोघे संसाराचा खेळ खेळत होतो. मला वाटले, आता रघू लागला आहे. तो भटकत असे, त्याच्या स्वभावाचा स्थायीभावच तो – भटकेगिरी. मलाही एकदा मुंबईला नेले. आणि नशीब माझे...

हौसानं हौस केली। नार मुंबईला नेली
अग तिच्या डोईवरी। कोळ्याची पाटी दिली।।

मी मुंबईतही पाहिलं, शहरी माणसं ती...भारी नाजुक...

अजी खोकेर्यांके लोकां।
उन्कू कंबल (घोंगडे) बहुत प्यारी
मेरे शहर के चतुर।
हातरुमाल हुवा भारी।

मी आपली मुंबईची शोभा पहाण्यात दंग होते. माझा संसार आता सुराला लागला असून सर्व काही मंगलमय होणार अशा भावनेने चौपाटी ते राणीबाग हिंडत होते. त्या राणीबागेच्या पक्ष्यांच्या मेळाव्यात एक अमंगल टिटवीचा स्वर कानी आला. त्याची चाहूल भयंकरपणे मला जाणवली. मांगल्य मावळले. मायामय मुंबईनगरीत आसवांनी फक्त साथ दिली; धीर दिला. आयाबायांची माया पण धावून आली. मी बोलून गेले :

अग लगनाच्या दिशी। बामन बोलतो मंगळ
काय सांगू सये। जन्म लेकीचा वंगळ।।

किती वंगळ! किती वंगळ!! नवरा कसला हा! कसाई! मला हे जिणे कधीच माहीत नव्हते, त्या नरकात मला पडावं लागलं. त्यानं मला चक्क वेश्यामोहल्ल्यात, वेश्येच्या घरीच नेऊन ठेविले. यांची नाचगाणी, धिंगाणा चालायचा. यांची उष्टी, खरकटी, धुणी, भांडी मी करायची नं माझ्या बाळाला छातीशी कवटाळून मी एका पाणेरड्या, अंधाऱ्या कोपऱ्यात पडून राहायचे. हे का जिणं? मी पुनः पुनः विचार करायचे...

जिणं असं जिणं। कुत्र्यालाही नसावं
तेच माणसाच्या। वाट्याला कां ग यावं?

रडून भागत नव्हतं, दैवाला दोष देऊन भागण्यासारखं नव्हतं, आदळआपटीनं जमत नव्हतं. वाटायचं, ही सवतच आहे आपली, वागू या सवतच समजून तिला. त्याला विनविलं पुनः मी...

जावा तिथं माया। सवती तिथं विचाराने
खरं सांगु सैय्या। वागवाव्या चतुराने।।
जावा तिथं माया। सवती तिथं बाई बाई

**एका झाडाखाली। मग अबोला कशापाई ?॥**
**एका झाडाखाली। अबोला कशापाई**
**तोंड टाकावं शिवून। माणसाला सोपा न्याई॥**

माझे हे मनधुनीचे बोल. मला वाटले, आतां तरी सरळ होईल तो. पण...

**एक्या नारीचा भरतार।**
**खातो दूधभात**
**दोघी नारीच्या भर्तारासा।**
**भाकर गेली रात॥**
**एक्या नारीचा भरतार।**
**पांघरीतो बाई दस (शेला)**
**दोघी नारीच्या भर्तारासा।**
**कसा आला वनवास ?॥**

मी लग्नाची नेऊन पडले वेश्याच्या गल्लीत. नव्हे, वेश्येच्या – बाजारबसवीच्या घरी. घरातल्या मोलकरणीगत खपत मरत होते. तरी मला पोटाला गोळाभर घास मिळायचा नाही. माझं एक मरो, मी वाईट असेन. पण पोटच्या गोळ्यानं काय केलं ? समोर दिवाणखान्यात नाचशिणगार चालू अन् माझ्या बाळाच्या पोटात कावळ्यांचं भेसूर गीत चालू...किती सहन करायचं ? शेजारणीला दया आली. ती म्हणाली :

**दुबळा भरतार। नको म्हणूं तूं आपुला**
**उन्हाच्या तोरंबीला। नाग भुजंग सावला॥**

मग मीही म्हणाले :

**जिवाला जीव देतें। काय देऊं ससल्याला ?**
**नाही ग बाई नाही। माया नाही पापाच्याला॥**

लाथ मारली, लावली आग त्या दुनियेला, नरकातल्या किड्या नरकात सोडून, मी जीव वाऱ्यावर सोडला. मोठ्या कष्टानं अलविदा म्हटलं. पण तो पिच्छा सोडायला तयार नव्हता. मी त्याच्या रांडेची मोलकरीण म्हणून हवी होते ना ? मला शक्य नव्हते. प्रकरण कोर्टात गेले. मी आयुष्यभर पडदा पाळला आणि आता कोर्टाची पायरी ! लोक काय म्हणणार ? आता काय राहिली माझी अब्रू या जगात ? मलिक सुताराची पडदानशीन जवान मुलगी, कोर्टाची पायरी चढलेली ! केवढी भयंकर बदनामी होणार होती माझी ! आणि त्याच वेळी एक नवबालक ओटीत होते, जगात

येण्यासाठी ते आसुसले होते आणि ही कोर्टकचेरी. जगू का मरू ? तोच प्रश्न : जगावे तर कसे ? मरावे तर कसे ? कोर्ट चुकत नाही, कोर्टाने तलाक मंजूर केला. आणि त्याच दिवशी कोर्टाच्या पुढ्यात मी तोंडावरचा बुरखा फेकून दिला. मुक्त झाले. आता जगत होते दोन बाळांसाठी, जवानी जळत होती, लोकांची टीका काळत होती. जीव खात होते. जगत होते. 'काडी मोडीची' जवानमाई म्हणजे वाटेवरलं शेतच. की :

वाटेवरलं शेत। चिमण्या बायांचं माहेर
आम्ही जातीचे कुणबी। केल्या गोफणी तयार।।

मी तयार, धीट झाले, मला मेहमी वाटायचं, जग आपल्याकडे बघून हसतंय, हिणवतंय. मीही म्हणत होते -

हसूं नको व गोरी।
तुझ्या हसण्याचा भरम मोठा
असुरीचा जन्म खोटा।
पुरुषाला नाही तोटा।।

अशा वेळीच आधार शोधतं मन ! भाऊ, बहीण, नातेगोते शोधत मी भावाच्या आश्रयाला गेले.

भानके तुमे भाई।
भैना दर म्हैने लाया
म्हण्येसे भाग्यकू तुमे।
हसते प्यॉका (बोळवण) देना।।

भावाघरी तरी का जन्म काढता येणार होता मला ? तिथंही,...

भाई के घरकु गई।
भावजयी आडीलेकी
(भाई) रखते लाडीचोली मैं।
लाखोंकेया चिंध्या चाकी।।

घरी आले, जिवाला धीर यावा म्हणून शेजारणीकडे थोडे बसायला गेले...

शेजीच्या घरी गेले।
शेजी बोलेनाशी झाली

तिच्या मनामंदी काय।
बया मागायला आली॥

मग मात्र मी ठरवलं, हे जग आपलं राहिल नाही. दोन बाळं एवढंच जग आणि श्रम माझा ईश्वर. दळण-दळण-दळण हाच मंत्र. मी दळीत होते सारखी. मांडीवर तान्हं घेऊन दळण दळताना धन्य वाटे. ओव्यांना फुटत नवे फाटे. मी जात्याला विनवीतसे :

अरे जात्या ईशवरा। नको मला जड जाऊ
जित्या रांडपणी किती। तुला बळ दावूं?॥

अन्नब्रह्माला कुणी ठोकरलं तर मला सहन होत नसे...

जारी (ज्वारी) माऊलीकु जी।
उसेकिने रखे नाव
चलो मेरे घर लग।
ऊद् जलाके पडते पाँव॥

आम्ही गरीब माणसं अन्नदेवतेचीच पूजा करतो. पण अन्नदाता सुखी असेल तरच...नाही तर मी प्रार्थना करीतसे...

पड पड तू पावसा।
गरिबाचा भाजीपाला
माझा बईलाचा धनी।
कुणबी राजा गेग्याजला (गांजला)

बैलाच्या धन्यासाठी केलेली आमची ही आर्त हाक वरुण ऐकायचाच, पण पुनः दुसरी शंका :

वरसिंगा बरसात।
है सोनेरी उसक्या धारा।
अजि मेरे जीका प्यारा।
कां भीगे ओ बंजारा?॥

शंकांचं काहूर – धीर सुटायचा माझा...तो भिजत यायचा. मी त्याला कवटाळीतसे – वेडीपिशी होत असे...

येडा ग माझा जीव।
वाऱ्याच्या पाठी लाग

माझ्या पोटच्या बाळा मला।
धीराच्या गोष्टी सांग॥

माझा बाळराजा...तो पण कसा...दिसायचा कसा?

अंगमे अंगरखा। पावमें जूता तंग
(ओ) मेरे रावेकू देखके। सभी दुष्मन हुये दंग॥

माझा राघू वयात येत होता, मिसूड फुटत होती, त्याच्या सीनच्या पोरांप्रमाणं तो उनाडकीत हिंडत नव्हता. शाळेत नेमानं जायचा. माझा बाळ राष्ट्रीय मेळ्यात शेकडो लोकांना झुलवायचा, हलवायचा...गायचा...

प्रभुराया माझ्या धांव आता...
हीन-दीन कां कांही दया ना
न्यायदेवता कादुनि नेता
न्यायदेवता देउनी आमुची
दास्यशृंखला तोडुनि टाकी...धाव आतां.

"भारतमाताकी जय" – हजारो कंठांतून जयघोष उठायचा. माझा जीव भरून जायचा...तो स्वकृत कवने गायचा:

फडकत हर्षभरे गगनांत
तिरंगी ध्वज हा अभिमानाने
डुलडुलत वैभवात...

"इन्किलाब झिंदाबाद"ची आरोळी गगनाला भिडायची अन् माझी आनंदपर्वणी परिसीमा ओलांडायची...मेलं माझं आईचं मन म्हणायचं:

नटत नटत नट!
निघाला फेरीला
माझ्या बाळाच्या सूरतीची।
भूल पडली गोरीला॥

उगीचच वाटायचं, कुशीत झोपल्या निभ्रांत बाळाची मी मीठ-मोहरयांनी दृष्ट काढायचे. तोही प्रपंचाचा भार उचलायचा, कष्ट उपसायचा. लहान वयातच, ज्या वेळी त्यानं फुलपाखराचं जीवन जगावं त्याच वेळी तो राब राब राबत होता... राष्ट्रकार्यातही झिजत होता...एकुलता एक बाळ पकडला गेला...तीन दिवस, मला काही कळलं नाही. मी बार्शीच्या मामलेदार कचेरीला फेऱ्या घालीत होते रात्रंदिवस.

लोक म्हणत, मी वेडी झाले होते म्हणून...मला माहीत नव्हतं माझंपण...तो जेल भोगत होता...मी शुद्धीवर आले व पुनः जात्याला जुंपले गेले. सासुरवास मी पाहिला, साहिला होता. आता दुसऱ्या कुणाचा मला पहावत नव्हता. हात मोकळे असले की मी जात्याकडे जावं हा देहधर्म झाला...

**सासुरवाशिणी बस।**
**माझ्या तूं जवळी**
**अंजान बाळ माझी।**
**तुझीं मनगटं कवळी॥**
**सासुरवाशिणी बस।**
**माझ्या तूं ओसरी।**
**थोडा दुवा घेऊ दे ग।**
**तुझ्या सीनंची सासरी॥**

इकडे बाळ जेलमधून सुटला. सुटला कसला. कायमचा अडकला. मला त्याचं राजकारण कळत नसे. तो गरिबांचा दोस्त आहे एवढं मला कळतसे. त्याचं लग्न व्हावं, नातू मांडीवर खेळावा...कुठल्या आईला वाटत नाही? मी झटत होते. मुली पहात होते. नवरीचे बाप शंका घ्यायचे...मी म्हणायचे:

**अरे नवरीच्या बापा।**
**काय बघतो वतनाला**
**गुणी पोर तुझी द्यावी।**
**माझ्या रतनाला॥**

लग्न झालं बाळाचं...त्याचं राजकारण, सभा, संमेलन सुटेना...महाराष्ट्राची चळवळ उभी राहिली. बाळ माझा मुंबईत होता. मला जाणे भाग होते. धीराच्या चार गोष्टी त्यानंच सांगाव्या अशी माझी आंतरिक तळमळ. पण त्या गोष्टी सांगायला फुरसद होती कुठे त्याला? मोर्चे, सभा, निदर्शनं, सत्याग्रह...त्याचं ऐकून बायापोरी सत्याग्रहाला निघत. जख्ख म्हाताऱ्या पण निघत. मला रहावलं नाही, मीही नावं नोंदवलं. वय झालं होतं. दमादिविकारांनी, कष्टप्रकारांनी शरीर पोखरलं होतं. तरी सत्याग्रह केला. पकडले गेले, धाप लागली, पोलीस ठाण्यावर काळजी घेतली लोकांनी. पोलीससाहेब म्हणाला, "बाई, या वयात कशाला जीव कष्टवता? "बाबा – " मी त्याला बोलले, "माझं बाळ इतकं करतंय. लोक, बाया, पोरं ह्या चळवळीसाठी जिवाचं रान करताहेत. मी गप्प बसले तर माझ्या बाळाच्या नावाला बट्टा लागल की? अन् आता काय राहिलंय माझं? फिटलं माझ्या डोळ्याचं पारणं!"

आजार बळावत गेला. मुनेरबी पुनः जन्मगावी बार्शीला आली. काळ जवळ येत होता. तिला पुन्हा पुन्हा खुणावीत होता. बांधाबांध करण्याचा इशारा देत होता. तिचे डोळे मुंबईकडे – बाळाकडे होते. शेजाऱ्यापाजाऱ्यांना त्या अंतिम समयी तिनं सांगितलं :

**अजि मेरे जनाजेकू (कलेवराला)।**
**तुम्हें मस्जिदमें रखो**
**अंजान मेरे रावेकी (राघूची)।**
**तिलघडी वाट देखो॥**

शेवटी आनंदानं तिनं जगाचा निरोप घेतला. तिची तार पाहून बाळ मुंबईहून वेळेवर आला. हिंदू, मुसलमान, सर्व पक्षांचे, धर्मांचे लोक तिला पोचवायला आले होते. तिचा राघूही त्यात होता. ती झोपली होती तरी त्याला पहात होती. जणू म्हणत होती :

**मेरे जनाजेका पाया। कलमा बोलके उठाया**
**अंजान मेरे रावेने। सारी खल्कत रुलाया**

तिच्या थडग्यावर तिच्या बाळाने तिचीच ओवी कोरून ठेवली आहे. ती तुम्हांला बार्शी-परंडा रस्त्याने जाताना दिसेल. ओवी अशी आहे :

**दुबळं माझं पण। उद्यां निघूनि जाईल**
**अंजान माझा बाळ। मोल हिऱ्याला येईल**

(या लेखांतील सर्व ओव्या खुद्द मुनेरबीच्याच असून, त्यांच्या ओवीसंग्रहातून काही ओव्या निवडून लेखकाला माहीत असलेला मुनेरबीचा जीवनपट लेखकाने रंगवला एवढेच.)

# बा महाराष्ट्रा, मी फितूर कसा?

तो दिवस मी जन्मात विसरणार नाही! तसे हल्ले माझ्यावर अनेक झाले, अगदी राजकारणात पडल्यापासून — एकोणीसशे तीस सालापासून.

एकोणीसशे बत्तीसनंतर राष्ट्रीय चळवळीत पडल्यानंतर, बार्शी तालुक्यात मी, पिंपरकर, सहस्रबुद्धे, शिराळ, मेवारे आदी मंडळी अधूनमधून राष्ट्रीय चळवळीचा प्रचार करण्यासाठी खेड्यांत गेल्यावर कधी कधी उपासमारीचे तर कधी हल्ल्याचे प्रसंग खूप येऊन गेले. काहींना गिरणीकामगार युनियनचा कार्यकर्ता म्हणूनही हल्ले झाले. एकोणीसशे बेचाळीसनंतर कम्युनिस्ट कार्यकर्ता म्हणून मुंबई, अहमदनगर, सातारा, रत्नागिरी, सोलापूर, कोल्हापूरला कितीतरी हल्ले झाले — कितीतरी.

गेल्या दोन वर्षांपूर्वी मनमाड, न्यायडोंगरी या दोन रेल्वेस्टेशनांमध्ये मांगिलाल या गुंडाच्या नेतृत्वाखाली चालत्या गाडीत कसला रोमहर्षक हल्ला! दीड तास रणधुमाळी! साखळी ओढली जायची, गाडी उभी राहायची. दगड-धोंड्यांनी मारामारी सुरू व्हायची. पुन्हा गाडी सुरू व्हायची, साखळी ओढली जायची, दंगा सुरू व्हायची. आमचे लोक अकरा अन् हल्लेखोर चाळीस-पन्नास! आमचा डबा लहान. त्यात त्यांचे तीन घुसलेले. आम्हांला बाहेरून कुणी सोडवायला आला की त्याला दोनच गुद्द्यांत गुंड लोळवायचे, दगडांचा वर्षाव करायचे. अगदी अमेरिकन चित्रपटाचे प्रात्यक्षिक जणू! कुणाची मध्ये पडायची हिंमत नाही. तो तेरा माणसांचा डबा आम्ही किल्ला समजून लढवीत होतो. मुलीसुद्धा. माझ्या कानाजवळून रक्ताची धार वाहत होती. कपडे फाटले होते. गार्ड, चेकरची मध्ये पडायची हिंमत होत नव्हती. हल्ला कसला, लढाईच ती छोटीशी! पण आमच्या जीवावरची. त्यातूनही आम्ही पार पडलो. तोही हल्ला पचवला.

पण त्या दिवसाचा हल्ला मी विसरू शकत नाही। तो दिवस आंबेडकर जयंतीचा.

चौदा एप्रिल. मी काँग्रेसविरोधी डाव्या आघाडीचा प्रचार करण्यासाठी कुर्ल्याचा कार्यक्रम करून आल्याकारणाने दुपारी जेवून झोपलो होतो.

आरडाओरड्यासह पहिली थाप दारावर बसली. मी उठलो. दुसऱ्या थापेसह दरवाजाचा अडसर मोडला. दार उघडले. मी उठून आत घुसणाऱ्यावर झडप घातली. झगड मारामारी झाली. हल्लेखोर बत्तीस वर्षाचा. मी पन्नाशीपुढे. दोन खाल्ले, दोन दिले. प्रश्न हत्त्येचा, मार खाल्ल्याचा नाही; तो दाराजवळ जे ओरडत आला होता, त्या वाक्यातील अर्थाचा व त्याच्या मुळाशी असणाऱ्या प्रवृत्तीचा आहे!

हल्लेखोर ओरडत आला होता, "अमर शेख मुसलमान आहे. त्याला मारून टाकलंच पाहिजे. त्याने हिंदू बाई पळवली आहे. मी तुरुंगात जाईन, सुटून येईन, अमर शेखला मारून अमर होईन."

मी मुंबईत सातरस्त्याला राहतो त्याला वीस वर्षे झाली. हल्लेखोर माझ्यासमोर लहानाचा मोठा झाला. माझी मुलगी त्याच्यासमोर लहानाची मोठी झाली. पण तिला किंवा कुणालाही त्याने त्रास दिला नाही. माझ्या बिल्डिंगमध्ये रात्रंदिवस वावरून कधी तोंडातून ब्र काढला नाही. मग हे एकाएकी कसे झाले? माझ्या अगोदर गल्लीतील तीन मुस्लिमांना मारहाण करून हल्लेखोर माझ्याकडे आला तो का? अमर शेख मुसलमान म्हणूनच ना? अन् मुसलमान म्हणजे कोण, तर राष्ट्राचा — भारताचा — दुश्मन, फितूर!

आयुष्यभर राष्ट्रीयत्वासाठी झगडून मी फितूर, अन् राष्ट्राविषयी कधीही विचार करण्याची ज्याच्याकडून शक्यताही नाही, तो देशभक्त! मी फितूर — माझ्या-सारखे — जन्माने मुसलमान असले की झाले फितूर! हे कसे?

खरोखरच मुसलमान म्हटला की फितूर असलाच पाहिजे हे बरोबर आहे का? मुसलमान म्हटला की कसाही असो — फितूरच, असे आज प्रचारिले जाते. जन-सामान्यांना भडकवले जाते, आणि हिंदु-मुस्लिम जमातींत सदाच रक्तपात व्हावा असे प्रयत्न केले जातात. माझ्यावरील हत्त्यामागे तरी याशिवाय दुसरे सूत्र असूच शकत नाही!

म्हणून मी ज्या भारतावर अमाप प्रेम केले त्याच्या विचारी सुपुत्राला विचारीत आहे की, 'बा महाराष्ट्रा, तू तरी सांग — मी फितूर आहे का?'

माझा महाराष्ट्र मला सांगतो की, 'तू फितूर नाहीस — नाहीस — नाहीस. नव्हे, अमुक एक जातिजमातीचा माणूसच फितूर असू शकतो हा सिद्धांतच मुळी चुकीचा आहे. बाळा, फितूर-देशभक्त, वाईट-चांगला माणूस होणे जातिजमातीवर अवलंबून नाही. तू जेलमध्ये पाहिलेस. गुन्हेगारीत सर्व धर्मांची माणसे आहेत. वेश्याव्यवसायी, अनीतिमान माणसे एकाच धर्मात नाहीत हे तू पाहिलेसच. पाहतोसच.

पुन्हा मी महाराष्ट्रपुरुषाला विचारले की, 'कदाचित आज तसे नसेल. पूर्वीतरी असे फितुरीपण झाले की नाही? त्यामुळे तर हा कलंक माझ्यामागे हात धुवून लागला नसेल?'

'नाही...नाही,' महाराष्ट्रपुरुष सांगू लागला, 'अठराशे सत्तावनच्या रणधुमाळीतसुद्धा हिंदु-मुसलमान खांद्याला खांदा लावून लढले आहेत. सुळा-फासावर चढले आहेत.' असे म्हणून महाराष्ट्रपुरुषाने माझ्या हातात महाराष्ट्राचा इतिहास ठेवला व वाचायला सांगितले. अन् आश्चर्य हे की जसजसा मी ते वाचीत गेलो तसतसे मला खऱ्याखोट्याचे कोडे उलगडले!

खुद्द शिवाजीमहाराजांच्या दरबारात काझी हैदर हा पर्शियन लेखक संभाजी महाराज राज्यावर येईपर्यंत महाराजांचा खाजगी चिटणीस (पर्सनल क्लार्क) होता. पहिला दर्यासारंग दौलतखान तांडेल कान्होजी आंगऱ्यांप्रमाणेच महाराजांचा एक विश्वासू दर्यासारंग होता. महंमद सिद्दीकसारखा करडा किल्लेदार महाराजांच्या मान्यवर विश्वासूंतला एक विश्वासू होता. अगदी जीवघेण्या प्रसंगाच्या वेळी – अफझुलखानवधाच्या वेळी – शेख इब्राहिम शरीरसंरक्षक होता. आणि मदारी मेहतरची आग्ऱ्याहून सुटकेच्या वेळची कहाणी महशूरच आहे. हा झाला छत्रपती शिवबांच्या वेळचा त्रोटक दाखला.

**खरा इतिहास**

पेशवाईच्या उत्तरार्धात मुसलमानांनीच पेशवाई बुडवण्यात (?) किती वाटा उचलला हेही पाहण्यासारखे आहे.

अगदी पेशवाईचा वारसा सांगणाऱ्यांनीच लिहून ठेवलेल्या इतिहासाची पाने वाचून झाल्यानंतर माझ्यासारख्याला कपाळावर हात मारून 'हेचि फळ काय मम तपाला!' म्हणून टाहो फोडण्यावाचून गत्यंतरच उरत नाही.

ब्रम्हेंद्रस्वामींसारखा माणूस, वस्तुतः ज्याच्या कुलशीलउगमाचा पत्ता लागत नाही तो एक उपटसुंभ स्वामी (?) बनतो नि सावकारीही करतो. इतकेच नव्हे, तर सारी पेशवाई ग्रासून टाकतो. तो देशद्रोही ठरत नाही!

१८५७ च्या ब्रिटिशविरोधी बंडात खांद्याला खांदा लावून ब्रिटिशांशी लढून स्वतःच्या घरादारावरून उंटांचे नांगर फिरवून घेणारा बिहारी मुस्लिमच नव्हे, तर उत्तरेकडील आम मुस्लिम हा द्रोही, फितूर ठरावा ना? आणि बाजी घोरपडे, बाजी मोहिती, खंडागळे-सावंत देसाई, खोपडे, निंबाळकर, जाधव, मोरे ही छत्रपतींना पाण्यात पाहणारी कुळवंत हिंदू मंडळी देशप्रेमी ठरावी हा चमत्कार नव्हे काय? तसाच विचार करायचा असल्यास इंग्रजांची नेटिव्ह फौज ही केवळ मुस्लिमांची वा बाटग्या किरिस्तावांचीच फक्त होती, असेही म्हणण्याचे धाडस कुणी केल्यास आज

जातीयवादी इंझावातीच्या काळात योग्यच होईल. आणि नाही कुणी म्हणावे, सरदार बापू गोखल्यांना फितूर करून घेण्यासाठी आसुसलेला लिंगो भगवान हा आमच्या देशाचा कंठमणी ठरेल. काळ बदलला आहे. जन्माने वा धर्माने हिंदू हाच फक्त देशभक्त असू शकतो, हा आमच्या युगाचा एक सिद्धांत आहे ना!

शनिवारवाड्याचा फितूर बाळाजी पंत, कलकत्त्याचा उमीचंद, साताऱ्याचा बळवंत मल्हार चिटणीस, मालेगावचा न्हावी, सोताराचा नरसू काकड्या, भिंगारचा देशमुख रघुराव बाबा, हे नि यांची वंशावळ, एकूणएक फितुरांची वंशावळ ही यामुळे आज देशभक्त ठरलेली आहे -- ऐषआरामात लोळत आहे.

माझ्यासारखे केवळ जन्माने मुसलमान म्हणून पापी नि देशद्रोही ठरत आहेत! काळाचा महिमा अगाध आहे!

फितुरी, देशद्रोह केवळ जातिजमातींवर, धर्माधर्मांवर अवलंबून असते तर वरची नामावळी वाचायला तरी मिळाली असती का?

१६५६ साली शिवाजीमहाराजांकडे विजापूर दरबाराला कंटाळून सहाशे पठाण नोकरी मागायला आले. महाराजांनी त्यांना नोकरीस ठेवले, त्यांतला एकही शत्रूला फितूर झाल्याचा इतिहासात दाखला नाही. इतकेच नव्हे, तर पेशव्यांचे राज्य राखण्यामध्ये अरब, रोहिले, पठाण, सिद्दी, गोसावी यांनीच मोठा वाटा उचलल्याचे आपल्याला दिसून येते.

धर्मासारखी असंद पेट घेणारी व एकदम भडाका उडवून देणारी भयानक दारू, पेशवे आणि त्यांचे आश्रित अरब, रोहिले, पठाण, शिद्दी यांच्यामध्ये इतस्ततः पसरली असताही हा भडका पेशवाईत कधी उडाला नाही. नव्हे, या दारूने पेशवाईची राखण केली आहे. म्हणून पेशव्यांचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास होता.

पेशव्यांच्या बखरीला वाचा फुटते नि ती सांगते : "श्रीमंत फौज ठेवू लागले, अरबे बोलावून पुण्यास आणिले, नवे फौजेची कलम जारी केली, आला स्वार पायदळ त्याची हजिरी घेऊन चाकरीस ठेविले. दहा हजार अरब व तीन हजार नंगे गोसावी चाकर ठेवले."

असे हजारो अरब पेशवेसैन्यात होते. पण इथे वरूनच सर्व किडले-सडले होते. हुकूम देणारेच मुळी सर्वत्र फितूर. म्हणूनच मोहनीकृत पेशव्यांची बखर म्हणते : "श्रीमंतांनी लढाईची तयारी केली, परंतु मसलतदार कोणी नाही. अवघे मंडळ नवेच. त्यात इंग्रजांचा फितूर सगळ्या सरदारांत झालेला. कोणी इंग्रजांचा पैका खाल्ल्याशिवाय राहिला, असे नाही.

"...सारे सरदार फितुरलेले, इंग्रजांचा पैका खाल्लेला, तेव्हा ती फौज इंग्रज यांशी लढते असे घडत नाही."

खडकीचा पोवाडा म्हणतो :

'फितूर होता ठाव नव्हता चोर,
बातमी फिरंग्याची तयारी झाली सैन्याची.'

शाहीर प्रभाकर म्हणतो :

'ईश्वरसत्ता विचित्र, सारे दैवाने घडविलें.
हरिश्चंद्र आणि रामचंद्र नळ पांडवास रडवियेलें.
फितुरी करुनी सर्वांनी आपसें राज्य मात्र बुडविलें.'

फितुरी सर्वत्र पसरली होती. खाली कमी, वर जास्त.

इतिहास म्हणतो : मुसलमान जास्त प्रामाणिक राहिला. फितूर झाला असल्यास एखादाच – बुंदेलखंडाचा वंधूखान, अधिक नाही.

मालेगावच्या किल्ल्याला १६ मे १८१८ ला वेढा पडला तो १३ जूनपर्यंत, किल्ल्यात फक्त साडेतीनशे अरब शिपाई. इंग्रजी सैन्य तीन हजार. एक महिनाभर किल्ला लढवला त्यांनी जिद्दीने. कुणी न्हावी फितूर झाला. अरब नाही. मुसलमान नाही. त्या अरबांच्या इमानीपणाला बघूनच काळकर्ते शिवराम महादेव परांजपे कळवळून म्हणतात :

"हे अरब कोण? त्यांचा देश कोण – त्यांचा धर्म कोण? त्यांचा धर्म महंमदी, देश अरबस्तान, तरीसुद्धा ते हिंदुस्तानातील आपल्या धन्याच्या राज्याच्या संरक्षणासाठी इतक्या एकनिष्ठपणे बिनदगलबाजपणे लढत होते ते पाहून त्यांच्या कृतज्ञतेबद्दल धन्यता वाटते. त्यांचा प्रामाणिकपणा पाहून त्यांच्या सत्यप्रेमाने अंतःकरण उचंबळून येते. नेत्र अश्रूंनी आर्द्र होतात. हिंदुस्थानातील हिंदु धर्मातील लोकांनी, श्रेष्ठ अशा कित्येक ब्राह्मण लोकांनी आपलीच राज्ये आपल्याच हातांनी बुडविण्याला उद्युक्त व्हावे आणि त्या राज्याचे रक्षण करण्याकरता अरबस्तानातील मुसलमान धर्माच्या दहापाच रुपयांवर पोट भरण्यात संतोष मानून राहणाऱ्या या अरब शिपायांनी आपले प्राण देण्याला तयार व्हावे, हा विचित्र देखावा पाहून कुणाचे मन दुभंगून जाणार नाही?"

हे शिवराम महादेव परांजपे यांनीच लिहिले म्हणून बरे, दुसऱ्याने कुणी लिहिले असते तर तो या संशयकल्लोळात मूर्ख ठरता – नव्हे, महामूर्ख!

सिंहगडसुद्धा इंग्रजांना सुखासुखी मिळाला नाही. जिवावर उदार होऊन तिथे अरब व गोसावी शेवटपर्यंत लढले. दहा दिवस त्यांनी तो किल्ला अल्प सामुग्रीनिशी लढवला हा इतिहास! सोलापूरचा किल्ला साडेपाच हजार पायदळ व आठनऊशे घोडेस्वारांनी लढवला. यांत फक्त अरबच होते बाराशे. यातला एक किस्सा तर

दिलचस्प आहे :

'लढाईला सुरुवात होण्याआधी चैनसिंग या नावाचा सुभेदार इंग्रजांच्या तहाच्या अटी घेऊन पेशव्यांच्या सैन्याकडे गेला. त्या अटी ऐकूनही न घेता, पेशव्यांच्या अरबांनी किल्ल्याच्या भिंतीखाली त्याला ठार मारून टाकले.'

हे या अरब मुसलमानांनी केले. इतकेच नव्हे तर सोलापूरचा किल्ला सरदार पानशे यांच्या नेतृत्वाखाली अगदी शेवटपर्यंत लढवण्यात आला. कित्येकदा त्यांनी विजयाच्या मार्गावरही (वाट)चाल केली होती.

रायगडच्या किल्ल्याचा इतिहास असाच कडवा असून तिथला अरब पठाण सवाईने पेशवाई राखण्याची शिकस्त करता झाला. तालनेर किल्ल्याच्या राखणीतही अरब पठाणांचाच वाटा मोठा होता.

हा इतिहासाचा दावा. आणि मराठी राज्याची राजधानी असलेला रायगडचा किल्ला ज्या पद्धतीने तिथला किल्लेदार शेख अबदुल याने लढवला तो पाहता, आम्हां मराठी मुस्लिमांनी पेशवाईरक्षणात जी शर्थ केली होती त्यावर त्यांनी कळस चढवला होता. वाटले की या शेख अबदुलने हिंदु-मुस्लिमांतले संशयपिशाच्चच पार सप्त-पाताळात गाडून टाकले, एवढी मराठी राज्याविषयी जाज्वल्य राज्यभक्ती त्याने दाखवली. छत्रपतींचा रायगड राखण्याचे — शेवटपर्यंत लढण्याचे जिद्दीने कार्य केले. शेख अबदुल किल्लेदाराने दुसऱ्या रावबाजीच्या पत्नीचे संरक्षण आपल्या आई-इतकेच करून कल्याणसुभेदाराच्या सुनेबाबतीत जो पवित्र आदर्श शिवाजीमहा-राजांनी घालून दिला तोच, अगदी तसाच मातेचाच मान सौ. वाराणशीबाईंना देऊन त्यांचे जिवापेक्षा जास्त जोखमीने संरक्षण केले. म्हणूनच इंग्रजांनी पासपोर्ट दिला असता, अभय दिले असताही वाराणशीबाई किल्लेदार व सर्व शिपायांना टाकून न जाता म्हणाल्या :

"मी तुमच्या संरक्षणाखाली इतके दिवस राहिले. मी तुम्हांला संकटात टाकून शत्रूच्या संरक्षणाखाली कशी जाईन?...येथील माझ्या सहवासाने माझ्या पोटच्या मुलांप्रमाणे तुमच्यासह तुमच्या सर्व शिपायांवर माझे प्रेम जडले आहे. किल्लेदार, तटावर उभे राहू या. हा शिवाजीमहाराजांचा किल्ला आहे. मारू किंवा मरू. किल्ल्याला कुठलाही कलंक लागता कामा नये."

आणि काय आश्चर्य! हा म्लेंच्छ किल्लेदार, यवन किल्लेदार बुरुजाप्रमाणेच ताठ झाला. त्याच्या हाताखालचे अरब, पठाण, मराठे, गोसावी पेटले. इंग्रजांनी रायगड नेस्तनाबूद करायचा चंग बांधला. आतला किल्लेदार शेख अबदुल म्हणाला, "आम्हांला खायला अन्न नसले तरी हरकत नाही. पण आमच्यापाशी जोपर्यंत दारूगोळा आहे तोपर्यंत आम्ही लढल्यावाचून राहणार नाही!"

दिलचस्प आहे :

'लढाईला सुरुवात होण्याआधी चैनसिंग या नावाचा सुभेदार इंग्रजांच्या तहाच्या अटी घेऊन पेशव्यांच्या सैन्याकडे गेला. त्या अटी ऐकूनही न घेता, पेशव्यांच्या अरबांनी किल्ल्याच्या भिंतीखाली त्याला ठार मारून टाकले.'

हे या अरब मुसलमानांनी केले. इतकेच नव्हे तर सोलापूरचा किल्ला सरदार पानशे यांच्या नेतृत्वाखाली अगदी शेवटपर्यंत लढवण्यात आला. कित्येकदा त्यांनी विजयाच्या मार्गावरही (वाट)चाल केली होती.

रायगडच्या किल्ल्याचा इतिहास असाच कडवा असून तिथला अरब पठाण सवाईने पेशवाई राखण्याची शिकस्त करता झाला. तालनेर किल्ल्याच्या राखणीतही अरब पठाणांचाच वाटा मोठा होता.

हा इतिहासाचा दावा. आणि मराठी राज्याची राजधानी असलेला रायगडचा किल्ला ज्या पद्धतीने तिथला किल्लेदार शेख अबदुल याने लढवला तो पाहता, आम्हां मराठी मुस्लिमांनी पेशवाईरक्षणात जी शर्थ केली होती त्यावर त्यांनी कळस चढवला होता. वाटले की या शेख अबदुलने हिंदु-मुस्लिमांतले संशयपिशाच्चच पार सप्त-पाताळात गाडून टाकले, एवढी मराठी राज्याविषयी जाज्वल्य राज्यभक्ती त्याने दाखवली. छत्रपतींचा रायगड राखण्याचे – शेवटपर्यंत लढण्याचे जिद्दीने कार्य केले. शेख अबदुल किल्लेदाराने दुसऱ्या रावबाजीच्या पत्नीचे संरक्षण आपल्या आई-इतकेच करून कल्याणसुभेदाराच्या सुनेबाबतीत जो पवित्र आदर्श शिवाजीमहा-राजांनी घालून दिला तोच, अगदी तसाच मातेचाच मान सौ. वाराणशीबाईंना देऊन त्यांचे जिवापेक्षा जास्त जोखमीने संरक्षण केले. म्हणूनच इंग्रजांनी पासपोर्ट दिला असता, अभय दिले असताही वाराणशीबाई किल्लेदार व सर्व शिपायांना टाकून न जाता म्हणाल्या :

"मी तुमच्या संरक्षणाखाली इतके दिवस राहिले. मी तुम्हांला संकटात टाकून शत्रूच्या संरक्षणाखाली कशी जाईन?...येथील माझ्या सहवासाने माझ्या पोटच्या मुलांप्रमाणे तुमच्यासह तुमच्या सर्व शिपायांवर माझे प्रेम जडले आहे. किल्लेदार, तटावर उभे राहू या. हा शिवाजीमहाराजांचा किल्ला आहे. मारू किंवा मरू. किल्ल्याला कुठलाही कलंक लागता कामा नये."

आणि काय आश्चर्य! हा म्लेंच्छ किल्लेदार, यवन किल्लेदार बुरुजाप्रमाणेच ताठ झाला. त्याच्या हाताखालचे अरब, पठाण, मराठे, गोसावी पेटले. इंग्रजांनी रायगड नेस्तनाबूद करायचा चंग बांधला. आतला किल्लेदार शेख अबदुल म्हणाला, "आम्हांला खायला अन्न नसले तरी हरकत नाही. पण आमच्यापाशी जोपर्यंत दारूगोळा आहे तोपर्यंत आम्ही लढल्यावाचून राहणार नाही!"

पण रायनाक महाराच्या फितुरीने दारूगोळ्याचाच पत्ता दिला. सर्वनाश झाला तरी शेख अबदुलने वाराणशीबाईला अंतर दिले नाही. आईला पालखीत बसवूनच त्याने मानाने पुण्यात आणले.

यवन, फितूर, म्लेंच्छ, देशद्रोही; त्यांचा देश मक्का, या विचारसरणीला पेशवाईत सर्वत्र मिळाला होता पक्का आणि शेख अबदुल किल्लेदाराने तर यावच्चंद्रदिवाकरौ टिकणारा असाच देशभक्तीचा मिळवला होता शिक्का!

पण या महाराष्ट्रा, आज संशयपिशाच्चाच्या राजवटीत हे कुणाला पटत नाही.

पुरातन काळापासूनचे आम्ही या देशाचे रहिवासी आज देशद्रोही, फितूर ठरत आहोत. जन्मतःच देशद्रोही, फितूर ठरत आहोत.

भारतात आज हयात असलेल्या सर्व संस्थानिकांच्या प्रपितामहांपासून अगदी परवापर्यंत — स्वराज्य येईपर्यंत — ज्यांनी इंग्रजांची थुंकी झेलण्याशिवाय काहीही केले नाही, नव्हे त्यामुळेच ते त्या दीडशे वर्षांच्या भयाण अंधकारात संस्थानिक म्हणून मिरवले, मिरवत होते, तुटपुंज्या सत्तेनेही मदांध होऊन संस्थानी जनतेवर अमाप जुलूम करून अमानुष छळ केला व आजच्या घडीपर्यंत चोवीस तास मद्याच्या पेल्यात बुडून, बदफैलीपणात अग्रेसर राहण्यासाठी धडपड केली, ते ऐदी तनखा-बहादर, उगवत्या सूर्याला प्रणाम करणारे संस्थानिक नि त्यांची वंशावळ ही देशभक्त !!

पेशवाई-मराठेशाहीची राखण करणाऱ्या माझ्या निष्ठावंत पूर्वजांनो, तुमचा जमाना वेगळा होता. त्या वेळचा धनी वेगळा होता. समाज वेगळा होता.

रायगडावर महादेवाचे देऊळ चौघडा-सनईने निनादत होते. मशिदीत बांगी आजानाही देत होता.

धर्माधर्मांत सहिष्णुता होती.

त्याही वेळी राज्यसत्ता होती. पण ती राज्यसत्ता कुणी धर्माधिष्ठित करण्याचा प्रयत्न केला की समाजाच जात असे.

माझ्या महान पूर्वजांनो, आम्ही तुमच्या मार्गाने यायचा प्रयत्न करतो आहोत.

त्याचमुळे आजही आमच्यामधून पाकिस्तानी रणगाड्यांचा चक्काचूर करणारा हमीदही जन्माला येतो आहे!

माझ्या आदरणीय पूर्वजांनो, तुम्ही ज्यांच्याशी प्रामाणिकपणाने लढा दिला, त्या इंग्रजांनी आम्हाला दुहीचा मंत्र दिला. संशयपिशाच्च दिले.

तुमच्या काळी एका राज्यकर्त्याची दुसऱ्या राज्यकर्त्याशी लढाई होत असे. तुमच्या जमान्यात एका धार्मिक समाजाची दुसऱ्या धार्मिक समाजाशी लढाई झाल्याचे तुम्हांला ठाऊक नाही. एक हिंदू राज्य दुसऱ्या हिंदू राज्याशी लढत असे.

त्यांच्या सैन्यात अन्य धर्मीय लोकही त्या वेळच्या इमानदारीने लढत असत. मुसलमान राजाचीही मुसलमान राजाशी लढाई होत असे. हिंदू राजाची मुसलमान राजाशी राज्यकर्ते म्हणून लढाई होत असे व लढाईत कुठल्याही धर्माचे सैनिक पेशाला जागून प्राणपणाने लढत.

पण माझ्या पूजनीय पूर्वजांनो, या देशात इंग्रज आले आणि त्यांनी हिंदु-मुसलमान समाजासमाजातच आग लावून दिली. असा हिंदु-मुस्लिम समाजात पहिला दंगा, गाय मिरवीत नेऊन कापायला लावून, रायबरेलीत १८४१ साली घडवून आणला आणि आता पाकिस्तान झाल्यामुळे धर्माधर्मातील संशयपिशाच्चाने भयानक उचल खाल्ली आहे. आता तर त्याने धर्माधिष्ठित राज्यसत्तेला वरदानाची ग्वाही दिली आहे. लोकशाहीच्या नावाखाली अभय दिले आहे. आज मूर्ती फुटत आहेत, मशिदी जळत आहेत. दंग्याला कारणाचीही जरुरी लागत नाही. संशय-पिशाच्च विजयानंदाने बेहोष होत आहे.

माझ्या पूर्वजांनो, तुम्ही शौर्य-पराक्रमाने, इमानाने मराठशाही, पेशवाई राख-ण्याचा प्रयत्न केला, ती तुमची पुण्याई आज मातीमोल ठरली. आज तुमचे आम्ही केवळ वंशज – मुस्लिम वंशज म्हणून फितूर, देशद्रोही ठरत आहोत. एका बाजूला दुःख, दैन्य, दारिद्र्य, उपासमार अन् दुसऱ्या बाजूने 'कानफाटे' म्हणून बेजार!

बा महाराष्ट्रा, खरेच का मी, एक मुसलमान, आणि मुसलमान म्हणून जन्माला आलेला प्रत्येक जण, फितूरच आहे का? सांग, खरे काय ते तूच सांग!

*('अनुपमा', दिवाळी अंक, १९६७)*

# मी अमर बोलतोय...

### आई

जगात आई हेच एकमेव सत्य आहे व बाप ही केवळ कल्पना आहे. जगात पैसे देऊन सर्व मिळतं पण आई मिळत नाही – आपल्या प्राणाचं मोल दिलं तरीही! आणि म्हणून माझ्या दृष्टीनं जगातील सर्वश्रेष्ठ दैवत म्हणजे 'आई' हेच होय. मी मार्क्सवाद मानीत असलो तरी 'आई' हासुद्धा केवळ एक मनुष्यप्राणी मी मानत नाही; तर तीमध्ये मला सत्याचा साक्षात्कार होतो. या जगातलं ते मी पहिलं सत्य मानतो.

'तूच दाविले विश्व मनोहर
हे परमेश्वर आई
तुझ्याविणा या जगी दुजा मज
गे परमेश्वर नाही'

आई म्हणजे प्राणिशास्त्राच्या दृष्टीनं प्राणीच असला तरी एक उदात्त असं मूलतत्त्व आहे.

☐

### शाहीर

जनमनसागरात सर्वभर संचारून नव्हे, तळाशाही ठाव घेऊन, त्यात चाललेल्या भावनोद्रेकांचा आविष्कार आपल्या लेखणीच्या लालित्यपूर्ण ढंगाने – शब्दसामर्थ्याने व्यक्त करून अथवा जनमानस हेलावण्याचं कार्य करतो तोच शाहीर.

☐

### जग

या जगाला वगळून बोलण्यासारखं काय आहे? या जगाला वगळून विचारही

करवत नाही अन् जेव्हा या सुंदर जगाकडे बघून विचार करतो, तेव्हा विचारच संपतो. मती कुंठित होते. मन या जगाच्या सौंदर्यात अडकून बसतं. सौंदर्यानं मंत्रमुग्ध होतं. अन् ह्यानंतर वाटतं फक्त एवढंच, की हेच पाहण्यासाठी सतत मिळावं, सतत जगावं, फिरत राहून पाहावं व पाहत पाहतच जगावं. बस्स.

☐

**जीवन**

जीवन आहे तुझे खरोखर
पाण्याचा बुडबुडा
फुटेल फटकन सुटेल चटकन
जीव तुझा बापुडा

☐

**आदर्श**

जसं मला कळायला लागलं तसं मी सतत एका गोष्टीसाठी कार्यरत राहिलो.

ती गोष्ट म्हणजे एक 'आदर्श' निर्माण करणं. अविरत धडपडत राहिलो. विचलित झालो नाही. पण 'आदर्श' मात्र निर्माण होऊ शकला नाही. जे होतं तेही दिवसेंदिवस खचत, नष्टप्राय होत असलेलं दिसतं आहे.

अंधारागत दिसतं आहे भोवती सारं, अशात जगणं मान्य होत नाही मनाला. 'आत्मयज्ञ'-'आत्माहुती'सारखे शब्द भुरळ घालतात मनाला. पण ते तरी कशासाठी? एक मन दुसऱ्या मनाला विचारतं...खरंच का?

☐

**यश**

रंगमंचावर येताच माझ्यातील 'अमर शेख' मरून गेलेला असतो.

रंगमंचावर जो कोण असतो, तो फक्त समोरच्या प्रेक्षकांचा आत्मा माझ्या रूपानं वावरत असतो. आणि म्हणूनच माझी कलाकृती पाहताना प्रेक्षकाला वाटतं, की आपलीच स्वतःची जीवनकहाणी अमर शेखच्या रूपानं दिसत आहे. म्हणूनच तो तल्लीन होतो व स्वतःला विसरून जातो. हीच माझ्या यशाची गुरुकिल्ली म्हणता येईल.

☐

**अखेर**

मी जगात एकदाच जन्माला आलो. आणि प्रत्येक जण एकदाच जन्माला येतो यावर माझा पूर्ण विश्वास आहे. मरण आले तर ते लाखो लोकांपुढे गाताना, तारसप्तकी स्वर लावताना यावे अशी इच्छा आहे. पण माणसांच्या सर्व इच्छा सफल

होतातच असेही नाही. पण मी अभिमानाने म्हणेन, की माझे जीवन मी अत्यंत यशस्वी रीत्या जगलो आणि जाताना पण त्या विजयाचा आनंद बरोबर घेऊन जात आहे. जग हे फार सुंदर आहे.

□

**माणूस**

मी लहानपणी गुरं सांभाळीत होतो. त्या वेळची माझी बुद्धी, माझ्या आठवणी-प्रमाणे काहीच नव्हे.

आज माझी बौद्धिक प्रगती निश्चित झाली आहे. पण तरीही चार माणसं सांभाळणं, त्यांची लहर, त्यांना वळवणं – अगदी अशक्य. म्हणजेच – माणूस गुरं वळवू शकतो, पण माणसांना वळवणं – त्यांना माणूस म्हणून वळवणं अगदी अशक्य!

*रविवार, १५ मे १९६६*

□

**माझी कला**

माझी कला मी केवळ पोटार्थी आजपर्यंत राबवली नाही आणि यापुढेही राबवणार नाही.

□

**परमेश्वर**

मी परमेश्वर नावाच्या अगम्य शक्तीवर प्रेम केलं नाही. पण सश्रद्ध माणूस परमेश्वरावर जेवढं प्रेम करीत नसेल तितकं, नव्हे त्यापेक्षा जास्त प्रेम मी सामान्य जनतेवर केलं – करीत आलो, करीत आहे...करीत राहणार. ही चूक का? समाजा-तल्या काही ढुढ्ढाचाऱ्यांना तीच माझी चूक वाटते.

माझा नाइलाज आहे.

*गुरुवार, १९ मे १९६६, मुंबई*

□

**निसर्ग**

निसर्ग हा निसर्गतः तारक आहे, उद्धारक आहे. पण तुम्हीच दुबळे असाल तर तो मारकच नव्हे तर संहारकही आहे!

वारा येताच झाडाची सर्वच पाने हलवून जातो. बिचाऱ्या फांदीला वाटतं, आपल्याला न विचारता पानं का हलावीत? अशी असते निसर्गाची लीला अगाध!

**व्यक्ती**

'मला किंमत नाही' असे माणसाने का म्हणावे हेच मला उमगत नाही. ती कृति-उक्तीने मिळवावी लागते. मागून मिळत नसते.

*बुधवार, २७ जुलै १९६६*

□

**कुमार गंधर्व**

'अमर शेख ये मनुज की पुकार है
कुमार गंधर्व मनुज के आत्मा की पुकार है.'

*सोमवार, ३ ऑक्टोबर १९६६*

□

**अनुभव**

आजवरच्या अनुभवानं मला असं म्हणता येईल, की मी रंगमंचावर जाताच अर्धा कार्यक्रम जिंकतो.

कलावंतानं प्रसन्नचित्त, उत्फुल्ल चेहऱ्यानं, आकर्षकपणं रंगभूमीवर पदार्पण करावं म्हणजे त्या कलावंताला पाहताच प्रेक्षकाला आपल्या दिवसभराच्या श्रमा-शिणांचा क्षणात विसर पडावा. बस्स! अर्धं काम फत्ते! मग कार्यक्रमात क्षणाक्षणाला प्रेक्षकाला आपल्या अंतर्मनाचा आरसा दिसावा व त्याला नेत्रसुख, कर्णसुख, कल्पनासुख मिळावं. तसंच त्याच्या विचाराला थोडीशी चालना मिळेल असा उत्कट बिंदू साधावा. मग कार्यक्रम यशस्वी होतोच.

□

**चिंतन**

चिंतन करणे म्हणजे अनाकलनीयतेची पूजा बांधणे नव्हे. त्याच्यासाठी झुरणे, मरणे नव्हे. अनाकलनीयतेला शरण रिघणे (जाणे) नव्हे. चिंतन करणे म्हणजे जीवनविषयक विचाराला चालना देणे व त्याचा नीट वेध घेण्याचा पवित्र व सतत प्रयत्न करणे म्हणजेच चिंतन होय.

*शुक्रवार, ६ मे १९६६*

□

**बदल**

बदल हा अटळ आहे; अपरिहार्य आहे. कालचे मित्र आज झाले शत्रू. आजचे मित्र उद्या होतील शत्रू. आजचे शत्रू उद्या होतील मित्र. बदल हा अटळच आहे.

शत्रु-मित्र हा वर्गीय दृष्टिकोनावरून ओळखावा लागतो, व्यक्तीवरून नव्हे. शत्रु-मित्र निर्माण करणं हे आपल्या संघटनात्मक वर्गीय तत्त्वज्ञानावर अवलंबून

आहे. उदा. व्यक्तिगत जीवनात समाजवादी दृष्टिकोणातून व्यक्तीला दोषी ठरवायचं व व्यक्तिवादी दृष्टिकोनातून कृतिपूर्ण समाजवादाचा विचार न करता एखाद्या व्यक्तीवर शिक्के मारून तिला नामोहरम करणं किंवा गाढव ठरवणं हा ढोंगी समाजवादाचा सुरक्षित मार्ग आहे.

१-१०-६८

☐

समाजवाद

समाजवाद हा व्यक्तिगत सुखदुःखांतून, एखाद्या व्यक्तीच्या तक्रारीतून ओळखणं हे समाजवादी मुत्सद्देगिरीचं दिवाळं वाजल्यासारखं आहे.

समाजवाद मुत्सद्देगिरीला मानतो. ज्याला समाजवादी मुत्सद्देगिरी कळली नाही त्याला समाजवाद अमलात आणणं अशक्य आहे.

१-१०-१९६८, मुंबई-११

☐

आनंद

कुटुंबवत्सल घरातील आनंद हा सर्वश्रेष्ठ आहे. त्या आनंदात न्हाऊन निघालेल्या माणसांचे चेहरे उगवत्या सूर्याप्रमाणे तेजस्वी नि टवटवीत दिसतात. त्या आनंदाच्या दर्शनानेच माणसांच्या अंगात दुप्पट उत्साह येतो व तो मोठ्या उमेदीने हाती घेतलेले कार्य यशस्वी करतो.

प्रयत्न करूनही 'परमेश्वर' कुणाला भेटल्याचा पुरावा सापडत नाही. अतिप्रयत्नांनी मिळतो तो फक्त 'आनंद'. म्हणूनच त्याला विद्वानांनी 'आनंद-ब्रह्म' म्हटले आहे.

आपले कार्य नीट, चिकाटीने करीत राहा. अभ्यासाची त्याला जोड द्या. आणि निकोप विरोधी, श्रद्धेची साथ द्या. तो तुम्हाला लाभेलच — परमेश्वर नाही, आनंद! म्हणून म्हणतो, त्याच्या पलीकडे (आनंदाच्या) काहीच नाही — परमेश्वरसुद्धा. असल्यास तो भ्रम आहे. कितीही डोकावून पाहा. त्याच्यापलीकडे काहीही नाही. काही जण म्हणतात, प्रयत्ने 'परमेश्वर' भेटतो. झूट आहे ते.

६-१२-६५

☐

दोस्तांस

माझ्या मित्रांनो, चाहत्यांनो, दोस्तांनो नि भक्तांनो, कृपा करून औपचारिकपणे माझा जयजयकार करू नका. स्तुतिसुमने उधळू नका. भक्ती तर मुळीच करू नका.

मी काय आहे ते आधी नीट समजून घ्या, मनन करा व मग शिव्यासुद्धा द्या.

मला त्या पवित्र वाटतील.

मुख्य म्हणजे वाचा, मनन करा, मग बोला. तेव्हा मात्र गप्प बसू नका.

□

— माझ्या मागून येणाऱ्यांनो, माझ्या मागे वा बरोबर यायचं नसल्यास येऊ नका. पण येतच आहात तर ज्या पायवाटेनं मी आलो ती पायवाट पुसू तरी नका. स्वतःची पावलं उमटवण्याची तुमच्यात ताकद वा इच्छा असेल तर तुमच्या मार्गानं जा. पण माझी पायवाट तरी पुसू नका. पुसण्याचा प्रयत्न करू नका. कारण ती पुसली जाणार नाही.

२७-१०-१९६५

सहकाऱ्यांनो, एखाद्याबद्दल भक्ती बाळगायला हरकत नाही. पण भक्तीमध्ये अंधश्रद्धा येऊ शकते. ज्ञानात फक्त शिस्त आणि निर्णय व निर्णयाची अंमलबजावणी यालाच महत्त्व आहे.

□

मला कुणी शत्रू नाहीत, पण आमच्या कलापथकाशी शत्रुत्वानं वागणारे थोडेफार लोक आहेत. त्यांना स्वतःचे फड चालवायचे आहेत ना म्हणून ते आमच्या मार्गात काटे पसरवण्याचा खोडसाळ प्रयत्न सतत करीत असतात. पण मी कुणाचं वाईट केलेलं नाही, तेव्हा मला त्यांची भीती बाळगण्याचं काहीएक कारण नाही. मी देव मानीत नाही; पण समाजाचं ऋण जरूर मानतो.

□

ख्रिस्तापेक्षा गॅलिलिओ सत्य होता. व्यासवाल्मिकीपेक्षा चार्वाक सत्य होता.

□

**ध्येयवादी माणूस**

महासागराच्या मध्यावरच्या एका छोट्या निर्जन बेटावरची एकाकी व्यक्ती.

□

काळ मोठा कठीण आला आहे. कालपर्यंत विसंबून होतो (कम्युनिस्ट) पार्टीवर. पण आज एकाकी वाटणं आहे...माझ्या मताशी कुण्या पार्टीचं जमत नाही...जनमत माझ्या मताची कदर करतं, पण जोवर जनमताला वळण लावणारी यंत्रणा नाही, संघटना नाही, तोवर सारं व्यर्थ होय.

आजच्या ज्या यंत्रणा एकांडेपणानं वागतात व मुत्सद्देगिरीत तोकड्या पडतात, म्हणून जीवन पुढे जाणं अशक्य आहे. तर उजव्या पुरोगामी शक्तीसुद्धा प्रतिगामी शक्तींचा नाश करायला धजावत नाहीत. कृतीने त्याही नेभळट ठरतात.

त्यांच्याईपुढे समाजोद्धार या क्रांती नसून सत्तालोभच आहे. काय करावं?

२२-९-१९६८, नागपूर

सामान्य माणसाला बुद्धिवादाचा मार्ग मिळाला आणि त्याने त्याचं नीट पालन केले तर तो एक मोठा महामुनी होऊ शकेल. पण तोच मार्ग जर त्याने नीट आत्मसात केला नसेल व बुद्धी मात्र सैर नि सैराट सोडली असेल तर तोच सामान्य माणूस अपरिहार्यपणे येणाऱ्या एका महान विकृतीमुळे जगाचा तेवढाच अधःपात करील जेवढा सरंजामशाही युगात पुरोहितवर्गाच्या मंत्रवणीनं केला नाही — अगदी तेवढा!

२४ जानेवारी १९६५

माझे हात पवित्र आहेत, स्वच्छ आहेत, ते डागाळलेले नाहीत. मी कुणाचं कधी जाणूनबुजून वाईट केलेलं नाही. तेव्हा माझं सर्व काही चांगलंच होईल यात शंका नको अशी माझी मनोदेवता मला मनोमन ग्वाही देत असते. कारण जनता-जनार्दनाच्या सदिच्छा सदैव माझ्या पाठीशी आहेत आणि जोवर मी माझं स्थान जनताजनार्दनाच्या चरणकमलांजवळ ठेवलं आहे तोवर माझ्या शाहिरी सिंहासनाला ध्रुवासारखं अढळपद मिळाल्याशिवाय राहणार नाही!

१८-१०-१९६७

☐

— पुरोहितवर्गातील तमासगिरा, ये रे लौकर जन्म घे! तू जर जन्मला नाहीस तर या अविध तमासगिराचा जग जयजयकार करील. तुझ्या हातांना ही तमाशा-कलेची मशाल पेलवली नाही तरी चालेल. तू गाढव, मूर्ख असलास तरी चालेल. तमाशाकला, मराठी लोककला यांविषयी तू अनभिज्ञ असलास तरी चालेल. पण तू लोककलावंत, तमासगीर, शाहीर हे नाव घेऊन लौकर पुढे ये आणि आपल्या पुरोहितवर्गाची लाज राख.

आज कुठल्याही परिस्थितीत पुरोहितवर्गाच्या प्रतिनिधीशिवाय या महाराष्ट्रात कुठल्याही क्षेत्रातलं पान हलू शकत नाही, पूर्णविराम पडू शकत नाही. याच गोष्टीची जाणीव या अज्ञ जगाला व्हायची आहे. आणि हे सारं आमच्या हातात आहे. म्हणूनच म्हणतो: पुरोहितवर्गातील तमासगिरा, ये, ये बाबा, लौकर ये.

१३ जानेवारी, १९६६

आणि गमत अशी, की माझी ही शाहिरी फुलमाळा या पुरोहितवर्गाच्या प्रतिनिधी-

नीच मोठा वाटा उचलला आहे, हे कृतज्ञतेने मान्य करणं माझं कर्तव्यच आहे.

मला गाण्याचा ओनामा शिकवणारे श्री. नारायणराव भट (बार्शी); 'राजकारणाचा हिरीरीनं अभ्यास करा व थोर कलावंत व्हा – तुम्ही होणारच' हे सांगणारे कॉ. रघुनाथ कऱ्हाडकर; इतिहासाचा मार्ग दाखवून देण्यासाठी, स्थलकालाची पर्वा न करता, शिक्षण देणारे प्रा. न. र. फाटक; माझ्या काव्याला लोकमान्य करावं, ते चिरकाल टिकावं म्हणून ते सर्व छापून अजरामर करणारे श्री. वा. वि. भट व माझ्या शाहिरीचा त्रिखंड डंका वाजवणारे आचार्य प्र. के. अत्रे – हे सर्व पुरोहितवर्गाचे प्रतिनिधीच ना? पण ज्याचा वर्ग बदलला नाही, जग बदललेलं नाही, दृष्टी बदलली नाही आणि जो अजूनही पुरोहितशाहीची जुनी जळमटं उरी बाळगून हिंडतो त्याविषयी काय बोलावं?

असा वर्ग अजूनही पुरोहितवर्गात फारच मोठा असून, साहित्य-वाङ्मयीन-सांस्कृतिक पुढारीपण त्याच्याचकडे आहे.

*१४ जानेवारी १९६६*

☐

काही दगड इमारतीच्या 'पाया'चे असतात. काही खास इमारतीचे असतात. काही मूर्तींचे असतात. काही रस्त्यावर टाकायच्या खडीचे असतात. तर काही फक्त नुसते मैलाचे दगड असतात.

२४-४-६८

☐

**श्रेष्ठ धर्म**

जगत्पटलावर असा कुठला पंथ आहे का, की जो आपला धर्म हा दुसऱ्या धर्मापेक्षा कमी प्रतीचा आहे म्हणणारा? शक्यच नाही. याचा अर्थ हाच की, त्याच्या धर्मप्रमुखाकडून जो ठरेल तोच न्याय आणि कायदा. म्हणजे भारतासारख्या खंडप्राय देशात अनेक धर्म असल्यामुळे एकाच समाजात अनेक न्याय व अनेक कायदा-कलमे असणार. म्हणजेच एकाचा न्याय तो दुसऱ्याला अन्याय ठरेल.

समाजात जोपर्यंत धर्मकारण व त्यांचे धर्म आहेत तोवर या प्रकारचे अन्याय व असमाधान राहणार. यासाठी धर्मकारणविरहित, आम समाजाधिष्ठित अर्थकारणावलंबी राजकारणच हवे, हे स्पष्ट आहे.

विशेषतः देश आर्थिक अरिष्टाच्या – महागाई, बेकारीच्या गर्तेकडे निघाला असताना धर्मकारण म्हणजे समाजाच्या नि देशाच्या शक्तीची खच्चीच होय. एकदा राजकारणात धर्मकारण घुसले व समाजातला न्याय व कायदा धर्ममार्तंडांच्या हातात

गेला वा एकाच समाजरचनेत वा खंडात प्रत्येक धर्माला आपल्या धर्माप्रमाणे धर्मकारण, न्याय व कायदा करण्याचा-सांगण्याचा लोकशाही हक्क मिळाला की तो सबंध समाज वा खंड खंडित झालाच म्हणून समजावे.

म्हणूनच मानवधर्म हाच सर्वांत श्रेष्ठ धर्म होय.

□

ज्यो,

अग, पावसाळ्यात गाडीच्या चाकाला चिखल हा लागणारच. तो लागू नये म्हणून प्रवास करणं का बंद ठेवायचं? तुम्हांला निर्मळ पाणी पाहिजे असतं, तसं कसं होणार? पाण्याबरोबर गाळ येणारच, हे सुज्ञ माणूस धरून चालतो. म्हणून आपल्या सहकारी कलाकारांत चांगलीवाईट माणसं असायचीच. शिल्पकार रात्रंदिवस छिन्नी चालवून ओबडधोबड दगडातूनसुद्धा सुंदर मूर्ती निर्माण करू शकतो. मग आपणासारख्यांना जिवंत, हाडामासांच्या माणसांना चांगले नागरिक, चांगली माणसं का घडवता येऊ नये?

माणूस हा नेहमीच बदलणारा प्राणी आहे. त्याची सुधारणा करण्यात नेहमीच यश येणार नाही; पण म्हणून काही प्रयत्न सोडता कामा नये. आज नाही उद्या तो नक्कीच सुधारेल असा आपण विश्वास बाळगावा.

२-९-१९६७

□

बाळ प्रेरण,

तू कितीही थोर कलावंत झालीस तरी जोपर्यंत तू मार्क्सवादी दृष्टिकोन आत्मसात करणार नाहीस तोपर्यंत तुला समोरच्या विविधरूपी असलेल्या प्रेक्षकांची नाडी ओळखता येणार नाही, हे पक्कं लक्षात ठेव. तुझा बाप मोठा झाला त्याला कारण त्याने अंगिकारलेला मार्क्सवादी दृष्टिकोन व विशाल मानवतावाद. माझ्या यशाचं खरं मर्म हेच आहे.

बाळ प्रेरण,

तुझ्याजवळ तीन गोष्टी असल्या पाहिजेत : प्रथम म्हणजे तू मार्क्सवादी दृष्टिकोन समजून घेऊन माणुसकीची जोपासना कर. दुसरी म्हणजे तुझ्या कलेत प्रावीण्य संपादन कर. नि तिसरी म्हणजे समाजाची नाडी ओळखून त्याला योग्य प्रकारे मार्गदर्शन करणारं प्रभावी वक्तृत्व हस्तगत कर. तरच माझ्याप्रमाणे विजयश्री तुला माळ घालेल, हे नीट लक्षात ठेव.

बाळ प्रेरण,

विकारी प्रेम नि विचारी प्रेम यांची कधीही गल्लत करू नकोस. विकारी प्रेम आंधळं असतं तर विचारी प्रेम डोळस असतं. विकारी प्रेम मोहाला बळी पडतं व प्रसंगी स्वतःची फसगत करून घेतं. पण विचारी प्रेम तसं नसतं. विचारी प्रेम कधीही अविचारानं पाऊल उचलीत नाही. विचारी प्रेम आपलं नाणं चांगलं पारखून घेतं व व्यवहाराच्या तागडीत घालून त्याचं योग्य ते मूल्यमापन करतं. ते विकारी प्रेमागत बाह्य सौंदर्याला व दिखाऊ डामडौलाला कधीही भीक घालत नाही. तसेच विचारी प्रेम माणुसकीला कधीही तिलांजली देत नाही. उलट, माणुसकीचं नेहमीच जतन करतं.

*२९ जानेवारी १९६६*

# कम्युनिस्ट पक्षाने दिलेले अनमोल रत्न

ज्योती अमर शेख

पुण्यातील ओंकारेश्वराच्या घाटावर एक तरुण अत्यंत उद्विग्न चेहऱ्यानं समोरच्या जलाशयाकडे पाहत बसला होता. त्याच्या नेत्रांतून अविरत अश्रूंचे ओघळ वाहत होते. ती स्मशानभूमी असल्यामुळे कुणालाही वाटे, की बिचाऱ्याचं घरचं कुणीतरी गेलं असावं, म्हणून हा शोकाकुल दिसत असावा. पण पुढे कित्येक दिवस तो तरुण त्याच ठिकाणी दिसू लागला तेव्हा तो एक कुतूहलाचा विषय झाला. एक दिवस कॉ. कऱ्हाडकर सहज त्या बाजूने येत होते. त्यांनी पाहिलं नि ते थबकलेच. तो त्यांचा जानी दोस्त होता : कॉम्रेड अमर शेख!

अरेच्चा! कॉम्रेड अन् अश्रू? थोडंसं विचित्रच वाटलं. ते हळूच अमरच्या मागे गेले. खाली बसले. अन् त्यांनी हळुवारपणे त्याच्या पाठीवर हात ठेवला. त्यानं चमकून पाहिलं. कॉ. कऱ्हाडकरांना पाहून अमर थोडे संकोचले. कारण राजकीय क्षेत्रात ते कऱ्हाडकरांना गुरू मानीत. बार्शीच्या कामगारचळवळीत राष्ट्रीय बाण्याचे पुरोगामी युवक म्हणून अमरनी काँग्रेस कमिटीचे काम बंद करून लाल बावटा ट्रेड युनियन संघटनेत प्रवेश केला होता. तिथे ते नि बापू पिंपरकर मिळून रात्रंदिवस सभाच सभा घेत असत. एकदा त्यांनी कॉ. कऱ्हाडकरांना बार्शीच्या कामगारांपुढे भाषण करण्याकरता मुद्दाम बोलावलं. त्यांच्या भाषणाचा कामगारांवर तर परिणाम झालाच, पण खुद्द शाहीर स्वतःच भारावले. त्या दिवसापासून शाहिरांनी कम्युनिस्ट पार्टीकडे आपला मोर्चा वळवला व कॉ. कऱ्हाडकरांकडे मार्क्सवादाचे नि समाजवादाचे धडे घ्यायला सुरुवात केली. क्रांतीसाठी ते अगदी वेडे झाले व घरदार सोडून नोकरीनिमित्त पुण्यात राहू लागले. तत्पूर्वी त्यांनी बार्शी तालुक्यात खूपच कार्य केलं होतं.

आपण असे भलत्या ठिकाणी पकडले गेलो हे काही शाहिरांना बरं वाटलं नाही. तारुण्यसुलभ भावनांनी दगा दिला नि शाहीर एका कॉम्रेडच्या प्रेमात नकळत स्वतःला विसरून गेले. पण त्या मुलीने अनपेक्षितपणे शाहिरांना नकार दिला होता नि त्याचं दुःख असह्य होऊन ते एकटेच कुठेतरी बसत असत. हे सर्व कॉ. कऱ्हाड-करांच्या कानांवर होतंच. तेव्हा स्वतःला सावरून घेत शाहिरांनी कॉ. कऱ्हाडकरांना विचारलं, "काय कॉम्रेड, इथं कुठं?"

कॉ. कऱ्हाडकर म्हणाले, "वा! छान! म्हणजे मी जे तुम्हांला विचारण्यासाठी इथं आलो तेच तुम्ही मला विचारता? म्हणजे कमाल आहे झालं! अरे अमर, हे तुला काही शोभत नाही बघ. मला नक्की ठाऊक आहे की मी जे पाणी घातलं आहे ते एका प्रचंड वटवृक्षाला घातलं आहे. त्याच्या पारंब्या फार दूरवर पसरणार आहेत. पण त्या वृक्षानं स्वतःच अशी मान टाकली तर बिचाऱ्या पारंब्या रुजण्यापूर्वीच पायदळी तुडवल्या जातील, याचा कधी विचार केलास का! छोड दो यार! ज्या स्त्रीला तुझं मोल कळलं नाही तिच्यासाठी तुझ्या अनमोल जीवनाचे दुर्मिळ क्षण का म्हणून वाया घालवावेस? मग आपल्या बुद्धिवादाची कसोटी कुठे राहिली? छेः छेः, यापुढे हे असं चालायचं नाही! अरे, तुझं नेहमीचं आवडतं गाणं विसरलास?

**हिंमत को मत हार –**
**मुसाफिर, हिंमत को मत हार॥**
**पहाडों से टकराने को**
**कफाँनों से हट जाने को**
**हरदम है तय्यार॥**

म्हण बरं एकदा तुझ्या त्या पहाडी आवाजात! तुझं तुलाच समाधान वाटेल. अरे वेड्या, दुःखितांना तुझी ती तान ऐकवून त्यांची हिंमत राखण्याकरता तरी तुला आनंदी बनलं पाहिजे. (गुरूंचा हा उपदेश शाहिरांनी अखेरच्या क्षणापर्यंत आचर-णात आणला.) मग बघ तुझी काव्यदेवता प्रसन्न होऊन तुझ्या चरणी लीन होईल, त्या वेळी लोक तुला डोक्यावर घेऊन नाचतील. हे चित्र पाहायचं सोडून तूच चित्रासारखा तटस्थ राहिलास तर फार तर एखादा चित्रकार तुझं स्केच तयार करील. होय ना? चल बरं, घरी जाऊन मस्तपैकी चहा घेऊ नि मग भरपूर झोप घे. उद्यापासून नवीन जीवनाला प्रारंभ कर!"

आता कुठं शाहिरांचा बुद्धिवाद जागा झाला. कॉ. कऱ्हाडकरांकडे आदरयुक्त प्रेमानं पाहत शाहिरांनी त्यांचा हात घट्ट धरला नि म्हटलं, "कॉम्रेड, तुमची सोबत असल्यावर बंदुकीलाही सामोरं जाईन हा विश्वास बाळगावा!"

त्या दिवसापासून शाहिरांच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला. आत्यंतिक

मानसिक आघातामुळे त्यांची प्रकृती खूपच कृश झाली होती. काहींना तर वाटलं, की शाहिरांना बहुधा क्षयानं पछाडलं असावं. पुण्याच्या कम्युनिस्ट पार्टी युनिटनं औषधं नि इंजेक्शनं यांचा मारा केला नि कॉ. कन्नडकरांच्या दोस्तमंडळींच्या प्रेमळ शुश्रूषेने शाहिरांची प्रकृती लवकरच सुधारली. आता ते चांगले हिंडूफिरू लागले. हृदयात खोलवर झालेली जखम तशीच होती; पण संयमाची खपली त्यावर असल्यामुळं पाहणाऱ्याला जखमेचा थांगपत्ता लागत नसे. कॉ. कन्नडकरांना वाटलं, आपण अमरला सावरलं नि शाहीर समजून चुकले, की शेवटी आपण प्रेमात चांगलीच आपटी खाल्ली. असं मनाचं समाधान करून ते नव्या उमेदीने कम्युनिस्ट पार्टीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ लागले व लवकरच त्यात रंगून गेले. पल्लेदार, पहाडी नि गोड आवाजाची नैसर्गिक देणगी असल्यामुळे अल्पावधीत ते चांगलेच लोकप्रिय झाले. कोणतीही सभा अगर संमेलन असलं की तिथं शाहीर अमर शेख असायचेच असं जवळजवळ समीकरण होऊन गेलं. नंतर सरकारची वक्रदृष्टी पार्टीकडे वळली नि कम्युनिस्ट पार्टीवर बंदी घालण्यात आली. प्रमुख कार्यकर्ते रातोरात भूमिगत झाले. शाहिरांनी मास्टर विनायकांच्या सौजन्याने 'नवयुग' कंपनीत प्रवेश करून सरकारला गुंगारा दिला.

परंतु सिनेसृष्टीतील घृणास्पद वातावरणात त्यांचा जीव उबून गेला नि ते तडक मुंबईस दाखल झाले. आता कम्युनिस्ट पार्टीवरील बंदी उठली असल्याने ते उघड रीत्या वावरू शकत होते. मुंबईत त्यांचे कुणीच मित्र नसल्यामुळे प्रथम ते कम्युनिस्ट पार्टीच्या मुंबई कमिटीच्या ऑफिसमध्ये आपला बाडबिस्तारा ठेवून राहू लागले व पार्टीच्या कम्यूनमध्ये जेवू लागले. फुलटाइम काम करणाऱ्यांना त्या वेळी अवघे रु. ४० मिळत असत व विवाहित कॉम्रेड्सना रु. ६०. ते मानधन अगदीच अल्प होतं. नाइलाजानं कॉम्रेड्सना त्यातच आपलं जीवन तगवावं लागे. त्या काळी पार्टी-ऑफिसात रात्री एक-एक वाजेपर्यंत सभा चालत. त्यामुळे शाहिरांना झोपणं अशक्य होई. दीड वाजता कुठं अंग टाकावं तो पहाटे-पहाटेच सभेसाठी ऑफिस पुन्हा चालू होत असे. पुढे त्यांची प्रकृती परत बिघडली, म्हणून त्यांना पार्टीने के. ई. एम. दवाखान्यात दाखल केलं. पण तेथील त्या वेळचं वातावरण पाहून ते अक्षरशः पळून आले व आता आपण परत बार्शीला जाऊ इच्छितो म्हणून पार्टीला कळवलं. शाहिरांचा निर्णय पाहून पार्टीचे पुढारी चांगलेच गडबडले, कारण त्याच वेळी मुंबईत पार्टीला शाहिरांची अत्यंत गरज होती. त्यांच्या पुढाकाराने कॉ. अण्णाभाऊ साठे नि कॉ. दत्ता गव्हाणकर ह्या सुप्रसिद्ध त्रिमूर्तींचं सहकार्य घेऊन कम्युनिस्ट पार्टीने लालबावटा कलापथक सुरू करण्याचा निर्णय त्याच काळी घेतला होता व तसं महाराष्ट्रातल्या इतर युनिट्सना कळवलं होतं. त्यामुळे मुंबई सोडण्याचा निर्णय

शाहिरांनी पण सोडून दिला. त्याच वेळी कॉ. बी. टी. रणदिवेंनी शाहिरांना राजभवनवर बोलावलं. त्यांची सर्व परिस्थिती समजून घेतली. मग बी. टी. त्यांना म्हणाले, "कॉम्रेड, तुम्ही व्यवस्थित राहत जा. कपड्यांची आबाळ करू नका. यापुढे तुमच्या आवश्यक असणाऱ्या खर्चाची जबाबदारी पार्टी घेईल. पण तुम्ही तुमची प्रकृती सुधारा."

नंतर औषधपाण्यापासून तो बाडबिस्तारा व दाढीच्या नवीन सामानापर्यंत बी.टीं.नी शाहिरांसाठी वस्तू मागवल्या व त्या त्यांच्या हवाली केल्या नि त्यांची झोपायची व्यवस्था कॉ. डांगेंच्या घरी केली. त्यामुळे शाहिरांनी सुटकेचा निःश्वास सोडला. कारण आता निदान झोप तरी व्यवस्थित मिळणार होती!

सौ. उषाताईंची नि शाहिरांची चांगलीच गट्टी जमली. त्या अमरना (शाहिरांना) मुलाप्रमाणे मानीत व शाहीरही ताईंना आईप्रमाणे मान देत. 'डी'सुद्धा शाहिरांवर खूष असत. असे दिवस चालले होते. त्या वेळी झरी इथे किसान-परिषद होती, तेव्हा पथक झरीच्या दौऱ्यावर निघालं. त्यापूर्वी पथकाचा टिटवाळ्याच्या किसान-परिषदेतसुद्धा कार्यक्रम झाला होता. त्याच वेळी मुंबईच्या कॉम्रेड्सचा व कॉ. अमर शेखांचा प्रथम परिचय झाला.

मी त्याच वेळी त्यांना प्रथम पाहिलं. त्या वेळी मी पण पार्टीतच होते. माझं नाव त्या वेळी कॉम्रेड कुसुम जयकर असं होतं. पण ओळख मात्र झरीलाच झाली. मी वारली स्त्रियांना लाल बावट्याच्या बॅजेस लावण्यात गर्क झाले होते. कार्यक्रम संपला होता. दोन प्रेमळ डोळे माझ्या हालचालींकडे कौतुकाने पाहत होते, पण मला त्याचा पत्ता नव्हता. पुढे शाहिरांनी मला सांगितलं. येताना झरीहून आम्ही सर्व कॉम्रेड्स एकाच डब्यात होतो. गाडीत खूप गर्दी होती व सामानही भरपूर होतं. शाहीर समोरच्या बाकावर बसले होते. त्यांच्या पायांशी एका पेटीवर मी बसले. कॉ. यादींना शाहिरांच्या गाण्याचं चांगलंच वेड होतं. त्यांनी मला शाहिरांकडून गाणी लिहून घेण्यास सांगितलं.

मी लिहू लागले. शाहीर गात होते. गाडी हलत असल्यामुळे मी वही शाहिरांच्या मांडीवर ठेवली. थोड्या वेळाने लिहिणं संपलं. प्रवासाने नि जाग्रणाने मला झोप येऊ लागली. मी हळूहळू डुलक्या घेऊ लागले व अगदी सहजपणे शाहिरांच्या गुढघ्यांवर डोकं टेकून शांत झोपले. माझ्या निष्पाप चेहऱ्याकडे पाहून शाहिरांचा स्त्रीजातीविषयीचा राग कुठल्या कुठे पळाला. नुकतीच ओळख झालेल्या माणसावर विश्वास टाकून ही किती निर्भयपणे झोपली आहे! चांगली सरळ नि भाबडी मुलगी दिसते. त्यांना वाटलं, हिनं अशीच आपल्या जीवनात साथ दिली तर किती चांगलं होईल! आपणाला हवा असाच जिव्हाळा हिच्या ठिकाणी खात्रीने सापडेल. तिचे डोळेच

सांगतात. आता मात्र ह्या मुलीची पाठ सोडायची नाही. त्यांनी मनोमन निर्णय घेतला. (नि शेवटी तो तडीस पण नेला.) मला मात्र कशाचाच पत्ता नव्हता. माझी झोप मोडू नये म्हणून शाहिरांनी जरा पण हालचाल केली नाही. दादर येताच इतरांनी मला जागं केलं. शाहिरांची मांडी अवघडली असेल ह्या विचाराने मी संकोचून गेले. ''सॉरी हं कॉम्रेड,'' मी दिलगिरीने म्हटलं, ''माझ्यामुळं तुमची खूप गैरसोय झाली असेल.''

''छे! छे!'' ते म्हणाले, ''मात्र ही ओळख विसरू नका म्हणजे झालं!''

''नाही हं, चांगलीच आठवण राहील मला.''

पण खरं म्हणजे तो प्रसंग मी विसरून पण गेले.

त्यानंतर जोगेश्वरीच्या गिरणीत संप झाला. मी त्याचा रिपोर्ट घेऊन परळच्या पार्टी-ऑफिसवर गेले. नेहमीप्रमाणे मी माझ्याच तंद्रीत असल्यामुळे माझं कुठे लक्ष नव्हतं. शाहीर तिथेच होते, पण मी त्यांना पाहिलं नाही. तेव्हा तेच म्हणाले, ''काय कॉम्रेड, विसरलात?''

मी एकदम ओशाळले. एवढी मोठी धिप्पाड मूर्ती समोर असताना आपलं लक्ष जाऊ नये याचं मला मनोमन वाईट वाटलं. मी दिलगिरी व्यक्त करीत म्हटलं, ''अरे, मी तुम्हांला पाहिलंच नाही.''

ते म्हणाले, ''कशाला पाहाल बाबा आमच्याकडे!'' नि आम्ही दोघंही हसू लागलो. ते म्हणाले, ''ही काय रीत झाली?''

मी म्हटलं, ''कसली?''

ते म्हणाले, ''कशाला क्रांतीच्या गप्पा करता? एक दिवससुद्धा ऑफिसवर येत नाही!''

''आज नाही का आले?''

''ते आजचं सोडा. रोज यायला हवं. बरं, कॉफी घेणार का?''

मी म्हणाले, ''हो, घेऊया की.''

नंतर आम्ही एका उपाहारगृहात गेलो. कॉफी घेताना ते म्हणाले, ''माझ्यासाठी एक करणार?''

मी सहज म्हटलं, ''काय?''

ते म्हणाले, ''इथं रोज माझ्याबरोबर कॉफी घ्यायला याल?''

किती साधी मागणी! मला हसू आलं. मी सहजगत्या ''हो'' म्हणून गेले. पण आपण शाहिरांना कसलं आश्वासन दिलं हे काही त्या वेळी माझ्या लक्षात आलं नाही! माझा होकार मिळताच त्यांना खूप आनंद झाला. त्यांचा चेहरा उजळून निघाला. हातावर हात ठेवीत ते म्हणाले, ''पाहा बरं, मागाहून टाळाटाळ नको.''

"नाही, नाही."

"मग ठीक. आता मी निर्धास्त झालो..."

तरी माझ्या डोक्यात प्रकाश पडला नाही!

अशा रीतीने आमची दोस्ती वाढतच गेली व आम्ही एकमेकांना चांगलंच ओळखू लागलो. आता ते माझ्या घरीसुद्धा येऊ लागले. एकदा ते सकाळीच आले. मला रस्त्यातच गाठलं. ऑफिसची वेळ झाली होती. पण आम्हांला भटकण्याची लहर आली नि त्या दिवशी मी ऑफिसला चक्क दांडी मारली. मला त्यांचा सहवास हवाहवासा वाटू लागला. त्या दिवशी प्रथमच माझ्या लक्षात आलं की ह्या माणसाविषयी आपल्याला काहीतरी अधिक वाटत असावं. नि कसं कोण जाणे पण त्याच दिवशी आम्ही विवाहबद्ध होण्याचं आपसात ठरवलं. अर्थात त्यांनी ते पूर्वीच ठरवलं होतं, पण मला पत्ता नव्हता. ही बातमी जर बाहेर फुटली तर काय कहर होईल यावर मग आम्ही चर्चा केली. सर्वात गहजब होणार होता तो माझ्या घरीच. आमचे बाबा खूप हळवे होते. त्यांच्या प्रकृतीवर वाईट परिणाम होईल की काय याबद्दल मला खूप चिंता वाटे व अमरना पण. आम्ही आमच्या जवळच्या मित्रमंडळींना आमचा मनसुबा कळवला. सगळेच हादरले. ती झेपच तशी होती गरुडासारखी! आमच्या मित्रांनी एक दिवस मटण-पार्टी करण्याचा बेत नक्की केला. त्याच दिवशी आम्हा दोघांना कॉ. डी. एस. वैद्यांनी (त्या वेळचे पार्टी-सेक्रेटरी) ऑफिसवर बोलावून चौकशी केली, "तुम्ही लग्न करणार हे खरं का?" आम्ही होय म्हणून सांगितलं. "बरं, जा. तेच विचारायचं होतं."

आम्हांला कल्पनाही नव्हती – पण वेगळीच चक्रं फिरू लागली नि आम्हांला लग्न न करण्याबद्दल पार्टी 'मॅन्डेट' देण्यात आला. आम्ही अगदी हतबल झालो. आम्हांला एकमेकांना भेटणंसुद्धा अशक्य झालं. कारण पार्टीची शिस्त तशी कडक असे व आमची दोघांचीही पार्टीवर खूपच भक्ती होती. नंतर कळलं की, मी एक मध्यमवर्गातील सुशिक्षित व लहान मुलगी आहे व शाहीर हे कामगार असून फक्त फायनल झालेले आहेत, तेव्हा या दोघांचं पटणार नाही व पार्टीच्या कामात अडथळा येईल, तेव्हा हे लग्न होता कामा नये. त्या दिवशी शाहीर खूप रडले. हा दुसरा आघात त्यांच्या सहनशक्तीबाहेरचा होता. त्या दिवशीची मटणपार्टी अर्थात रद्द झाली. कारण आम्ही दोघंही हजर राहणार नव्हतो. जवळजवळ पंधरा दिवस आम्ही एकमेकांना भेटलो नाही. एक दिवस ते कॉ. लीला यार्दीकडे आले. उद्देश मला गाठण्याचाच होता. कारण ते दोघेही माझे मित्र होते व मी त्यांच्याकडे जात असे हे शाहिरांना माहीत होतं. पण लीला कसली खट, (बिचारी तीही आज हयात नाही.) तिने त्याना पाहताच दार लावलं. मी तिला म्हटलं, "ए, दुष्टपणा पुरे. दार उघड

बरं.'' ते जात होते. आम्ही त्यांना बोलावलं. आत येताच त्यांनी धाडकन कॉटवर अंग टाकलं. मला अश्रू आवरणं कठीण झालं. मी त्यांच्या कपाळावरून हात फिरवीत म्हटलं, ''अमर, आपण सारं विसरू या.'' नि रागाने ते म्हणाले, ''ते अशक्य आहे!'' नि एकदम निघून गेले. त्या दिवशी मी मुळीच जेवले नाही.

असेच उदासवाणे दिवस जात होते. मी ऑफिसात (इन्कमटॅक्स) जात असे. पण माझं कशाकडेच लक्ष नसे.

एका संध्याकाळी ऑफिसच्या शिपायाने मला एक चिठी आणून दिली. अमरचं अक्षर पाहून माझं काळीज धडधडू लागलं. चिठीत मजकूर होता : ''आई आजारी आहे. घरी चल.''...मी समजले आई कोण ते! मी हेड-क्लार्कची परवानगी घेऊन ऑफिस सोडलं. आम्ही तडक अंधेरी स्टेशन गाठलं. तेथील एका बागेत शांतपणे बोलत बसलो. ते म्हणाले, ''रागावू नकोस. मला अण्णांनी (अण्णाभाऊ साठे) सांगितलं तुला भेटायला म्हणून मी आलो. तो म्हणाला, 'अमर, तु कुसुमला प्रथम भेट, तिचं मत घे नि मग तुम्ही दोघं सरळ कॉम्रेड बी.टीं.ना (रणदिवे) जाऊन भेटा. पार्टीशिस्त आपल्यासाठीच आहे ना? दोन कॉम्रेड्सची मनं ज्या शिस्तीला समजत नाहीत ती शिस्त गेली उडत! तुम्ही बी.टीं.ना समजावून सांगा, की तुम्ही तुमचा निर्णय बदलण्यास तयार नाही. शिवाय एखाद्या भांडवलदाराशी अगर पार्टीच्या शत्रूशी काही तुम्ही लग्नसंबंध जुळवीत नाही. मग पार्टीने हरकत का घ्यावी? आम्हांला पार्टीशी अंतर्गत लढा देण्याचा जरूर अधिकार आहे व तो कॉम्रेड लेनिननी पण मान्य केला आहे.' असं अण्णा म्हणाला म्हणून तर मी तुला भेटण्याचं धाडस केलं. चल, आपण आताच जाऊया बी.टी.आर.कडे.''

मी तयारच होते. खूप दिवसांनी अमरना पाहून माझं मन आनंदून गेलं होतं. त्यांची पण अवस्था माझ्यासारखीच झाली होती.

आम्ही राजभुवनमध्ये बी.टीं.ना भेटलो. ते म्हणाले, ''ही फार लहान आहे.''

मी म्हणाले, ''कॉम्रेड, माझं वय पंचवीस वर्षं आहे.''

बी.टी. अवाक् होऊन पाहत राहिले. मग म्हणाले, ''अरे, मला वाटलं, तू फार लहान आहेस. ह्याच्याशी भांडणार नाहीस ना? नाहीतर आमचं सगळं पथकच कोलमडून पडेल नि निवडणुकीत आपल्या पार्टीला पराभव घ्यावा लागेल.''

मी म्हणाले, ''त्याबद्दल तुम्ही कसलीच काळजी करू नका.''

बी.टी. म्हणाले, ''बरं, बरं. मग हरकत नाही. तुम्ही जा आता. मी पार्टी-मॅन्डेट काढून घ्यायला सांगतो.''

आम्ही आनंदाने बी.टीं.चे आभार मानले नि पळतच चहा घ्यायला गेलो. त्या दिवशी आमचा आनंद आमच्या कह्यात नव्हता. सर्वप्रथम अण्णांची गाठ घेऊन

त्यांना टाळी दिली. अमर नि अण्णा एकमेकांना कडकडून भेटले. अमर म्हणाले, "लेका, तुझ्यामुळं आजचा दिवस दिसला नि हे रत्न हाती लागलं! आता एकदम रजिस्टर ऑफिसात नोटिस द्यायची."

मी घाईने म्हटलं, "छेः छेः, प्रथम आपण जागा पाहू. संसार काय रस्त्यावर थाटायचा काय?"

नि मग अमर म्हणाले, "अरे खरंच की!"

त्यानंतर नागपूरला अखिल भारतीय विद्यार्थी परिषद होती. म्हणून मी शाहिरांना व आईवडिलांना सांगून गेले. मी तिथं अगदी रंगून गेले होते. शेवटच्या दिवशी खुल्या मैदानात विद्यार्थिमेळावा होता. मला रात्रीच एक्सप्रेस तार आली: 'आई अत्यवस्थ. तावडतोब निघून ये.' तार घरून आली होती. आई चांगली होती. मी ओळखलं, घरी आमच्या लग्नाची बातमी गेली असावी. म्हणूनच इतका गहजब! तरी पण शेवटी ती आईच होती! मला वाटलं, खरंच का आजारी असेल? मी सचिंत झाले व सकाळच्या पहिल्या गाडीने मुंबई गाठली. शेवटचा मेळावा चुकला म्हणून चुटपूट लागली होती.

दादर स्टेशनवर पाऊल टाकलं मात्र, समोर स्वतः शाहीरच हजर! मला वाटलं, मी स्वप्नात तर नाही? कारण मी त्यांचाच विचार करीत होते. मी एकदम त्यांचा हात धरला..."अमर – ते –"

"घाबरू नकोस, आई चांगली आहे. त्यांना वाटलं, तू लग्न लावण्यासाठी पळून गेलीस, म्हणून त्यांनी तुला तारेने बोलावलं."

त्याही अवस्थेत मला हसू आलं. शांत मनानं मग आम्ही जरा भटकलो व मी घर सोडावं असा निर्णय घेतला. थोडे दिवस मी माझ्या मावशीकडे दादरला राहावं असं ठरलं.

घरी जाताच आईने माझ्या अंगावर एक पत्र भिरकावलं. मी ते शांतपणे उचलून वर गेले व वाचलं. त्यात लिहिलं होतं: 'आम्हा दोघांना विषाचे पेले दे व मगच आमच्या प्रेतांना ओलांडून तू लग्न कर. – तुझा दुर्दैवी बाप.'

पत्र वाचून मी स्वतःशीच हसले. पाच मुलांचा बाप केवळ एका मुलीसाठी जीव देणार हे माझ्या मनाला पटलं नाही. मी ओळखलं, ही मला भेडसावण्याकरता केवळ धमकी आहे. मी पत्र तसंच ठेवलं व काहीच झालं नाही अशा थाटात पूर्ववत माझे नेहमीचे व्यवहार सुरू केले. त्यांना वाटलं, मुलीचा विचार बदलला. पण मी माझ्या पुस्तकांची व कपड्यांची हळूहळू मावशीकडे उचलबांगडी केली व एक दिवस, मावशीकडे राहणार असल्याचं आईला सांगितलं. त्यांना बिचाऱ्यांना वाटलं, जाऊ दे झालं! सुंठीवाचून खोकला गेला हे काय कमी झालं!

नंतर माझी वार्षिक परीक्षा होती. वेळ पुरत नाही ह्या सबबीवर दादर सोडलं व चर्नीरोडला बहिणीकडे राहू लागले. त्या मुदतीत निम्मं सामान शाहिरांकडे रवाना झालं होतं हे सांगायला नकोच.

अमरच्या नावावरून माझ्या मामेबहिणीने माझं 'ज्योती' असं नवीन नाव ठेवलं. ते त्यांना खूप आवडलं. त्याच नावाने ते मला हाक मारीत.

एकदा आम्ही असेच बोलत बसलो होतो. ते थोडे गंभीर झाले. मला म्हणाले, "ज्यो, तुला आज एक गंभीर घटना सांगणार आहे प...ण...तू रागवणार तर नाहीस ना?"

माझा थरकाप झाला, बहुधा हे आता नकार देणार असतील. माझं मन शंकाकुल झालं.

माझ्या पडलेल्या चेहऱ्यावरून ते म्हणाले, "घाबरू नकोस. मी काही तुला सोडणार नाही. प...ण तूच तसं काही करू नकोस माझी कहाणी ऐकल्यावर...म्हणून तुला सांगायला इतके दिवस धीर झाला नाही."

मी म्हटलं, "आता प्रस्तावना पुरे. एकदा सांगून मोकळे व्हा."

"ज्यो, कसं सांगू!...बरं, ऐक, तू भेटण्यापूर्वी माझं एका कॉम्रेडवर प्रेम होतं. पण तिला वाटलं, आमचं दोघांचं पटणार नाही एकमेकांशी. तेव्हा आपण फक्त मित्र म्हणूनच राहू या असा तिनं निर्णय घेतला नि माझा नाइलाज झाला. मला खूप वाईट वाटलं. पण तू भेटल्यावर माझं मन आनंदून गेलं. माणसाला ममतेनं पाहणारं कुणीतरी हवं असतं ग! तसं मला ह्या अफाट मुंबईत कुणीच नाही."

मला त्यांचं म्हणणं पटलं. पण कुठंतरी खोलवर माझं मन दुःखी झालं.

शाहीर पुढे म्हणाले, "ज्यो, तू रागावलीस तुझ्या अमरवर?"

मी म्हटलं, "नाही. माणसाच्या आयुष्यात असं होतं केव्हा केव्हा. तुम्ही ते मनाला लावून घेऊ नका. पण..." "पण काय?"

"ही घटना आपलं भावी आयुष्य दुःखी तर नाही ना करणार?"

ते म्हणाले, "त्याबद्दल मी तुला खात्री देतो. मी तुला कधीच दुखवणार नाही!" (शाहिरांनी तो शब्द अखेरपर्यंत पाळला.)

मी मात्र मनोमनी ठरवलं: हजारो लोकांना क्षणात हसवणाऱ्या ह्या माणसाला जरा पण दुःख देण्याचा आपल्याला अधिकार नाही. त्यांनी मला मागणी घातली हाच मुळी माझा केवढा तरी सन्मान आहे.

शाहिरांची नि माझी दोस्ती होण्याला आणखी एक कारण होतं. ते म्हणजे त्यांचं तेजस्वी काव्य. मला लहानपणापासून काव्याचं विलक्षण वेड होतं. त्यांचं 'भावफुले' हे काव्य वाचून मी अक्षरशः त्यांच्यावर लुब्ध झाले. कारण त्याच अर्थाचं काव्य मी

पण लिहिलं होतं. दोघांच्या काव्याचा विषय एकच होता: 'प्रेमवीरा, प्रेमभंग झाला म्हणून रडत बसू नकोस. देशाच्या रक्षणासाठी रणभूमीवर लढायला चल,' वगैरे. त्याच वेळी मी ओळखलं, की ह्या कॉम्रेडचे व आपले विचार अगदी सारखे आहेत.

असेच दिवस जात होते. एकदा एक कॉम्रेड मला भेटायला आला. तो म्हणाला, ''तुम्ही शाहिरांशी लग्न करणार आहात असं ऐकलं.''

मी म्हणाले, ''हो, खरं आहे.''

''अहो पण त्यांना टी.बी. झाला होता ना?''

मी म्हणाले, ''असेल. तरी मी माझा निर्णय बदलायला तयार नाही.''.

''तसं नाही. मला वाटलं, तुम्हांला ठाऊक नसेल तर तुमच्या कानावर घालावं म्हणून आलो.''

मी म्हणाले, ''आभारी आहे.''

तो म्हणाला, ''बरं, जातो.''

एक दिवस ऑफिसात चार हिंदुमहासभेचे तरुण आले. ''आम्ही तुम्हांला भेटू इच्छितो.''

मी म्हणाले, ''पण माझी इच्छा नाही ना तुम्हांला भेटायची!''

माझ्या अनपेक्षित उत्तराने ते चांगलेच हादरले. पण एक जण धीर करून म्हणाला, ''आम्हांला वाटतं, आपण धर्माबाहेर जाऊन लग्न करू नये. तशी विनंती करण्याकरता आम्ही आलो.''

मी म्हणाले, ''मग आपण जाऊ शकता. माझ्या वैयक्तिक गोष्टींत लक्ष घालण्याची कुणालाच गरज नाही. आपण ताबडतोब गेला नाहीत तर ऑफिसच्या शिपायाकडून धक्के खावे लागतील!''

तेव्हा त्यांनी काढता पाय घेतला.

एका माथेफिरूने वडिलांना पत्र दिलं: 'तुम्ही सांगत असाल तर आम्ही अमर शेखचा दोन दिवसांत खून पाडू. मात्र आम्हांला भरपूर पैसे हवेत.' वडील घाबरले. 'इतका मी नीच वृत्तीचा नाही' असं त्यांनी त्या गुंडाला कळवलं. नंतर वडिलांनीच कॉ. रजनी पटेलना सांगितलं, ते जर आर्यसमाजिस्ट होतील तर मी लग्नाला संमती देईन. वडिलांना वाटे, मुलीनं एखादा गुजराथी करावा, महार करावा, पण धर्माबाहेर जाऊ नये. माझ्या दुसऱ्या दोघी बहिणी होत्या, त्यांची लग्नं होणार नाहीत अशी वडिलांना भीती वाटे.

एकदा माझा एक बालमित्र भेटला. तोही कॉम्रेड होता. तो मला म्हणाला, ''कुसुम, तू अमरबरोबर सुखी होशील असं तुला खरंच वाटतं का?''

मी म्हणाले, ''का बरं?''

"अग तुमचे दोघांचे व्यवसाय अगदी भिन्न आहेत. शिवाय ते सदा दौऱ्यावर असणार. मग संसारसुख ते कसलं! शिवाय तू काही त्यांच्या कलापथकात काम करू शकत नाहीस. म्हणजे तुला मुंबईतच राहावं लागेल."

मला त्याचा मुद्दा पटला. पण माझ्या दृष्टीने त्या काळी तो गौण वाटला मला. नंतर तो म्हणाला, "शिवाय पूर्वी त्यांचं एका मुलीवर प्रेम होतं."

मी म्हणाले, "मला सारं ठाऊक आहे."

"छान! तरी तुझा विचार बदलला नाही काय?"

मी म्हणाले, "नाही! नाही! नाही!"

"मग हरकत नाही." आणि तो गेला.

अशा रीतीने धक्के खात खात आम्ही एकदाची रजिस्टर कचेरी गाठली.

त्या दिवशी राजभुवनच्या पार्टी-कम्युनमध्ये आमच्या लग्नानिमित्त जिलेबीचं जेवण होतं व तशी नोटिस पण बोर्डावर होती. पार्टी-पुढाऱ्यांनी हारतुरे आणले होते. पण आमच्या बाबांनी आमची पुरतीच फजिती केली! आम्ही जाण्यापूर्वीच ते कचेरीत गेले व हरकतीचा मुद्दा उपस्थित केला. झालं! लग्न चौदा दिवस लांबणीवर पडलं!! शाहीर अगदीच नाराज झाले. त्यांना वाटलं, प्रत्येक जण आपली मानखंडना करीत आहे. मी म्हटलं, "अमर, हरकत नाही. आता काही झालं तरी मी तुम्हांला जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत साथ देईन हा विश्वास बाळगा!" नंतर आम्ही दोघांनी आईसक्रीम खाऊन डोकं शांत केलं.

परत चौदा दिवसांनी गेलो तेव्हा कचेरीला सोळा दिवस रजा होती म्हणून माघारी यावं लागलं. मग मात्र आम्हीही कंटाळलो. आम्हांला वाटलं, पूर्वीचे गांधर्वविवाह सुरू करावेत!

अखेर शेवटी आम्ही पार्टीचे त्या वेळचे वकील कॉ. रजनी पटेल यांना बरोबर घेऊन कचेरीत गेलो. लहानपणी शाहिरांचं लग्न झालं होतं. ते मला माहीत होतं. पण ती बातमी बाबांना कशी लागली कोण जाणे! अमरनी पहिल्या बायकोला तिच्याच आग्रहावरून तलाक दिला होता. त्या वेळची वर्तमानपत्राची कात्रणं आम्ही रजिस्ट्रारला दाखवली व लहानसहान मुद्दे कॉ. रजनी पटेलांनी निकालात काढले. आणि एकदाचं आमचं लग्न ऐन हिंदु-मुस्लिम दंग्याच्या पार्श्वभूमीवर १० जुलै १९४७ मध्ये पार पडलं! फक्त अवघ्या पाच रुपयांत! रजिस्ट्रार हिंदुमहासभाइट होता. एरंडेल तेल प्याल्यासारख्या लांब नि मख्ख चेहऱ्यानं त्यानं नाइलाजानं दोन शब्द उच्चारले, "सुखी व्हा." नि आम्ही त्याला निरोप दिला.

नंतर आमच्यातर्फे कॉ. रजनी पटेलनीच आमच्या चारदोन मित्रांना पार्टी दिली. त्या वेळी ते सांगत होते की, माझे वडील त्यांच्याकडे गेले होते व आपल्या मुली-

विरुद्ध केस करण्याकरता त्यांनी वकीलपत्र घ्यावं असं त्यांना सांगत होते. कॉ. पटेलनी त्यांना सांगितलं की, मीच अमर शेखांची केस लढवणार आहे. तेव्हा बाबा गोंधळून गेले. पण नंतर कॉ. रजनी पटेलनी त्यांना शाहिरांबद्दल बरीच माहिती दिली व वडिलांचं समाधान केलं. ते म्हणाले, त्यांनी शेवटपर्यंत तिला सांभाळलं तर माझी काहीच हरकत नाही. तेव्हा कॉ. पटेलनी त्यांना सांगितलं, आम्ही आमच्या पार्टीला जबाबदार असतो. पार्टी त्यांना तसं करू देणार नाही व ते पण पार्टीची अवज्ञा करणार नाहीत. मग आम्ही त्याबद्दल कॉ. रजनी पटेल यांचे आभार मानून त्यांना मनापासून धन्यवाद दिले.

सर्वप्रथम आम्ही 'डी' व सौ. उषाताई डांगे यांना नमस्कार करायला गेलो. जाताना ताई म्हणाल्या, "अमर, तू जर का या कुसुमला कधी सोडून दिलंस तर मी तुला या वरच्या पायरीवरून खाली ढकलून देईन बरं का!" अमरनी म्हटलं, "बरं, बरं, तुमचं म्हणणं एकदम मान्य!"

नंतर आम्ही त्या वेळच्या आमच्या कलापथकाला मसाल्याचं दूध, दुधीहलवा नि पेढे अशी मिठाईची पार्टी दिली आणि सर्वांना गुंगारा देऊन अखेर आमचं सायनचं घर गाठलं. घरात शिरण्यापूर्वी आम्ही पितृतुल्य असलेल्या पूज्य सेनापती बापटांना नमस्कार करून त्यांचा आशीर्वाद घेतला व मगच १० जुलै, १९४७ या दिवशी गृहप्रवेश केला.

*(युगांतर, ३०,११,१९६९)*



मी जगात एकदाच जन्माला आलो. आणि प्रत्येक जण एकदाच जन्माला येतो यावर माझा पूर्ण विश्वास आहे. मरण आले तर ते लाखो लोकांपुढे गाताना, तारसप्तकी स्वर लावताना यावे अशी इच्छा आहे. पण माणसांच्या सर्व इच्छा सफल होतातच असेही नाही. पण मी अभिमानाने म्हणेन, की माझे जीवन मी अत्यंत यशस्वी रीत्या जगलो आणि जाताना पण त्या विजयाचा आनंद बरोबर घेऊन जात आहे. जग हे फार सुंदर आहे.

